म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं नं

REFBK-0019429

किंमत १॥ रु.





जन्म-मे,१८८५.] कै गोविंदाग्रज. [अवसान-२३जानेवारी,१९१९. जन्म-इ.स.१८९१ ] कै. बालकवि [अवसान-५मे,१९१८.
वा काला ! मायभाषेची कूस प्रसविल अनेक असले शाहीर ! ॥ पिढ्या पचविणें काम तुझें, ती समर्थ निर्मित करणार ! ॥
—" कमल.

गोविंदाग्रज-ग्रंथमाला पुष्प २ रें

# कवन गुच्छ

भाग १–२

गोविंदाग्रज मंडळ,
दादर मुंबई.

REFBK-0019429

किंमत १॥ रु.

Printed by M N Kulkarni at the Karnatak Press, 434 Thakurdwar, and Published by B R. Kadrekar Secretary, Govindagraj Mandal, Dadar, Bombay

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. 28

अजि महाराष्ट्र, श्रेय तुझें हारवलें,
काळानें चोरुनि नेलें.

परि आशेचे आम्ही भालाईत
बसणार नाहिं शोकांत

या राष्ट्राचा महाकवि येणार !
दिन रजनीचा होणार !

त्या पराक्रमी बाळाला सामोरी
'रामा'ची गेली स्वारी

'बालकवी' 'गोविंदाग्रज' असलीं
स्फुरणारिं फुलें उधळीलीं !

त्या पुष्पांनीं फुलत्या देहामधुनी
काव्यसुमें दिलीं फेकोनी !

ती ही पायघडी नाजुकशा सुमनांची
कवितेच्या कोमलतेची

तो महाकवी उद्यां बरें आदरील
मृदु पाऊल तें उमटेल !

त्यासाठीं ना पक्षी जमतिल रानीं
पांखरेंहि गातिल गाणीं

मग मानवता फुलेल आनंदान ।नंद
विश्वाचें होईल ।ाचें अ

“ वर आस्तुत ”

।लें

=

# प्रकाशकाचे दोन शब्द.

कै. कविवर्य "गोविंदाग्रज" यांच्या पुण्यस्मरणार्थ स्थापन झालेल्या "गोविंदाग्रज-मंडळा"च्या ग्रंथमालेचें हें दुसरें पुष्प महाराष्ट्र-रसिकजनांच्या सेवेला अर्पण करावयास आम्हांला आनंद होत आहे. महाराष्ट्रसारस्वताला सर्वांगसुंदर बनविण्यासाठीं आज प्रत्येक महाराष्ट्रीयानें झटलें पाहिजे. आपल्या महाराष्ट्र-शारदेला आतां कुठें चांगले दिवस प्राप्त होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. मराठी भाषेला विश्वविद्यालयांत शिरकाव मिळाल्यापासून ही आशा बळावत चालली आहे.

आजपर्यंत "अभिनव-काव्यमाले"नें बजावलेल्या कामगिरीच्या धर्तीवर आमच्या मंडळानें हा 'कवनगुच्छा'चा पहिला व दुसरा भाग प्रसिद्ध करून, महाराष्ट्रसारस्वताची अल्पस्वल्प सेवा करण्याचें काम अंगावर घेतलें आहे. दिवसेंदिवस मराठी वाङ्मयाची वाढ जेणें करून जास्त प्रमाणांत होईल असे प्रयत्न अखिल-महाराष्ट्र-वाङ्मय-मंडळाकडून होत आहेत, ही आनंदाची गोष्ट होय !

आज आम्हीं प्रसिद्ध केलेला कवनगुच्छाचा पहिला व दुसरा भाग सर्वांग-सुंदर बनवेण्यासाठीं, ज्या सुप्रसिद्ध कवि व कवयित्रींनीं आपल्या उत्कृष्ट कविता पाठवून देऊन आम्हाला ऋणी केलें, त्यांचे आमच्या मंडळातर्फे अंतःकरणपूर्वक आभार मानल्याशिवाय रहावत नाहीं. त्याचप्रमाणें कै. गोविंदाग्रज व कै. बाल-कवि यांच्या कविता प्रसिद्ध करण्याची परवानगी दिल्याबद्दल, अनुक्रमें रा. रा. शंकरराव गडकरी व रा. रा. केशवराव सोनाळकर यांचें आणि ज्यांनीं ज्यांनीं हस्तेंपरहस्तें आम्हांला मदत केली त्यांचे आम्हीं फार आभारी आहोत.

कवनगुच्छ गणेश-चतुर्थीला प्रसिद्ध व्हावयाचें ठरलें होतें; तथापि अनेक अपरिहार्य अडचणींमुळें इतका अवधि लागला, तरी त्याबद्दल सहृदय वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

कवनगुच्छामध्यें प्रत्येक कवीच्या निदान पांच तरी कविता घ्यावयाच्या असें ठरलें असल्या कारणानें या १ व २ भागांत सर्वच कवींचा समावेश करितां

झाला नाहीं. शिवाय ज्यांची कविता अगोदरच स्वतंत्र पुस्तकरूपानें वाचकांपुढे आली होती. अशा कवींना तूर्त " गुच्छांत " स्थान दिलें नाहीं. कांहीं कवींनीं आपली कवनें " गुच्छाकरितां " देण्याचें नाकारिलें; तरी " कवनगुच्छां "तून कोणताही मराठी कवि वगळला जाणार नाहीं अशी खबरदारी घेतली जाईल. सर्वांस एकाच ठिकाणीं स्थान देणें पुस्तकाच्या आकाराच्या दृष्टीनें अशक्यच आहे हें कोणीही कबूल करील.

कवनगुच्छाचें छपाईचें कामांत मदत केल्याबद्दल श्रीयुत शांताराम विठ्ठल गुप्ते व पुस्तक उत्तम प्रकारें व सुबक छापून दिल्याबद्दल " कर्नाटकप्रेस "चे मालक. श्री. एम्. एन्. कुळकर्णी याचे आम्ही आभारी आहोत.

विजयादशमी.<br>राज्यारोहण<br>शके २४७

आपला नम्र बंधु,<br>भास्कर रघुनाथ कद्रेकर,<br>चिटणीस, गोविंदाग्रज-मंडळ, दादर,<br>मुंबई नं. १४

# समर्पण.

स्वजनकृतिचे गुरु दोष झांकुनीया
घेति गुणलव जे गोड मानुनीया
कृतज्ञत्वें त्यां नमन अष्ट-अंगीं
महाराष्ट्राच्या रसिक जनांलागीं

—गोविंदाग्रज.

महाराष्ट्राची काव्य-वाटिका आज नानाप्रकारच्या फुलांनीं गजबजलेली आहे अजूनही कित्येक कळ्या उमलावयाच्या आहेत. पण हें कळ्या उमलण्याचें कार्य अखंड चालू रहाणार! याकरिता थांबून उपयोगी नाहीं. आज उमललेल्या फुलांचा गुच्छ तयार केलाच पाहिजे, नाहीं तर उद्यां त्याचें काय होईल हें कोणीं सांगावें? कांहीं फुलांची तर अशी स्थिति होते कीं कोठें ती इतक्यांत आईच्या मांडीवर खेळूं लागलीं आहेत तोंच त्यावेलीचें कलम होतें. आणि तिचीं तीं गोजिरवाणीं बाळें पोरकीं होतात. व अशावेळीं त्यांना रसिकाचा आश्रय मिळाला नाहीं तर तीं बिचारीं अकालींच कालवश होतात. अशी स्थिती बहुतेक ठिकाणीं पहावयास मिळते व त्यावेळींसहजच—

उणीव रसिकांचीच परी
आज भासते खरोखरी!

या कव्युक्तिची आठवण होते.

महाराष्ट्र–कवितेची जवळजवळ अशीच स्थिति आहे–होती पण ही स्थिति पालटणार अशीं स्पष्ट सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. ‘रसतरंगिणी,’ ‘अर्वाचीन कविता ‘काव्य–दोहन’ ‘अभिनव काव्यमाला’ इत्यादि गुच्छ सरस्वतीच्या हातांत पडले आहेत आणि पडत आहेत. ‘अभिनव काव्यमाले’चा तिसरा भाग प्रसिद्ध होऊन आज ६।७ वर्षें झालीं. या काळांत अशा प्रकारचे प्रयत्न झाले नाहींत. पण कांहीं कविंची कविता मात्र स्वतंत्र पुस्तक–रूपानें बाहेर पडली. अशी एकजात फुलांची वैजयंति ज्याप्रमाणें सरस्वतीस आवडते त्याचप्रमाणें असले गुच्छही तिला मधुन मधुन वास घेण्यास हवेसेच असतात.

महाराष्ट्र-शारदा संतकवींबरोबर टाळमृदुंगांच्या ध्वनींत ब्रम्हानंदांत रंगली, शाहीरांच्याबरोबर डफतुणतुण्याच्या तालासुरांत वीरश्रीनें सजली, आणि आधुनिक कवींबरोबर प्रणयरसांत भिजली पण बेताल झाली नाहीं. काय असेल ते असो हिला शाहीरशाही पुन्हां आवडूं लागली आहे. शिवाजी, बाजी, तानाजी, इ० पोवाडे ती नव्या स्फूर्तिनें गाऊं लागली आहे आणि ‘ महाराष्ट्राचें निशाण ’ रोवून राष्ट्रशाहिरास आवाहन करीत आहे.

रसिका ! तुम्हाला महाराष्ट्र शारदेची ही कृति पहावयाची असल्यास हा गुच्छ हाती घ्या. आणि एकेक फुलाचा वास घेऊन पहा. फुलांचे गुण मी सांगणार नाहीं हां ! ते तुम्ही ठरवायचे ! मी आपला तुम्हांला तुरे गजरे देणारा माळी. या गुच्छाच्या गुंफणींत जे कांहीं दोष असतील ते मात्र माझे ! ते माझ्या पदरांत घालून सगळे गुण तुम्हीं घेऊन जा ! बरें येतों, ओळख असूं द्या; दुसरा गुच्छ लवकरच आणीन तोही असाच पदरांत—”

विजयादशमी
राज्यारोहण शके २४७,

रसिकाचा नम्र,
द्वारकानाथ मार्तंड देशमुख.

# कवन गुच्छ.

## बालकवि.

( त्र्यंबक बापूजी ठोमरे. )

[ यांचा जन्म खानदेशांत १८९०।९१ चे सुमारास झाला. १९०७ साली जळगांव येथील कविसमेलनांत त्यांनीं आपल्या कांहीं कविता वाचून दाखविल्या, त्याचवेळीं त्यास ' बालकवि ' ही पदवी अर्पण करण्यांत आली त्यांच्या बहुतेक कविता मनोरंजनांतून प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांच्या कवितेंतील माधुर्य आणि कोमलत्व—हीं अद्वितीय आहेत. ता. ५ मे १९१८ रोजीं नसिराबाद स्टेशनवर ते आगगाडी खालीं सांपडून दिवगत झाले. ]

### १ आनंदी आनंद.

आनंदी आनंद गडे !
इकडे तिकडे चोहिंकडे
वरती खालीं मोद भरे,
वायूसंगें मोद—फिरे,
नभांत भरला,
दिशांत फिरला,
जगांत उरला,
मोद विहरतो चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[ २ ]

सूर्य किरण सोनेरी हें,
कौमुदि ही हंसते आहे,
खुलली संध्या प्रेमानें,
आनंदें गाते गाणें;
मेघ रंगले,
चित्त दंगलें,
गान स्फुरलें—
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[ ३ ]

नीलनभीं नक्षत्र कसें
डोकावुनि हें पाहतसे;
कुणास बघतें ? मोदाला !
मोद भेटला का त्याला ?
तयामधें तो
सदैव वसतो,
सुखें विहरतो,
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[ ४ ]

वाहति निर्झर मंदगती,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षि मनोहर कूजित रे
कोणाला गातात बरें ?
कमल विकसलें,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले—
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[ ५ ]

स्वार्थाच्या बाजारांत
किती पामरें रडतात;
त्यांना मोद कसा मिळतो
सोडुनि स्वार्था तो जातो
द्वेष संपला,
मत्सर गेला,
आतां उरला
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

---

## २ कवीची इच्छा.

तुला बघावें गुंगावें—
गुंगतची चुंबुनि घ्यावें !
गुंगतची होउनि जावें—
त्वदाधीन जीवें भावें !
गुङ्गुङ्गुङ्गुङ् जोंवरती
जडतेची पडती माती,
तरलित हो हृदयज्योती
दिव्य सूर श्रवणीं येती !
मग त्यांचा धरुनी सोल
एकेकच गुंफित बोल.
सौंदर्याचे स्वप्नाचे,
भासाचे, कल्पकतेचे,—
अर्धस्फुट नयनावरचे,
निद्रेचे, जागेपणिंचे,
मुग्ध मधुर हास्यावरले,
बिंदु करुण कलिकेमधले,—

हृदय-तार हालविणारे,
मनस्ताप मालविणारे,
मनोवृत्ति कालविणारे,
अंधकार घालविणारे,—
दिव्य तरंगीं तरणारे,
गोड बोल गुंफित सारे !
प्रतिभेच्या सौधावरुनी
मरुद्गणांवरती चढुनी,—
अनंतांत गगनीं उडुनी
लीन बनुनि वातावरणीं,
होउनियां सौंदर्यधनी
गुंजावी मंजुळ गाणीं !
ब्रह्मांडाची सदाफुली
अक्षयतेमध्यें फुलली !
फुलें तिचीं बघतां नयनीं
वेड भरुनि अंत:करणीं,—

फूलपांखरें परोपरी
निर्बंधपणें फुलांवरी
जशीं स्वैरें तरलित होतीं-
मद तरल गंधावरती,—
तेविं जगांच्या फुलांवरी
गंध दाटले परोपरी,
अनुभवुनी हर्षित व्हावें,
सुखदुःखें चुंबित गावें !
सुमकोषीं आपोआप
क्षण घ्यावी साखरझोंप !
डोलतची जागें व्हावें—
हांसतची गुंगत जावें !
सत्याचीं स्वप्नें व्हावीं,
सत्याला स्वप्नें यावीं !
स्वप्नींहि स्वप्नें बघत
स्वप्नांतच व्हावा अंत !
मरण्याचें स्वप्नहि गोड !
जगण्याचें स्वप्नहि गोड !
येणेंपरि सर्वहि भास
अमृताचे व्हावे कोष !
काव्यपांखरूं हें मेलें,
जन ह्मणतिल पाहुनि सगळे,
नवल परी यावर कांहीं
मृत्यूचें चिन्हच नाहीं !
स्वर्गीचीं बहरुनि फुलें
सूर्य-फुलें, नक्षत्र-फुलें,
नंदनवन सुंदर वरते
तें दिसलें नयनीं यातें !

मधु गीतें गंधर्वांचीं,
नृत्यकला अप्सरसांची,
देवांचीं राज्यें बघुनी
हें भुललें गेलें उडुनी !
अक्षय तेथें तरंगतें
तरल मनें डुलतें झुलतें
काव्यपांखरू स्वैरपणें
चुंबन गीतें अजुनि ह्मणे.
नाहिं खरें जगतीं मरण
काव्यपांखरूं बघा खुण !
नसत्याची भीती धरुनी
असतें कां द्यावें त्यजुनी ?
का ह्मणुनी वेडें व्हावें ?
चुंबितची यासम जावें !
भासाचीं सर्वहि सुमनें
चला चला चुम्बित वदनें !
होइल मग सर्वच गोड !
मरण गोड, जगणें गोड !
दुःखाश्रूतिल ही गोडी
हास्याहुनि नाहीं थोडी !
दोघेही गोडच भास
आवडती चुंबायास !
प्रेमानें भरलें गात्र
सांपडला चुंबनमंत्र !
चुंबितची आम्ही जाऊं,
स्वैरपणें जगतीं राहूं !
प्रेतहि माझें पाहून
प्रेमानें गुंगत गान—

यापरि जग हर्षित व्हावें, हें इच्छीं जीवेंभावें !

## ३ धर्मवीर.

आद्यऋषींनीं जी केली, तेजाची पूजा वहिली,
ती करणें ज्या ज्या लोकां, ते सारे सावध ऐका.
गर्जू द्या हिंदिस्तान, ऐकुनि हें माझें गान,
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण,
बाळ तयाचे जे कोणी, धर्मवीर हिंदिस्तानीं,
ते सारे सावध ऐका, सत्य धर्म कथितों लोकाः—
ज्या तेजामध्यें भिनले, आद्यऋषी जाऊनि सगळे,
तेंच तेज हृदयीं भिनतां, आद्यऋषी बघतां—बघतां—
अवतरुनी तुमच्या हृदयीं, स्फूर्तिमंत्र गातिल कांहीं !
जडतेचें लागुनि भूत, सृष्टि करी हळहळ येथ.
उणीव तेजाचीच जगीं, भासतसे जागोजागीं.
क्षुद्र तुम्ही बनलां कां रे, मायेनें भुललां सारे ?
तेजाला अवमानुनिया, अधारीं मरतां वांया.
मरणाचें काढुनि मरण घ्या, मिळवा जीवंतपण.
वाट करा तेजाला रे, फोडुनि हीं कारागारें.
प्रकाश द्या सृष्टीला तो, जो तुम्हांवरती येतो.
धर्माचारांची माती, कां धरुनी बसलां हातीं ?
मातीवर चढलें कीट, सत्य धरा ध्यानीं नीट.
सत्य सदा निर्मळच तें, आज उद्यां येथें तेथें.
रूढीवर चढलें कीट, साफ करा परजा नीट.
सत्याची समशेर धरा, असत्य सारें पार चिरा !
आद्यऋषींचा सद्धर्म, हेंच मात्र त्याचें वर्म.
सत्य प्रस्थापित व्हावें, देहमनें जीवेंभावें,
जडतेचा काढा कीट, तेजाची उजळा वाट.
धर्मपताका घ्या हातीं, उदार व्हा देहावरतीं !
अहंकार जिरला नाहीं, मोह पुरा विरला नाहीं,
धर्माच्या वाफा नुसत्या, दवडितसां भलत्या सलत्या !
तोंडावर बसली माशी, शक्ति न ती उडवायासी.

विषयांचा नयनीं धूर, धर्म मात्र तुमचा थोर !
दिडकीला सतरा पापें, धर्म धर्म ह्मणणें सोपें !
ब्रह्मचर्य तुमचें थोर, चवदावें वर्षीं पोर !
देहाचे बनला दास, मायेचा बसला फांस,
स्वार्थानें वेडे झालां, धर्माचा मुडदा केला !
धर्म नव्हे संध्यास्नान, धर्म नव्हे आसन ध्यान.
तत्त्वज्ञानाचे बोल, तें धर्मावरचें फोल !
अंतरंगीं तुमच्या वसतो, आचरणीं तुमच्या दिसतो,
धर्म खरा तुमचा तोच, बाकीचे शाब्दिक नाच !
वर्णाया सुंदर फार, धर्म नव्हे नाजुक नार.
जीवाचें द्यावें मोल, धर्म लेथवां समजेल.
तोंवरि या बाफा सोडा, धर्म ह्मणा, छाती झोडा;
अधःपात टळणें नाहीं, धर्म खरा कळणें नाहीं !
रूढि अशी कोणी दावा, बदल जिला नाहीं ठावा.
नामरूप बदलायाचें, चचलता जगतीं नाचे,
ही वरची-पोपटपंची, अजुनि किती घोकायाची ?
आत चला उघडा डोळे, मोहाचे सोडा चाळे,
परात्पराची कांस धरा, तेजाची समशेर करा.
अंधकार तोडा मोडा, धर्म खरा पदरीं जोडा;
बाधक ते तोडुनि बंध, सत्याचा मिळवा छंद;
भिऊं नका कळिकाळाला, धर्मवीर ! जयजय बोला !
अग्नीनें जळणें नाहीं, शस्त्रानें तुटणें नाहीं;
पाण्यानें बुडणें नाहीं, वाऱ्यानें उडणें नाहीं !
दिक्कालां परते तुह्मी, विश्वाचे अवघ्या स्वामी !
धर्म तुह्मांसाठीं बनला, धर्म तुह्मीं तुमचा केला.
सत्याला नांदायाला, देव जगीं स्थापायाला,
तेज जनीं पसरायाला, धर्म तुह्मीं तुमचा केला !
देवाला विसरुनि कां रे, या पोकळ धर्माचारें;
सत्याचा अवमान करा, अधःपात हा खराखुरा !
सत्य खरें स्थिरलें जेथें, तेज खरें स्फुरलें जेथें,

देव खरा विलसे जेथें, धर्म खरा आमुचा तेथें !
सत्यासाठीं नित्य नवे, धर्मबंध आह्मांस हवे,
तेजाचीं आह्मी बाळें, सत्यरूप आह्मी सगळे.
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण,
बाळ तयाचे जे कोणी, धर्मवीर हिंदिस्तानीं,
स्वार्थाला देउनि लाथ, तेजाचा धरुनी हात,
खरे विरागी धीरवर, गांभीर्याचे महीधर.
विश्वचिंतनीं रमणार, 'स्वयं'पणें विश्वाकार,
विश्वकुटुंबी विश्वधनी, तेच खरे हिंदिस्तानी !
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण !
सत्य बोल हे करा उठा ! धर्मवीर ! अद्वैत लुटा !
शुद्ध सत्य हृदयांत धरा, तेजाचा उपदेश करा.
मायामय कारागारा, तोडा मोडा पार करा !
आचारांची प्रौढि नसे, सत्य ठसावें करा असें.
धर्मपताका घ्या हातीं, व्हा केवळ तेजोमूर्ति,
व्हा सगळ्या विश्वा नेते, धर्मतत्त्व अमुचें हें तें.
सत्यधर्म निरहंकार, सर्वांचें समता सार,
सत्यधर्म जगतीं प्रेम, चोंहिंकडे आत्माराम.
स्वार्थाचा नुरला लेश, देहाचा गळला पाश,
मरणाला आलें मरण, सत्य धर्म जीवंतपण !
सत्यधर्म कळणें नाहीं, जोंवर ही जडता राही,
धर्माचें तोंवर सोंग, जा मिरवा नसतें ढोंग !
मेलेल्या सजवा रूढि' गात बसा त्यांची प्रौढि !
शूद्रांचे सोसा शाप, देशावर लादा पाप !
विधवांना रडताचि ठेवा, धर्माच्या मिरवा नांवा !
कोणि असो कसली जात, आह्मीतर पसरूं हात.
देशाचाही बंध नसे, विश्व सर्व अमुचेंच असे !
चोंहिकडे आत्माराम, सर्वांवर अमुचें प्रेम.
बघणारे आह्मी मोतीं, राजहंस भूमीवरती !
आद्यऋषींनीं सांगितलें, संतांनीं अमुच्या कथिलें,

धर्मतत्त्व हें खरें खरें, आह्मांला कळलें सारें !
धर्मवीर भूमिवरती, धर्मतत्त्व आमुच्या हातीं.
देवाचे आह्मी प्राण, आह्मांला भिवविल कोण ?
काळाचे आह्मी काळ, काळदिशा आमुचा खेळ !
तेजानें भरलीं अंगें, नेउं जगा तेजामार्गें !
हिमगिरिचा काढा कांटा, एकिकडे सागर लोटा,
वाद करा आह्मांसारे, का मरतां व्यर्थचि सारे ?
तेजाचे आह्मी दास, सत्याची धरिली कांस,
देवाला फिरवूं मार्गें, दाखवितां कसलीं सोंगें ?
देहाची परवा नाहीं, नांवाची परवा नाहीं,
धर्मवीर भूमीवरती, ह्या अमुची असली गीती !

## ४ आवाहन.

श्रमलें दमलें वणवण फिरुनी गगनीं रविकरजाल,
शिणल्या सुंदर सांध्यदेविचें हो धर्मांकित भाल,
शिणले मारुत, खिन्न पयोधर दुर्धर साहुनि ताप
शून्य गिरिदरी जर्जर निर्झर गळती आपोआप
उदासवाणें एकच गाणें शून्य मनें वनराई
चोकित राही, लागुनि तंद्रा क्षीण भरे तटेहीं.
शिणलें कोणी संसाराचा वाहुनि माथां भार,
अनंत चिंताकाहूरांनीं भरे कुणाचें ऊर.
गायन गातां शिणली माता, शिणलें तान्हें बाळ,
शिणला पालख मंद हालुनी घालविताहे काळ.
शिणली काया, शिणली माया, शिणले लोकाचार,
सौख्यहि शिणलें, दु:खहि शिणलें, शिणले तत्त्वविचार.
काळवंडल्या वातावरणीं ये करुणामय वाणी,
क्षीण पावली प्रीतिदेवता ब्रह्मांडाची राणी.
जगन्मोहिनी काव्यविणेचा मंद पडे रणकार,
ग्रहगोलांवर गंधर्वांचा एक जुळेना सूर,

पक्वपणाची पिवळी छाया सुंदरतेवर रांगे,
ब्रह्मांडाची शीण पावलीं, श्रमलीं, दमलीं आंगें.
ये ये ये जगदेक माउली ! ये रजनी, लवलाही
सृष्टिदेवता नातरि बुडते भीषणतेच्या डोहीं.
तव अधरावर जन्म पावती नंदनवनिंचे वात,
नवजीवन ये उसळूनि तुझा वरती फिरतां हात.
तुझिया स्पर्शें मृदु पल्लविता शांतिलताही होई
दिव्य दर्शनीं तुझ्याच जननी फुलते सुंदरताही.
आद्यदेवते, रजनी, येये, निजले श्रीभगवान,
ब्रह्मांडाचा भार माउली तुजविण वाहिल कोण ?
प्रीतिदेविला नवसंजीवन कोण पुन्हां देईल ?
ग्रहगोलांना निजकक्षातुनि कोण पुन्हां नेईल ?
ये ये रजनी, ये फिरफिरुनि, येशील न तूं जेव्हां
प्रळयकाळ या ब्रह्मांडाचा सत्वर येईल तेव्हां.

---

## ५ कवि बाळें.

स्वर्गाच्या तेजो गर्भीं बाळें तीं खेळत होतीं
वत्सलता प्रभुरायाची जोजवी तयां निजहातीं !
झुलवी त्यां पाळणियांत छायामय मधुर जनी ती,
मोत्यांचें घालुनि पाणी
स्वर्गंगा त्यांना न्हाणी,
लडिवाळें बाळें तान्हीं
देवाचीं आवडतीं तीं कविबाळें खेळत होतीं !

बैसुनी सूर्य किरणांत सोन्याच्या कारंजांनीं
कधिं जलदजाल खुलवावें स्वर्गीय जादुनें त्यांनीं
कधिं चंद्रकला सजवावी ज्योत्स्नेचें जाल विणोनी
शांतीचा करुनी पांवा
कधिं रात्रीं सूर धरावा,

नक्षत्र लोक डुलवावा,
सौंदर्यें उधळित होतीं बाळें तीं खेळत होतीं !

---

एकदां सडा सध्येचा शिंपुनी महोत्सव केला
बनविलें बीन ओढोनी कोवळ्या सूर्य किरणाला !
तें वाद्य वाजवायाला बाळांचा मेळा आला
ते संध्या गिरि बहुवर्णी
छायामय त्या निर्झरिणी
टाकिल्या क्षणीं व्यापोनी !
परिसाया देवहि येती ! बाळें तीं खेळत होतीं !
वाद्याचा ये झंकार एकेक जसा उदयाला
एकेक सृष्टिचें फूल लागेहो उमलायाला
निःस्तब्ध मूक गगनाला, निमिषांतच मोहर आला
'आनंद गडे-आनंद'
गाण्याचा एकच छंद
हो चोहिंकडे गोविंद !
ये रंगनाथ संगीतीं ! बाळें तीं खेळत होतीं

---

परि आला तीव्र विषारी हा नकळे कुठचा वारा !
कंपित हो एकाएकीं कां दिव्य देश हा सारा ?
बाळांचे गळले हात वीणेच्या तुटल्या तारा !
ती स्वप्नसृष्टि जळाली
गाण्याची तार गळाली,
काजळी चढे-वर खालीं,
झाली हो माती माती ! बाळें तीं खेळत होतीं !

---

त्या खोल भूमिगर्तेंत अंधार खळाळत होते,
मोहाचें जालिम वीष बेभान करी सकळांतें !
वायूसह तीव्र विषारी अंधुकता पसरित येते !

वाफारा तो लागोनी
तीं दिव्य बाळकें तान्हीं
कळमळुनी पंचप्राणीं
कोसळुनि खालीं येतीं ! स्वर्गीय दिव्य बाळें तीं !
कडकडला गगनीं तारा ढांसळला भूवर आला !
स्वर्गीय तेज मालवुनी पाषाण क्षणार्धीं झाला !
हा प्रभाव या जगताचा ! दोषावें यांत कुणाला ?
स्वर्गाचे ते शृंगार
प्रेमाचे मौक्तिक हार
गांठिता जडाचे दार
जडतेने वेष्टित होतीं ! स्वर्गीय दिव्य बाळें तीं !
काळाच्या आवर्तांत भोंवडुनि गिरके घ्यावे,
चांचपतां अंधारांत ठेंचाळुनि विव्हल व्हावे !
हें जीवित या जगतींचें तें, त्यांस कसें मानावें ?
जीवास आग लागोनी
तळमळती माझा वाणी
स्मरुनी ती पूर्व कहाणी
फोडितात टाहो चित्तीं बाळें तीं खेळत होतीं !
परि त्याच दीर्घ किंकाळ्या ठरतात जगाचीं गाणीं !
निःश्वास आंत जे कढती ती स्फूर्ति लोक हा मानी
सतप्त अश्रुमालेला गणितात कल्पना श्रेणी !
गौरवितें विश्व कवींना,
जगसर्व डोलवी माना,
परि मुग्ध मधुर आत्म्यांना
त्या काय बोचतें चित्तीं बाळें तीं खेळत होतीं !

६

प्रीतीचा पथ हा भयाकुल दिसे सौंदर्य सौदामिनी
डोळ्यांना क्षण तेज दाखवुनिया अस्तंगता हो झणी
चित्तामाजिं विकारसिंधु खवळे चांचल्य जीवीं भरे
नेत्रांतून उदास तेज जगतीं वेड्यापरी वावरे ॥

## गजल.

वर्षा हा ग्रहगोल शांतवर्ता हा चंद्रमा मंगल ना.
तैसें नील गभीर हें गगनही निश्चित उज्ज्वल
पाहोनी असला विरोध जगतीं चिद्वृत्ति हो धावरी
देवा पाप तरी असेल कुठचें मी खिन्न कां यापरी ॥

कोठें जाउं कसें करूं मज विभो कर्तव्य कैसें कळे
आलें तें समजूनही तरि पुन्हां हें चित्त कैसें वळे
माझ्यामाजिंच शत्रु घोर बसले माझा कराया वध
कर्तव्यास बघूं टपून बसुं कीं यांच्यावरी सावध ॥

गेला तास निघूनिया दिवसही याचक्रमें जातसे
गेले मासहि वर्षही निघुनिया सार्थक्य कांहीं नसे
खा, पी, नीज पुन्हां असेंच करितां आनंद नाहीं पुन्हा
चित्तामाजिं सदैव टोचित वसे कर्तव्य ही भावना ॥

डोकें जाय विचार एक करुनी चित्तीं दुजें तोंच ये
चित्ताचा पगडा विशेष; बळ तें बुद्धी बळाला न ये
त्यायोगें परि जीव हा निशिदिनीं ठेंचाळतो सारखा
साऱ्या हाय सुखास होऊन बसे मी माझिया पारखा ॥

---

## ७ गजल.

जगाचे बंध कोणाला—जगाला बांधला त्याला
मला जो थांबवी ऐसा—जगीं निर्बंध ये कैसा
जगानें देह हा केला—जगाला वाहिलें त्याला
हणा मारा खुडा तोडा—परी आतां मला सोडा
न कीर्तीला न प्रेमाला—न सौख्याला विलासाला
न विघ्नाला न मृत्यूला—मला ये आडवायाला
वृथा या वाहणें चिंता—वृथा अश्रु वृथा ममता
वृथा निश्वासमालाही—मला जी थांबवीना ही
पुरे संबंध प्रेमाचा—नको हा खेळ प्रेमाचा
खरा जो प्रीतीचा प्याला—जगीं प्याला सुखी झाला

---

## ८ माझा भारत.

अंधारामधुनी प्रकाशकिरणें चैतन्य वाहोनिया
आणी भूमिवरि अपार गमली सर्वेश्वराची दया
माझा भारत एकलाचि तिजला हा पारखा जाहला
शंका ये तुजला अशी तरि. कशी आश्चर्य वाटे मला
आहे हा हतभाग्य दीनदुबळा संत्रस्त दुःखी जरी
दारिद्र्यें जरि अस्थिपंजर उरे त्या तच्छरीरावरी
त्याला पाहुनिया भिऊन दुसरे कोणी पळाले दुरी
या दु:खी परि प्रीति वाढत असे माझी तरी त्यावरि
आहे देव विभागिला सकल या विश्वांत चोहींकडे
तो माझ्या हृदयांतरीं बसुनियां हे शब्द बोले पुढें
नाहीं भारत दीन दुर्बल जरी माझा मला अप्रिय
मी न्यायप्रिय देवबारिन पहा आतां तयाचें भय

# कविवर्य–" गोविंदाग्रज "

जन्म मे. १८८५ मृत्यु—२३ जानेवारी १९१९

[ कै. गोविंदाग्रज ऊर्फ श्रीयुत राम गणेश गडकरी यानीं महाराष्ट्रभाषेची अवर्णनीय सेवा बजावून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. नाटककार व कवि या नात्यानें त्यांनी महाराष्ट्रभाषेची बरीच मोठी कामगिरी बजाविली आहे पहिल्याप्रतीच्या प्रतिभासंपन्न कवींत यांचा नंबर बराच वर लागेल ह्यांत शंका नाहीं. यांच्याविषयीं जास्त माहिती देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे दिवा धरून सूर्य दाखविण्यासारखें आहे तेव्हां त्या वेड्या नादीं लागून नये हें बरें ! ]

## १ भारतवर्षांचा आशिर्वाद !

[ लो. टिळक स्वराज्याच्या मागणीसाठी इंग्लडास गेले त्या दिवसाकरितां ]

( चाल.–चंद्रकांत.— )

अमृतसिद्धि हा योग मगलचि जग सगळें गाय ॥
महाभाग जन ! सुखं गम्यतां पुनर्दर्शनाय ॥ १ ॥
जेंजें नश्वर गेलें निघुनी काळाच्या पाठीं ॥
अमृत तेवढें उरलें केवळ या दिवसासाठीं ॥
अंधाराची वाट कंठली फिरलों संकष्टीं ॥
चार युगांची रात्र भोगिली या दिवसासाठीं ॥
रोज उगवला, रोज परतला, होऊनि बहुकष्टी ॥
आनदें रवि आज उगवला या दिवसासाठीं ॥
दक्षिण सागर होउनि घटिकापात्र निरभिमान ॥
मोजित होता या दिवसाचें मंगल घटिमान ॥
उंच उभारुनि मान हिमालय तिष्ठत केव्हांचा ॥
पहिला वहिला किरण पहाया या शुभ दिवसाचा ॥
गंगासिंधू धांवत होत्या आंदोलित हृदया ॥

या दिवसाच्या या सूर्याला अर्घ्योदक द्याया ॥
स्वस्तिवाचना सिंहगडावर चढला गगनांत ॥
थरथरुनि श्री तानाजींचा तो तुटका हात ॥
मंगल दृष्टया बघे पांचही करुनि प्राण गोळा ॥
पंजाबी सिंव्हाचा दुसरा फुटकाही डोळा ॥
व्यासवाल्मिकी कालिदास कवि आळवीत बसले ॥
या दिवसाच्या भूपाळीस्तव वाङ्मय तें तसलें ॥
योगिवृंद गिरिकंदरिं बसुनी, लावुनि अवधान ॥
पाहत होते या दिवसाचें चिन्मंगल ध्यान ॥
आर्यभट्ट मिहिराहि काढुनी गगनाचा ठाव ॥
हुडकित होते या दिवसाचें एक रासनांव ॥
सोरठचा श्रीसोमनाथही या दिवसासाठीं ॥
पडे त्रिस्थळीं फुटुनि लागतां महंमदी काठी ॥
तिष्ठत अठ्ठावीस युगांवर भीमेच्या काठीं ॥
खडा पहारा पांडुरंग करि या दिवसासाठीं ॥
अठरा पद्में सेना योजुनि, जलधीच्या पाठीं ॥
श्रीरामानीं सेतु जोडिला या दिवसासाठीं ॥
अठरा अध्यायांची गीता एक मुक्तकंठीं ॥
रणीं गाइली श्रीकृष्णांनीं या दिवसासाठीं ॥
चितुर-गडावर आग लागली या दिवसासाठीं ॥
पानपतावर रक्त सांडलें या दिवसासाठीं ॥
पोट बांधुनी वेद राखिले सरस्वतीकांठीं ॥
पुण्याई ती सर्वंहि केवळ या दिवसासाठीं ॥
जन्मा येती बाळ टिळकही या दिवसासाठीं ॥
जन्मति श्रीमान् पंचम जॉर्जहि या दिवसासाठीं ॥
हुडकित नव्हता काय धुळीचे दिवे पाजळुनियां ॥
कोहिनूरचा धनी एक या दिवसाची दुनिया ? ॥
नलगे दौलत, नलगे बरकत, नको कोहिनूर ॥
स्वदेश नलगो, स्वराज्य नलगो, हो सर्वहि चूर ॥
तहनाम्यावर सही घालितां करि खालीं मान ॥

## एका जुन्या श्लोकाची आठवण!

दुसरा बाजीराव बवे वर धरुनी अभिमान ॥
एक सांगणें, एक मागणें, तेंच लाखवार ॥
मागुनि घ्यावी श्रीशिवबाची भवानि तलवार ॥
स्वदेशभूषा, स्वराज्यजननी, सकळिं दाखवावी ॥
दावित दावित सौभाग्यश्री स्वदेशिं आणावी ॥
चहुं–मुलखांतुनि, नव खंडांतुनि मिरवित आणावी ॥
राय गडावर समाधिची मग पूजा बांधावी ॥
म्हणेल जो तो ऐन जिवाचा देश-भक्त कट्टा ॥
सर्वस्वाचा ताम्रपटचि तो, तोच अमरपट्टा ॥

---

## २ एका जुन्या श्लोकाची आठवण.

डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसतों कानीं, पदीं चालतों,
जिव्हेनें रस चाखितों मधुरही, वाचे अम्ही बोलतों,
हातांनीं बहुसाळ काम करितों, विश्रांति ही घ्यावया
घेतों झोंप सुखें, फिरोनि उठतों, ही ईश्वराची दया
पूर्वी पूर्ववयें प्रसन्नमयता जेव्हां मिळे सृष्टिला,
शाळेच्या चिमण्या जगांत असतां हा श्लोक मीं वाचला.
साध्या बाळमनास अर्थ पटला. आनंद ही वाटला,
आतां कां करुणारस स्मृतिमुळें त्याच्या असा दाटला ?
डोळ्यांनीं बघणें, ध्वनी परिसणें, इत्यादि सर्वा क्रिया—
आतां ही घडती, उपाधि चुकल्या नाहींत जीवासि या,
जेव्हां जीव थकूनि पाहत परी विश्रांति ही घ्यावया,
नाहीं झोंप सुखें-अहो हरपली ही ईश्वराची दया !
सौंदर्यें भरल्या जगासि बघुनी हा प्रश्न चित्तीं उठे—
जीवानें जगिं काय कार्य करणें ? श्लोकांत ना तें कुठें ?

---

# ३ अनामिकाचे अभंग.

[ ज्या प्रदेशात पाऊल टाकावयाचें आहे तेथील रहिवासी साधुसंतांना तुमचा अमचा स्पर्श अनामिकापेक्षाही अमंगळ आहे, शिवाय, मराठीचिये नागरीं या पंढरीच्या पाहुण्याची श्रीचंद्रभागातटीं जी प्रेमळ पंगत झाली, तिच्या उष्टयाखरकट्यासाठींच हात पसरण्याचा जिथें संकल्प आहे, तिथें नांवाचा अभिमान अनाठायीं आहे. मराठी रसवतीच्या पवित्र अभंगस्वरूपाला, माझ्या अनामिकवृत्तीच्या पामरवाणीनें स्पर्शदूषित करण्याच्या या अतिप्रसंगाची, जन-स्वरूप जनार्दनाकडून मला क्षमा होईल अशी आशा आहे. ]

## मंगलाचरण.

नमो पांडुरंगा नमस्ते श्रीरंगा । रुक्मिणीच्या रंगा नमोनमः ॥ १ ॥
सर्वां मंगळांचा एकरूप निधि । तूंच देवा विधि-हरिहर ॥ २ ॥
ऐकिल्या देवांच्या तेहतीस कोटी । तीं रूपें गोमटीं देवा तुझीं ॥ ३ ॥
निर्गुणाचें ब्रह्म सगुणाची मूर्त । दोंहीं ठायीं कीर्त एका तुझी ॥ ४ ॥
म्हणे " XX " अगा पंढरीच्या देवा । अनामिकसेवा घ्यावी आतां ॥ ५ ॥

१

कवित्वाचा येथें वाहिला मीपणा । लक्ष्मीनारायणा तुझे पायीं ॥ १ ॥
गणांमात्रांचा तो नको ताळेबंद । नको वृत्त छंद नाम गाया ॥ २ ॥
विना कानामात्रा आणिक वेलांटी । लेखन-कामाठी मांडिली हे ॥ ३ ॥
साहित्याची कळा झाली तिन्हाईत । शुद्धाशुद्धातीत नाम तुझें ॥ ४ ॥
म्हणे " XX " जेंजें मनीं मुखीं आलें । तें तें येथ झालें ब्रम्हार्पण ॥ ५ ॥

२

क्षणमात्र थांबा असंगाच्या संगा । अहो पांडुरंगा कृपावंत ॥ १ ॥
मनाचा मुहूर्त साधुनि हा आज । सोडुनियां लाज बोलतों मी ॥ २ ॥
माझ्यावरी मीच मांडीन फिर्याद । तुझ्यापायीं दाद मागावया ॥ ३ ॥
नका देवराया धरूं भीडभाड । कराल तो निवाड मान्य आहे ॥ ४ ॥
म्हणे " XX " देवा रखमाईच्या कांता । परी दूर आतां नका राहूं ॥ ५ ॥

३

जीवेंभावें देवा आम्ही अमंगळ । जातीचे चांडाळ, थोर नावें ॥ १ ॥
पांडुरंगा आम्ही युगांचे दुर्जन । क्षणाचे सज्जन पश्चात्तापें ॥ २ ॥

व्रत एकादशी मात्र हें देहासीं । नित्य मनापाशीं दिवाळीच ॥ ३ ॥
नांवांचेच साव आम्ही थोरथोर । मनाचे हे चोर सर्वकाळ ॥ ४ ॥
तुझे पायीं आतां चोरी नसे कांहीं । म्हणे " ×× " नाहीं भयभीति ॥५॥

४

मागायाची आहे भेख । तुजपाशीं हीच एक ॥ १ ॥
सुखदुःखें हीं केवळ । जन्मा आलियाचें फळ ॥ २ ॥
इंद्राचंद्रा कर्म-रेखा । तेथें माझी कोण लेखा ॥ ३ ॥
हेंचि एक द्यावें दान । घडो कांहीं तुझें गान ॥ ४ ॥
म्हणे " ×× " हीनदीन । मृगजळींचा हा मीन ॥ ५ ॥

५

नाहीं भक्तिभाव नीट । तरी हांक मोकली धीट ॥ १ ॥
नाहीं मुक्तीचा हव्यास । नसे नामाचाही ध्यास ॥ २ ॥
नेमधर्म कोणा ठावा । एकरूप उजवाडावा ॥ ३ ॥
तुम्ही यावें आम्हांसाठीं । कवित्वही न ऐसें गांठीं ॥ ४ ॥
म्हणे " ×× " हांके साच । अधिकार पाप हाच ॥ ५ ॥

६

आलां गोपगोपींसाठीं । देवा तुम्ही यमुनाकांठीं ॥ १ ॥
पुंडलीका द्याया भेटी । देव आले वाळवंटीं ॥ २ ॥
नामयाच्या कारणीं । राउळाचीही फिरवणी ॥ ३ ॥
दामाजीच्या संकटीं । विठू धेड होई कष्टी ॥ ४ ॥
म्हणे " ×× " मायबापा । भीशी काय माझ्या पापा ॥ ५ ॥

७

धन्य धन्य माझें पाप । तुज आणिल आपोंआप ॥ १ ॥
माझ्या पातकांची रास । देवा पाडील इरेस ॥ २ ॥
" आजवरी थोरथोर । पायीं नेले पतित घोर– ॥ ३ ॥
परि याचें पाप फार । पाहूं होतो का उद्धार–" ॥ ४ ॥
म्हणे " ×× " ऐशा भरीं । देवा याल माझ्या घरीं ॥ ५ ॥

८

नेघे देवा तुझ्या नांवा । तुझामाझा उभा दावा ॥ १ ॥
नामें उद्धारिले सारे । मीच एक राहिन बारे ॥ २ ॥

तुझ्या नांवा गालबोट । सुखें खावे दांत ओठ ॥ ३ ॥
पाहूं बोलाविल्यावीण ॥ हरी कां तें माझा शीण ॥ ४ ॥
देवा तुझी घ्यावया लाज ॥ " XX " ठाकलासे आज ॥ ५ ॥

९

काय महिमा नामांकित । आज दाखवा प्रचीत ॥ १ ॥
पूर्वीं नांव झालें फार । नको त्याचा बडिवार ॥ २ ॥
दावि मज प्रत्यय कांहीं । नको संतांची ती ग्वाही ॥ ३ ॥
देणेंघेणें हातीं हात ॥ उधारीची नाहीं बात ॥ ४ ॥
धन्य " XX " भाग्यवंत ॥ देवा तुझा पाही अंत ॥ ५ ॥

१०

काळयवनाच्या भेणें । दडी पाण्यापोटीं देणें ॥ १ ॥
धाकें आणि दैत्याच्याच । मोहिनीचा केला नाच ॥ २ ॥
काच बळीचा अगोचर । देवा झाला मूठभर ॥ ३ ॥
परि येतां पापें माझीं । कुठें दडाल देवाजी ॥ ४ ॥
म्हणे "XX" धीटपाठ । येथें अस्सलाशीं गांठ ॥ ५ ॥

---

## ४ विचार.

[ विचार ज्याच्यात्याच्या पाठीस लागलाच आहे; त्याची ओळख कशाला करून द्यावयाला पाहिजे ! ]

विचार करितां तुजविषयीं,
गुंग विचारा ! मन होई, ॥ ध्रु ॥
दिवसभरी करूनी धंदा,
गुलाम पोटाचा बंदा;
पडे न तो थकव्यासाठीं—
तोंच लागसी त्यापाठीं !
ताळतंत न तुला कांहीं,
आदि अंत तुजला नाहीं !
दया न अंतरिं,
करिसी स्वारी,
सदा तयावरि—
खपती जे पोटाबारी
या जगतच्या बाजारीं

[ २ ]

तूं असली बहु नवल परी,
विश्रांतीचा कामकरी,
निद्रा तव करितां नाश,
स्वप्नांतहि देसी त्रास !
झोंप जागती तयांप्रती,
ज्यासीं तूं धरिसी हातीं.

नसत्या आधि
स्वैर शतावधि
निर्मुनि आधीं,
क्षणोंक्षणीं मग वाढविसी
विश्वामित्र दुजा गमसी !

[ ३ ]

विपत्तिकाळीं आह्मांसी,
न कदाही टाकुनि जासी !
मित्र ह्मणावें तुला जरी,
देह जाळिसी सदा तरी !
शत्रु ह्मणावें जरि तुजशीं,
यत्न हितास्तव तरि करिशी !
"कसें करूं मी,
काय करूं मी,"
ध्रुवपद नामी
हें तुझिया रडगाण्याचें,
नांव न संकट जाण्याचें !

[ ४ ]

करिसी एकांती गर्दी,
एकांतहि जनसंमर्दी.
जागा असतां कुणि त्यासी,
पुढची स्वप्नें दाखविसी !
भिजतां कोणी त्याकरवीं,
करविसि तूं कामें बरवीं
देउन ह्मणशी,
सुंदर खाशी,
"उद्यां" नराशीं
"आज" हातिंची परि हरिसी,
मृगजळिं मनुजा खेळविशी !

[ ५ ]

पुत्र भविष्यत्कालाचा,
जन्मसि त्या आधीं साचा.
चिंता जननी तुझी जरी,
घात इच्छिसी तिचा तरी.
वाढायाची गति अतुला,
काळाहुनि बहु वेग तुला.
दीन जनांवर,
लोभ अनावर,
करिसि निरंतर,
विचित्र लीला जशी तुझी.
तशी नाढळे जगीं दुजी !

---

## ५ गोड निराशा.

जादूची माझी बाग
तींत फुलें जागोजाग;
रम्य जरी बागाईत,
तरी तिची न्यारी रीत,
कळी कोंवळी चांफ्याची
मिटलेली ती कायमची,
जरि न कधीं उमलायाची
करिल वृष्टि तरि वासाची;
तशाच कोणी,
सूत्रावांचुनि,
दिधल्या रचुनी
कुंदाच्या वेण्या दोन
मोल जिवाचा त्यां होन !

नाहीं पाणी जरि भवतीं
तरी दोन कमळें हसती,
जन्म जलामधिं कमळांचा
न्याय असे हा जगताचा,
परि या कमळांच्या रंगा
खेळे प्रेमाची गंगा !
तुमच्या जगतीं,
किरणें पडतीं
कमळें फुलतीं,
परि माझीं कमळेंच बघा
निज किरणीं खुलविती जगा !
गुलाब होते दोन तसे,
आनंदाचे गोड ठसे,
कळ्यांवांचुनी फुललेले
कांट्यांच्या त्रासा चुकले;
जणूं फडकतीं मौजेचीं
नवीं निशाणें लाजेचीं
गुलाब असलें
हांसत बसले,
मनांत ठसले,
हृदयीं धरिलें या भावा
एकतरी काढुनि न्यावा !
परी फुलें तीं जादूचीं
लपंडाव खेळति साचीं,
रक्षण त्यांचें करणार
मनांतला जादूगार !
दिसतां हातीं लागतना,
वेड लावलें तेंच मना,
क्षणांत फुलती
क्षणांत लपती
दिसती हंसती
घेर घेतला गिर्कीचा
फेर थरकत्या फिर्कीचा !
निश्चय केला जिंकाया
जादूची असली माया,
तोंडानें उडवायाचा
मंत्र हाकिला प्रेमाचा,
श्वासानें हृदयीं भरिला
मनिं वाटे आतां धरिला;
परि तो कुठला
गवसायाला !
तसाच उरला,
अधिक पसरला चहूंकडे,
तोडितांच उलटा वाढे !
यत्न मांडिला तोच पुन्हां
जीव गुलाबावीण सुना,
स्वस्थानांतुनि हलत नसे
काढावा तो वाटतसे,
गुलाब तर न मिळे मजला
परि कांटे मम देहाला !
त्या कुसुमाचे
संसर्गाचे
कांटे साचे
मांडिति अगीं थैमान !
कांट्यांचें माजे रान !
कोण असा जादूगार
खेळ करी हा अनिवार ?
उघड्या वरती टाकुनियां
राखी ती फुलती दुनिया;
चोरितांच वाटे ऐशी

चोरीची थट्टा खाशी !
चित्त शरमलें,
जरी विरमलें,
तरिही रमलें,
चोरी असली लाजेची
वाटे त्याला मौजेची !
अशी निराशा भरे मनीं
शरीर भरलें कांट्यांनीं,
गुलाब मज हांसत बसला
हाताशीं नाहीं आला,
नवल तरी कैसें होई !
दुःख निराशा नच देई !
न कळे कांहीं,
हुरहुर कां ही ?
वेडें मन ही
का विनवितसे देवासी ?—
निराशाच दे गोड अशी !

## ६ पुनर्जात प्रेमास

प्रेमा ! ऊठ—चल उघड झांकली मूठ !
तुंबळ सागर तव खळबळला,
हृदयीं तटवूं त्यास कशाला ?
जगभर लाटा उधळायाला
दिली तुज सूट—चल उघड झांकली मूठ !
कोंडुनि असला सागर धरिला,
माझा मूर्खपणा मज कळला
मिळतां स्थळ तुज नाचायाला
करीं रे लूट—चल उघड झांकली मूठ !
उगवे सूर्य काल मावळता,
फिरूनी फुलतें फुलही मिटतां,
प्राण जीवना ! तुज कीं शिवतां
मरण हें झूट—चल उघड झांकली मूठ !
क्षणभर वाटत होतें मजला
कीं तव ओघ आटुनी गेला
परि जो अखंड भरला त्याला
कशाची तूट—चल उघड झांकली मूठ !
द्वेषावरतीं दुःखावरतीं
फिरवीं तुझ्या यशाची मूर्ती

जा, जा, नाच सर्वही जगतीं
धांव बेछूट—चल उघड झांकली मूठ !
विसरुनि जाऊं अनुभवजाला,
तुडवूं पायीं चल खेदाला,
टाकूं जाळुनि नैराश्याला,
दुःख सब झूट—चल उघड झांकली मूठ !
तुझिया श्वासाच्या उद्गारें,
टाकूं भरुनि जगहें सारें—
एकच नादें करूं अतारे
सुखाची लूट—चल उघड झांकली मूठ !
मी तूं दूर न राहूं आतां
दाखवु शक्ति अपुली जगता
आणू परमेश्वरही हातां
ऊठ रे ऊठ—चल उघड झांकली मूठ !

---

## ७ " सुगुणरूप "

" धन्य पंढरी धन्य भीवरा धन्य चंद्रभागा ॥
" भक्तांसाठीं वैकुंठींचा नाथ जिथें जागा ॥ ध्रु ॥
" स्वानंदाचा गाभा शोभा ब्रम्हमंडलाची ॥
" वैरागरिचें रत्न मनोहर आशा पुण्याची ॥
" कैवल्याचें निधान केवळ माता संतांची ॥
" तो प्रभु झाला सगुण सांवळा गोकुळिच्या रंगा ॥ १ ॥ धन्य ॥
" भक्तराज तो पुंडलीक या जगीं एक जाणा ॥
" हांक जयाची ऐकुनी धांवे लक्ष्मीचा राणा ॥
" करावयास्तव जगत्रयाच्या अखंड कल्याणा ॥
" कटिंकर समपद विटेवरी करि उभा पांडुरंगा ॥ २ ॥ धन्य ॥
" स्वच्छंदें सच्चिदानंदपद रमे वाळवंटीं ॥
" जय जय विठ्ठल " नाद एक हा संतांचें कंठीं ॥
" पहावया स्वानंद सोहळा सुर करिती दाटी ॥
" पुंडलीक वरदा हरि विठ्ठल " रंगवि दिग्भागा ॥ ३ ॥ धन्य ॥

---

# “ केशव महादेव सोनाळकर ”

[ या चांद्रसेनीय कायस्थ प्रभुकविचा जन्म शालीवाहन शके १८०८ पौषांत ( इ स. १८८६ जानेवारींत ) झाला. कोंकणातील “ मुरबाड ” हें यांचें मूळ गांव असून त्यांचें मराठी शिक्षण तेथेंच झालें व इंग्रजी पेण व आर्यनएज्युकेशन सोसायटींत झालें सध्यां हे जळगांवीं ( खानदेशांत ) वकिली करीत आहेत कविता करण्याचा नाद याना फार लहानपणापासून असून त्याकामीं त्याना, गणपतराव बोकड रिटायर्ड इन्स्पेक्टर व प्रख्यात कवि बालकवि यांनीं चांगलें उत्तेजन दिलें. दुर्दैवास, स्मृतिपिशाच, प्रेमजीवन, प्रेमसंशोधन, तुजसाठीं,—शांति, प्रेममीलन, प्रेम कीं मृत्यु, प्रेमपुनर्दर्शन, स्वर्गावतरण, प्रेमरहस्य दिव्यविसर्जन, सत्प्रेम-मंत्र, सत्प्रेमसाक्षात्कार वगैरे याच्या बऱ्याच स्फुट कविता असून जगत्समाचार, काव्य रत्नावलि, मा मनोरंजन वि ज्ञा. विस्तार, नवयुग, महाराष्ट्रसाहित्य, खेळगडी यांत प्रकाशित झाल्या आहेत

यांनीं टेनिनसनच्या प्रिंसेसच्या आधारें “ कमला ” नामक महाकाव्याचें सर्ग लिहिले होते. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं तें काव्य हरवल्यामुळें रसिकवर्गापुढें येऊं शकलें नाहीं यांनीं एकदोन नाटकेंही लिहिलीं आहेत अलीकडे त्यांचा आध्यात्मशास्त्रावर बराच व्यासंग झाला असून तद्विषयक त्यांचे विचार “ अमृत-तुषार ” या सदराखालीं अमळनेर एथें प्रसिद्ध होणाऱ्या “ तत्व-ज्ञान मंदिर ” मासिकांतून प्रसिद्ध होत आहेत. ]

## १ अश्रुमाला.

हृद्योद्यानीं प्रीतिलतेला बहर फुलांचा आला !!
अश्रुमिषें तीं पडति धरेवरि गुंफ तयाची माला !!
त्या अश्रूची माल ॥ मजला पाहूं दे चिरकाल !!
विरहवन्हिनें हृदय पोळलें व्याकुळ जीव जहाला !!
रमण स्मरणें येउनि ज्यांनीं शान्तविलें हृदयाला !!
त्या सुमनांची माल !! मजला पाहूं दे चिरकाल !!

घालविण्या तव कोप चुंबिलें नाथें तुझिया गाला !!
प्रेमें तेव्हां ढाळिलेंस तूं ज्या प्रेमाश्रुजलाला !!
त्या मोत्यांची माल !! मजला पाहूं दे चिरकाल !!
स्वप्नीं पाहुनि नाथ संकटीं ज्या दुःखाश्रुजलाला !!
उषःकालपर्यंत ढाळुनी भिजविलेस शय्येला !!!
त्या रत्नांची माल !! मजला पाहूं दे चिरकाल !!
जग हो जेव्हा घोरतमोमय पंथ दिसेना कांहीं !!
स्वर्ग तदा प्रत्यक्ष दाविला ज्या दिव्याश्रुजलांहीं !!
त्या अश्रूंची माल !! मजला पाहूं दे चिरकाल !!

---

## २ विषाचा प्याला

पदः—( चाल·—भूपती खरे तें. )

सप्रेम विषाचा पेला धरितां वदनीं
मज कळे येति कां अश्रुपूर मन्नयनीं
जे कढे हृदय वर चढे तयाची वाफ
मग अश्रुमिषें ती वाहे आपोआप.
नच दुःखाचे हे अश्रु सुखाचे असती
प्रेमपूर्ण हृदया यांची कळते महती
चाल.—येउं दे सतत हे माझ्या—लोचनीं
रोमरंध्रिं हें विष राहो–सांठुनी
माधुरी तयाची जाणें–मी मनीं
मत्समान असती जे जगतीं या साचे
ते सुधा झुगारुनि प्राशन करिती याचें

---

[ " विषाचा पेला " ही कविता बालकविकडे पाठविल्यानंतर त्यास प्रत्युत्तर म्हणून " प्रीति हवी तर " ही बालकविंची कविता जन्मास आलेली आहे. ]

## ३ तुजसाठीं—

( पद चाल:—वीरा भ्रमरा जन्मुनि )

तुजसाठीं, नच रसिका रिझवायाला हृदयेश्वरी ॥
फुलें मत्काव्य-कमल अंतरीं ॥
नयनोत्सव कौमुदी कारणें सरसीं कुमुदावली ॥
प्रमोदें प्रफुल्ल हो भूतळीं ॥
सुधा-तुल्य मधु जरि आकर्षी लोलुप भ्रमरावली ॥
न कमलें त्यासाठीं जन्मलीं ॥
प्रेमदेवता तूं माझी, मी भक्त तुझा गे पुरा ॥
प्रेम दे मातें मधुरा गिरा ॥
चाल ॥ हृत्पटल रेखण्या मूर्ति तव गोजिरी ॥
गुणरूप गावया तव, वाणी सुंदरी ॥
अर्पिली विधीनें सत्य हीच वैखरी ॥
चिरसंगम तव व्हावा म्हणुनी कविता देवी सती ॥
॥ हृदीं मत् वास करी संमती ॥

## ४ " बघुनी हें वाटे खंती—"

( पद. चाल:—नृपममता रामावरती )

जगताच्या या बाजारीं
कृत्रिमता भरली सारी ॥ वाटतें ॥
हृदयाच्या स्वार्थी वृत्ती
साम्राज्य जगावरि करिती ॥ वाटतें ॥
सरलता
तशी दिव्यता
कुणी दावितां
संशयें भ्रमती ॥ बघुनी हें वाटे खंती ॥ मानसीं ॥

संबंध सर्व प्रेमाचें
स्वार्थमूल असती साचे ॥ ठरविती ॥
पावित्र्य मनोवृत्तींचें ॥
स्त्रीपुरुषीं असणें कैचें ? ॥ ठरविती ॥
यापरी
विषारी सुरी
मारुनी उरीं
दिव्यता वधिती
बघुनी हें वाटे खंती ॥ मानसीं ॥

---

## ५ प्रेम रहस्य

( पद चालः—उद्यां बघ जातें )

प्रीति ग बाला । वाजवी तंतुवाद्याला ॥ ध्रु ॥
जीवसृष्टिची सतार करुनी ॥
मनोवृत्तिच्या तारांवरुनी ॥
कोमल कर अपुला फिरवोनी ॥
सुस्वरतेला ॥ लाजवीत वाटे बाला ॥ १ ॥

सप्त लोक मधु रवें भारुनी ॥
विश्वांची अनभिषिक्त राणी ॥
बसली तेजोमय सिंहासनिं ॥
ब्रह्मांडाला ॥ नवजीवन अर्पायाला ॥ २ ॥

प्रभा जियेची दिव्य पसरली ॥
व्यापुनि जी ब्रह्मांडा उरली ॥
जिनें आणिला स्वर्ग भूतलीं ॥
शिकवायाला ॥ समतेच्या गूढार्थाला ॥ ३ ॥

सुर मानव हा भेद न उरला ॥
रंक राव शब्दार्थ लोपला ॥

दिव्य ओळखी दिव्यत्वाला ॥
सुखदुःखाला ॥ दिव्यत्वीं मोक्ष मिळाला ॥ ४ ॥
प्रीति-हेतु, परमेश यांतली ॥
भेदबुद्धि येथेंच निमाली ॥
प्रीति भक्ति दिव्यत्वें झाली ॥
दिव्यत्वाला ॥ स्वभूं हा भेद कशाला ॥ ५ ॥

---

## ६ द्वैत कीं अद्वैत.

( पद चाल उद्धवा शांतवन कर जा )

समशेर प्रीतिची नकळे । जगतांत दुधारी राही ।
अद्वैत द्वैत वा बरवें । प्रश्नीं ही शंका येई ! ।
सर्वस्व प्रीतिचें ज्यातें । लाभे, तो होइ विदेही ।
आनंद हर्ष प्रेमाचा । लाभणें शक्य त्या नाहीं ।
प्रेमरूप होतां त्यातें । अद्वैत आडवें येई ! ।
चाल ॥ प्रेमाचें प्रेमळ गाणें ।
जें इतरा मंजुळवाणें ॥
आपण तें एकाचि होणें ॥
तज्जन्य सौख्य मग नाहीं ॥ १ ॥
प्रेम-हेतु, प्रेमी ऐसे । भिन्नत्वें नातें राही ॥
सत्प्रेमीं वृत्ती जयांच्या । रमल्या त्या दोघानाही ॥
एक तानता वृत्तींची । आल्हाद निरतिशय देई ॥
चाल ॥ मन । काया । वाचा । यांनीं ॥
एकरूप व्हावें म्हणुनी
विनविती प्रभूला दोन्ही ! ॥

---

**टीपः**—द्वैत कीं अद्वैत कवितेचे पहिले २ कडवे माझे असून ३ रें कडवें हें कै. गोविंदाग्रजांनीं तावडतोब लिहल्या तेथें उत्तर म्हणून दिलेलें आहे. म्हणून तेवढें त्यांच्या नांवाखालीं आहे. —के. म. सो.

शंका मग सहजीं येई ॥
समशेर प्रीतिची नकळे । जगतांत दुधारी राही ॥ २ ॥

* * * *

समशेर दुधारी दिसलां । कां भीसी ऐसा बा ! रे ! ॥
मरणाची मिळकत लोकीं । तूं मी हें विश्वचि सारें ॥
या कीं त्या धारेवरती । मरणाचें लागे वारें ॥
चाल ॥ जरि शेवट एकचि साचा ॥
मग वृथा वाद दोघांचा ॥
कोणीही कोठें नाचा ॥
प्रेमांतचि होवो कांहीं ॥
तो नाच जरी प्रेमाचा । मग वादचि राहत नाहीं ॥ ३ ॥

" गोविंदाग्रज "

---

## ७ " प्रेमयज्ञ "

[ स्वार्थत्याग व प्रसंगविशेषीं प्राणत्याग हीं सत्यप्रेमाचीं भयंकर दिव्यें होत. ]

भूषित करिसी वसुधरा
सख्या पांखरा रसिकवरा
प्रणय गूढ उकलोनि जनीं
प्रणयरूप जासी बनुनी
म्हणोत कोणी
जन अज्ञानी
" अविचारें दीपावरती
त्वां आपुली दिधली अहुती" ॥ १ ॥
ममत्व अंतरिं ठेवोनी
वांञ्छिति प्रणयीं सौख्य कुणी ?
विकारवश जीं अशीं मनें
तींच निंदातिल तुला सुने

प्रीति-हेतुला
सर्वस्वाला
अर्पुनि तूं तन्मय होसी
पूज्य म्हणुनि गणितों तुजसी ॥ २ ॥
प्रणयरूपिणी मधुर सुधा
प्राशुनिया विधिनें बहुधा
मूर्ति तुझी गोजिरवाणी
निर्मियलीसे सत्य जनीं
कारण त्याविण
प्रेमाकर्षण
जें अद्भुत त्वद्हृदीं वसे
संभवेल तें सख्या कसें ? ॥ ३ ॥
प्रेम तुझा जीवन-हेतू
तूं प्रेमाचा बिसतंतू
अमूर्त प्रेमाची मूर्ती
दिव्य दीपिकेची ज्योती
मोक्ष—काल सा
वाटुनि सहसा
तन्मय तू सखया होसी
वेडें परि मजला करिसी ॥ ४ ॥

---

## ८ प्रतिभादर्शन.

सृष्टिसतीची जी प्रतिमा । सहज लाजवी तिलोत्तमा ।
हृदयाची माझ्या देवी । ती न कशी सांगा व्हावी ? ।
गुंतत तच्चरणीं असतां । कोण सती ती ? कां पुसतां ।
वसंत आगमनें लाली । वदा कुणाच्या ये गालीं ? ।
रहस्य परि याचें कोणी । विचारिलें कां तिज अजुनी ।

चारुतरा परि ती बघुनी । मुनिहि जाती गुंगोनी ।
जन संपर्क मुळीं न जिथें । तिज संगें रमती तेथें ।

❀ ❀ ❀

गद्याचा हो अंत जिथें । काव्याचा आरंभ तिथें ।
कुंठित हो जेथें वाचा । जन्म तिथें कल्पकतेचा ।
सृष्टीच्या सौंदर्यांची । परमावधि होतां साची ।
स्वर्गीच्या सौंदर्याचा । अरुणोदय होई साचा ।
मग कवि मानस चंडोल । मोदभरें बोले बोल ।
कशास पुसणें मग त्यातें । कोण तया वाचा देतें ? ।

❀ ❀ ❀

दिव्य चंद्रिका मन्मनिंची । सन्मन्निध खेळे साची ।
तद्दर्शन मात्रें स्फुरती । पवित्र ज्या हृदयीं वृत्ती ।
त्या वृत्तींची नवमाला । अर्पितसे वाग्देवीला ।
सृष्टिसतीची पवित्रता । बालमुखीं दिसते आतां ।
जननीच्या अंकावरतीं । " कमल" दलींबिंदू सम ती ।
बाला जी गोजिरवाणी । ती रचिते माझीं गाणीं

---

## ९ गोड वेड

( पद, चाल—उद्धवाशांतवन कर जा )

[ हृदयाची एकाच शब्दाची घडाडणारी भाषा अनेक शद्बाच्या कल्लोळांत आपण विसरल्यामुळें, आपणाला हृदयाचे खेळ कळत नाहींत ! आकाशांत गड-गडणारा देवाचा एकाच शद्बाचा संदेश आपल्याला कळत नसल्यामुळें देवाची सहज लीला आपणास गूढ स्वरूपाची वाटूं लागते ! ]

के. वा. गोविंदाग्रज.

पुण्य प्रभाव

हा कोलाहल विश्वाचा । चालला अखंडित बाई ॥
या नादब्रम्हीं वाटे । जीव हा घाबरुनि जाई ॥
या अनंत नादामाजीं । आवडे प्रेम-रव मातें ॥
हृदयाच्या साऱ्या वृत्ती । परिसाया उत्सुक त्यातें ॥

चाल ॥ चौघडा मनोवृत्तींचा ॥
सारखा झडे हा साचा ॥
मृदु सुस्वर सत्प्रेमाचा ॥
त्यामधेंच लोपुनि जाई ॥ १ ॥

❀ ❀ ❀

पिळुनिया पंचप्राणांच्या ॥ तारा मी बसलें बाई ॥
परि सतार आयुष्याची । कां सुरेल लागत नाहीं ? ॥
चाल॥ मंजुळ तो रव प्रेमाचा ॥
आत्मा जो नादरसाचा ॥
श्रवणीं नच पडतां साचा ॥
घाबरा जीव हा होई ॥

❀ ❀ ❀

वेडी मी झालें आतां । लागला एक मज चाळा ॥
" या कोलाहलिं विश्वाच्या । ऐकणें प्रीतिच्या बोला " ॥
चाल ॥ प्रेमाचे प्रेमळ बोल ॥
जे जीवा करिति विलोल ॥
ऐकाया त्यातें मोल ॥
जीवाचें देईन बाई ॥ २ ॥

---

## १० प्रेमगीत.

" God measures souls by their capacity
For entertaining his best Angel Love,
Who loveth most is nearest kin to God
Who is all Love or Nothing "

' *Ella Wheeler Wilcox*

गीत गातसे प्रेमाचें
नावडतें जें जनतेचें ?
' प्रेम ' शब्द वदतां वाचें
वृत्तपत्रिं टीका नाचे !

धन्य रसिकवर ते जगतीं
आत्मवंचना जे करिती !
प्रेम ब्रह्म हें एक असे
तत्व तयां कळणार कसें ?

दूषित हो ज्यांची दृष्टी
दूषित त्यां दिसते सृष्टि
कथ्यावलि सत्प्रेमाची
नीति करी दूषित ज्यांची
नीतिभंग त्यांतें गणणें
नीतीची थट्टा करणें !
नीतीच्या नांवावरती
दंभाचा विक्रय करिती !
कामवासना सत्प्रीती
एकचि जे गणती चित्तीं
स्वार्थरहित सत्प्रेमाची
ओळख ज्यां नसते साची
समाधान त्यांचें करणें
कला ही न विधिही जाणें !
प्रेमावांचुनि जे प्रेमीं
वाछिति ते समजा कामी
प्रेम-हेतु परमेश पदीं
भेद न जे धरिती भगदीं
सत्प्रेमाची ते महती
सत्य जाणती भूवरतीं
निःस्वार्थी मातृप्रेम
उच्च-पदीं चढलें म्हणून !
साधु प्रेम सर्वां भूतीं
सारखेंच राहे चित्तीं
एक साधु सगळी अवनी
जे निज प्रेमें उद्धरुनी,
त्या योगानें ही वसुधा
तुच्छ मानिते स्वर्गसुधा !
प्रेममयीं ईश्वर मूर्ती
सर्व धर्म ऐसे वदती
अंशभूत मी ईश्वरना ?
प्रेम न कां समजेल मना ?
सत्प्रेमाचें त्या गीत
माधवसुत ' केशव ' गात.

# “ Bee ”

[ यांचा जन्म इ. स १८७२ त झाला. मनोरंजनाच्या सुप्रसिद्ध कवींपैकीं हे एक असून, यांचा कवितासंग्रह थोडा असून उत्कृष्ट आहे. ]

## १ बुलबुल.

निबिड तिमिर वर नभीं संचरे,
तळीं उष्ण निश्वसती वारे,
सरणांचे भोंवतीं निखारे,
अशा या स्थानीं—ये पिंपळ वर उगवोनी.
चिरव्यथित चैतन्य ज्योती
खिन्न तेज वितरिते सभोंतीं,
जीर्ण विरल तरुपर्णांवरती
दुःख निर्वाण—उमटवी ठसा निज पूर्ण !
उपेक्षिलेली पहिली प्रीति
रम्योदास तसें एकान्तीं
एकस्थल या रौद्र शान्तीं
विराजत राहे—परिमळें किं दरवळताहे.
पांडुर मृदु लावण्यद्युतिजल
स्थलपरिसर करि ढाळुनि निर्मल
आतिलता कुणि एकच केवल
अदय नियतीनें—लाविली गमे स्वकरानें
देह शिथिल अति फिकट पांढरा
पाहुनि होई जीव घाबरा,
वाटे सुटतां उडविल वारा
पर्णसंभारा—वर भिरभिर सैरा वैरा.
लागो वारा पाउस पाणी,
कुणी धृष्टकर टाको खुरडुनि,
तरि वरि भर ये वोसंडोनी

विकासशीला—ही आज तशीच उद्यांला.
करुणामय स्खलैलना कोणी
दिव्याश्रूंचें शिंपुनि पाणी
संतत संगोपी कीं जपुनी

प्राणवेल्हाळा—ही जाई राजस बाळा.
मृदुल धवल नव कुसुमशालिनी
व्रतस्थेस या अवलोकोनी
सहजोद्गारें वदतिल रमणी

" अगाइग नवल—ही जाई नच येथील !
" वसंत न करी चैत्रशिंपणें
" डोलत रविकर न करी येणें
" झुरे न अंतरिं तरिही तेणें

" अगाइग नवल—ही जाइ न या महिवरिल.
" साहुनि राहे कडक हिंवाळा
" कुंजाचा आधार न इजला
" तरी भोगकल्लोळ सोहळा

" फुलांचा भोगी—ही जाई नवशा जोगी ! "
चिन्मय पंखाचा अलबेला
पक्षी पडतां नच दृष्टीला
येई तत्सन्निध रात्रीला

प्रेमघायाळ—भटकोनी रानोमाळ !
चाले त्याचा दीर्घ निशेभर
गूढ भावमय मृदु गीतस्वर
जणुं निर्झर वीणा-झंकार

किं बुलबुल बोले—वनराई मोहुनि डोले !
हृदयिं खवळला शोक सागर
कठांतुनि तरि निघती सुस्वर
येती ऐकुनि होती ते नर

स्वच्छंदि फंदी—नादाच्या ब्रह्मानंदीं !
भासे त्या स्वयमेवचि केली
प्रीति हाय ! ती वाया गेली
नयनाश्रू ओघळती खालीं
चाखिती धुंद—दुःखाचा परमानंद !
उदास रजनी नच सपावी
जागर दुःखें हीं सोसावीं
चित्त तयांचें असेंचि भावी
विलक्षण भारी —विरुताची जादूगारी !
दिशा फांकती—तेज उगवतें—
प्रभात होतें—गीत थांबतें—
त्या सरसें तें दृश्य वितळतें
तेजबंबाळीं—रम्याची होते होळी !
उत्कटतेनें हृदय फोडिती
ते स्वैरस्वर रूपा येती
कोणी म्हणती त्यांत उमटती
स्पष्ट साचार—राधेचे नामोच्चार !

---

## २ विचारतरंग.

[ चाल—गजाननाची करुनि स्तुति ]

नीलप्रभ निर्मल गगनीं
विशुद्ध वाहे सुरतटिनी
पारावारीं समवदुनी
रमती विबुधरमणरमणी.
चंद्र सुधामय पुष्करिणी
गगनाला शोभा आणी
दीप्तींचीं लेवुनि दुकुलें
तारागण तेथें जमले.

क्षुब्धार्णवजलमग्नाला
दाखविती हे मार्गाला
भोगाचा कर्तव्याचा
मेळ मनोहर हा साचा !
वाटे, तारा होवोनी
विचरावें अवघ्या भुवनीं
धरणीच्या हृदयावरती
क्षेपुनि कर हंसवावी ती !

[ २ ]
विहगमोत्तम कीं व्हावें
आकाशीं वरवर जावें !
नूतन नूतन प्रांतातें
आक्रमुनी जावें वरतें.
उदयगिरीच्या पलीकडे
बालरवीचा किरण पडे
प्रथम करुनि त्याला प्रणती
शुभवार्ता कळवूं जगतीं—
"घोर निशा संपुन गेली !
मंगल वेळ जवळ आली !
खंत सोडुनी कामाला
लागा, रवि उदया आला !"
हताश जे झाले स्वजन
चैतन्याचें संचरण
करणें त्यांच्या देहांत
भाग्य हें थोड्यांना प्राप्त !

[ ३ ]
सोप्या सोप्या शब्दांनीं,
स्फूर्तीसूत्रें गुंफोनी,
मंजुळ मंजुळशीं गाणीं
रचुनी रसिकान्त:करणीं—
हळू शिरावें चोरोनी,
जावें मीपण लोपोनी,
हौस मनीं ही असे परी
टीका तींत विफल करी !
अंत:करणपटावरती
आत्यंतिक वेगें उठती
दिव्य लेख उन्मेषाचे
धरावयातें स्मृति काचे.
बुद्धीच्या भिंगावरती
बिंबित ज्या प्रतिमा होती
शब्दचित्र त्यांचें कसलें
नकळे काढिल मन दुबळें !

[ ४ ]
सरस्वतीकंठाभरण
वाचुनि हें वरचें कवन
गद्गद वदला हांसोन
"'धन्य कवी ! कविता धन्य !
शब्दचमत्कृति यांत नसे,
गांभीर्याचा लेश नसे,
सत्याचाही गंध नसे
'हनुमंताचें पुच्छ जसें !'"
वानर होता नर झाला
ग्रहण लागलें ग्रहगोलां
धूमकेतु गगनीं आला
विषय असे घ्या कवनाला.
सिद्धांत घेउनि शास्त्रांचे
करा कथन त्या सत्याचें
पुरे पुरे कल्पना पुरे
काळ मागला आज सरे.

[ ५ ]
थांबा थांबा रसिकवरा !
गिरा आपुली पुरे करा !
प्राण कल्पना काव्याला
न कळे हें मतिमंदाला.
एक न धड भाराभर ती
चिंध्यांची खोगिरभरती

तुटपुंज्या ज्ञानें फुगती
रसज्ञ अपणाला ह्मणती.
पंडितपण त रसिकपण
बहुधा असती हीं भिन्न
दोहोंचा अन्वय एकीं
सांप्रत दुर्मिळ ह्या लोकीं !
महाराष्ट्रकविपरंपरा
खंड न पडला तिला जरा
उणीव रसिकांचीच परी
आज भासते खरोखरी
भौतिक शास्त्रीं वा काव्यीं
कल्पकता वैभव मिरवी

अभेद मज दोहोंत दिसे
कोण शहाणें, कोण पिसें ?
जें जें विश्वीं ज्ञेय असे
त्यांत कल्पना मात्र वसे
करा कल्पना वजा बरें
ह्मणजे बाकी शून्य उरे !

[ ६ ]

संगम हृदयंगम साचा
ह्मणाल अलि या युगलाचा,
अथवा सजन रसिकाचा
सहजमनोहर कवितेचा !

---

## २ डंका.

तेजाचे तारे तुटले,
मग मळेचि सगळे पिकले !
लागती दुहीच्या आगी
राष्ट्राच्या संसाराला,
अति महापूर पुर येतो
ढोंग्यांच्या पवित्र्याला;
खडबडाट उडवी जेव्हां
कोरड्या विधींचा मेळा,
चरकांत मान्यवर पिळती
सामान्य मुकी जनता ती,
लटक्याला मोलें येतीं,
कौटिल्य स्वैर बोकाळे !
तेजाचे तारे तुटले !
आचारविचारौघाचा

नव नित्य रक्तसंचार–
ज्या समाजदेहीं होता
अनिरुद्ध करित व्यापार,
त्या देहा ठायीं ठायीं
घट कसले बंध अपार,
कोंडिलें स्वार्थकोंड्यांत
तरि धूर्त त्यांस तीर्थत्व
जल सडलें तें निभ्रान्त,
देउनी नाडिती भोळे !
तेजाचे तारे टतुले !
कर्तव्य आणि श्रेयाची
हो दिशाभूल जेव्हां ती,
आंधळा त्याग उपजोनी
डोहळे भिकेचे पडती;

अतिरेक पूज्यभावाचे
  फुंकिती विवेकज्योति,
    मग जुन्या आप्तवाक्यातें
    भलतिशीच महती येते,
    राणीची दासी होते,
बुद्धीचे फुटती डोळे !
  तेजाचे तारे तुटले !
घन तिमिरीं घोर अघोरी
  विक्राळ मसण जागविती,
ती ' परंपरा आर्यांची '
  ' संस्कृती,' ' शिष्टरुढी ' ती;
'धर्मादि' प्रेत झाल्यांचीं
  बेफाम भुतें नाचविती,
  ही दंगल जेव्हां होते,
  नाकळेचि कोठुन कीं तें,
  येतात बंडवाले ते,
जग हालें ' स्वागत ' बोलें !
  तेजाचे तारे तुटले !
या बड्या बंडवाल्यांत
  ज्ञानेश्वर मानें पहिला,
मोठ्यांच्या सिद्धान्तांचा
  घेतला पुरा पडताळा,
डांगोरा फोलकटाचा
  पिटविला अलम् दुनियेला,
    झुंजोनी देवां दैत्या
' अमृता ' माधें न्हाणीं, जनता;
  उजळिला मराठी माथा,
सत्तेचे प्रत्यय आले !
  तेजाचे तारे तुटले !
हिमतीनें अपुल्या प्रान्तीं
  उत्क्रान्ति शान्तिमय केली,
प्रेमाच्या पायावरती
  समतेचि इमारत रचली,
अंगचीं करामत ज्यानीं
  ' खलिद्दा ' समर्पित केली,
    ढाळिले अश्रु जें त्यांनीं,
    सागरांबर-श्री-धरणी-
    निज उदरीं या शुद्धांनीं
आहेत जतन ते केले,
  तेजाचे तारे तुटले !
लागला वार अंगाला,
  रंगला यशानें त्याचे,
घासला साहणेवरती,
  ओकला लोळ अग्नीचे,
जाळला तदा दर्पानें,
  भंदील रेणु वायूचे,
    आम्ही त्या दिल्जानाचे
    साथी—ना मेलेल्याचे-
    हे डंके झडती त्यांचे,
ऐकोत कान असलेले !
  तेजाचे तारे तुटले !

# ४ वात्सल्य.

पूर्वेला स्पर्शुनि शशि अस्तंगत झाला;
उदरस्थ बिंब तदनंतर ये उदयाला.
पाहतां पुत्रमुख अश्रु तिचे ओघळले,
हिम होउनि होते ते सृष्टीवर पडले.
व्योमस्थ दृश्यसाम्य तें तदा मनिं वरलें
पाहिलें, नष्ट शैशवस्मरण टवटवलें.
निष्कलंक मुख, विस्तीर्ण भाळ तेजाळ,
तनुवर्ण धवल, करुणालय नयन रसाळ.
ती मातृदेवता उंच समोर करांत
शिशु धरूनि होती तन्मुखदृक्सुख पीत
या निखळ सुखाचा सहकारी प्रेमाचा
तो होता तिजला अंतरला जन्माचा.
दामिनीदामसम दारुणतर तें स्मरण
हदरवी स्फुरुनियां तदीय अंतःकरण-
हृदयाच्या दिसला खोल कपारी–आंत
शून्याचा अंधुक देश अपार अनंत,
दुःखाचा अन्त प्रवाह वाहत होता,
ओलावा त्याचा स्फोट मुखीं हो करिता
पर्णस्थ बिंदु मृदु गंधवाह हलवोनी
दों बिंदूंतें करि एकजीव मिळवोनी,
या विश्वकदंबीं तेंवि मातृबिंदूतें
शिशुबिंदु मिळे जगदंबदयामृतवातें.
आरक्तरेणुरविहास्य उधळलें तिकडे,
तें उदित बालसुमहास्यपरागहि इकडे.
तें बालभानुपदलास्य नभावर चाले,
ते मातृहृदावर चचल शिशुपद–चाळे
पाहतां प्रभातीं बालजगा वर खालीं
कृष्णस्मृति संपुनि मातृमुखीं ये लाली,

सद्गदित हृदय तद्गात्रांसह थरथरलें,
नेत्रांतुनि अविरत वात्सल्याश्रु गळाले.
वात्सल्य दिसें तें बहुविध विश्वविकासीं,
तें विश्वात्म्याचे विमल हास्य अविनाशी
तें स्वार्थसमर्पण धन्य परार्थासाठीं
प्रत्यक्ष निर्मितें स्वर्ग धरेच्या पाठीं.

---

## ५ पिंगा.

माझा पिंगा गोड गडे !
अद्भुयरंगीं रंग चढे.
नाचण मी मुळची मोठी,
उद्भवल्या माझ्या पोटीं
कोमल नवनीतापरिस,
ज्योत्स्नेहुनि कान्ती सरस,
दिग्रागांहुनि दिव्यतर,
चंचल चपलेच्याहि पर
वृत्ति गोरट्या अकलंकी—
माय तशा झाल्या लेकी !

[ २ ]

प्रसन्न हृदयाच्या कोशीं
असती सौरभरसराशी
त्यांस लुटाया पोट भरी
वृत्ती झाल्या हो भ्रमरी !
गोंगाटाला थांबविलें,
श्रवणमनाला नच कळलें,
कौशल्याची नवलाई
रस चोरुनि प्याल्या बाई !
तो भ्रमदांचा संभार
लोटुनि आला अनिवार,
बळेंचि माझा धरुनि कर
मज केलें नृत्याकार.
धुंद नशा भरली नेत्रीं,
जीवन मुसमुसलें गात्रीं.
गुरुलघुतेची कृत्रिम ती
पार उडाली मम भ्रांती
मिळून आह्मी सर्वजणी
नाच मांडिला एकपणीं.
अनेक नेत्रांचें बघणें,
अनेक कंठांचें गाणें,
अनेक चरणांचें जाणें,
अनेक चित्तांचें स्फुरणें,
दृष्टी, वाणी, गती, मती
एकच येथुन तेथुन ती.
प्रवाह बहुमुख जो होता
वाहे एकमुखें आतां,
वृत्तींचें बळ मज मिळतां
विश्व सहज आलें गिळतां.

[ ३ ]

पिंगा माझा सोन्याचा,

पिंजरा रत्नाचा त्याचा,
पहा ! उघडिलें दाराला,
पिंगा आकाशीं गेला !
पिंगा माझा अलौकिक
शोधुनि आला भूलोक.
चारी खाणी मी वाणी
सांगितलें त्यानें कानीं !
पिंगा गेला स्वर्गाला,
भूवरि वेडनि त्या आला.
अंध्रितलीं दडपुनि त्याला
नाच वरि त्या मांडियला !
दानव मानव सुरासुर
मी, मजविण ते निःसार !
मी येतां उदयोन्मुखतें
जग तेव्हांची संभवतें !
दुर्बलपण पाहिलें गेलें,
क्षुद्रपणांतुन मी सुटलें,
जीर्ण बंध सारे तुटले,
मी माझी मज सांपडलें !
स्वार्थजनित सद्गुणभास
जडले होते अंगास
ते गुण झाले मम धर्म
प्रेमास्तव आतां प्रेम !
तारा सारंगीवरल्या
योग्य सुरीं लागुन गेल्या;
भूतें आलीं साम्याला
मोहर आनंदा आला !

विश्वबंधुता एकांगी
न पुरे माझ्या पासंगीं,
भूतें मी–मजला नातें
द्वैत कसें हें संभवतें ?
मज कसलें जाणें येणें !
भाव–अभावाविण असणें.
बुद्बुद हो कीं कल्लोळ
अर्णवपद माझें अढळ !

[ ४ ]

काय करूं–पण कसें करूं !
मीपण माझें कां विसरूं ?
'दीपकळे ग ! दीप्तीला
सोड—' म्हणे का बुध तिजला
म्लानपणाविण लावण्य,
क्षीणपणाविण तारुण्य,
मंगलमांगल्यायतन,
नित्यानंद निरावरण,
विश्ववैभवालंकरण,
तें माझें तें स्वयंपण !

[ ५ ]

पिंगा आला भर रंगा,
आत्मभाव भिडला अंगा.
नाच परि मम राहीना,
स्वभाव मुळचा जाईना !
नाचा माझ्या वृत्तींनों !
नाचा भुवनसमूहांनों !
नाच आपला भूतांला
होवो शान्तिप्रद सकलां !

# कवन गुच्छ.

## भाग २ रा.

## कवि-श्रीयुत " आनंद "

[ याचें नांव विनायक लक्ष्मण बरवे असें असून यांचा जन्म चिपळूण येथें इ स. १८९८ मे महिन्यांत झाला, प्राथमिक व दुय्यम शिक्षण गांवींच होऊन, नंतर मुंबई येथें विल्सनन कॉलेजांत उच्च शिक्षण संपादून इ. स. १९२१ सालीं बी ए झाले हल्लीं ते कायद्याचा अभ्यास करीत आहेत. यांची बरीच स्फुट कविता महाराष्ट्रांतील प्रमुख मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध होत आहे यानी " प्रेमाची मात " व " दिलदौलत " अशी दोन नाटकें आणि " गझल-गीत " या नावाचें काव्य लिहिलें आहे. ]

### १ गीतातुर.

[ गीत वादनाची तयारी झाल्यापासून, वादनाला सुरवात होईपर्यंत मधला काळ गीतातुर रसिकाला निर्वाणीच्या क्षणा इतकाच प्रसगाचा वाटत असेल. ]

चाल-( नाचत ना गगनात—)

तरलित तारांकीत गीता ! विलसित हो लहरींत ॥ ध्रु० ॥
हरिणतारा
अमृतधारा
जडिल्या या वीण्यांत, गीता ! १
डोलत कां बसलेंसी गीता । झुळझुळंदे तव नाद ॥
वीत-राग मय
वीत-शोकमय
गान शून्य देहांत गीता ! २

हृदयाच्या भवनांत, गीता । कवितेवरि करि मात ॥
वाट कशाची ?
पाडि असाची
नादाची बरसात, गीता ! ३

रागिणिचा अनुराग, गीता । अंगुलिचा आघात ॥
उमटविण्याला
योग्य एकला
त्यांची सर न दुज्यांत, गीता ! ४

पदाघात लतिकांस । कराघात गीतांस ॥
पुष्पित करिती
बहर भराविती
ब्रह्म उसळुदे शांत गीता ! ५

मखमाली गादींत गीता । रंभोरू मृदुतेंत ॥
वीणा रमली
कवळुन बसली
चंदेरी पदरांत गीता ! ६

धांवत दे आधार गीता । स्वर स्फुरवी हृदयांत ॥
अतरंग हा
खुला तुज, पहा
खुलवी, करि मन शान्त, गीता ! ७

चंद्र चढे गालांत गीता । नूपुर दे तुज साथ ॥
अधर फुरफुरे
तार सरसरे
टाक उडी हृदयांत, गीता ! ८

अंतरिंच्या काव्यांत, गीता । स्मृतिमय उद्यानांत ॥
जाइ जुरोनी
राहि भरोनी
विहर सुखें चिरकाल ! गीता ! ९

नेत्र बसे विण्यांत, गीता । हृदय उभें कानांत ॥
लागे हुरहुर
मीं गीतातुर,
झणिं चल दे मज हात, गीता ! १०

---

## २ लढाईवर जातांना——

॥ चल रोख ठोक दे निरोप निर्वाणीचा
॥ रणशिंग ऐक !—मी बंदा शिवशाहीचा !
॥ गरुडाचि भरारी घेउन जातों समरीं
॥ ती रणात अमुची हटुन राहिली नजरी
॥ हळकुंड बांध या करात जगदंबेचें
॥ या समशेरीवर कोर टिळे कुंकवाचे
॥ ही उगाच लगबग ! कळी उमलली पुरती
॥ तो पदर नाचतो हृदयाच्या वरवरतीं
॥ कलतुनी मान दाविशी कलत हंसाची
॥ ही झुकली दुनिया कां तव मुख–कमलाची
॥ वाकली इमारत कमरेची मुलतानीं
॥ नच गहिवर दावूं रूप करिल मुलतानी
॥ कर बोट धरून देईन लाजेला थारा
॥ मिटुनिया मूठ झाकुनी टाक क्षण सारा
॥ चल उचल तुझा तो दंडाचा दरवाजा
॥ लपवून ठेव हा क्षण प्रेमाचा माझा
॥ या हृदयांवरती ठेव जराशी मान
॥ हं एकच चुंबन ! हास अता बेभान
॥ उभयतां उजवुं हा एकच क्षण या रीती
॥ मग कुणी धरावी जड जीवाची भीती !
॥ झुरमुरूं नको ग, पहा डोकसे दुरुन

॥ तो अबलख वारू खडा उभारुन मान
॥ वर जर्द पठ्याचें जीन कलगी संगीन
॥ पहा टांच देउनी चढी दौंड घेईन'
॥ जातों हां—सुखानें रहा—" रिकबिला पाय
लागला तोंच—

---

## ३ त्रिगुणात्मक घंटा

### घंटा १ ली

सृष्टीचे नवनाद छंद मनुजास वंद्य जाहलें
त्रिकाल संध्या दिवस वर्षहि अयने युग चालले
वेदांच्या उत्पत्तिकारणा, नाद धारणा धरी
तंत, वितत, धन, सुस्वर घोषें प्रणव स्फुरे भूवरी
ब्रम्ह्यानें फुलविला गोल अति लोल डुले कविमति
जीवित साम्राज्याच्या कान्तीं घंटारव दाविती
लडिवाळा अलबेल, छबेला छेल खुळखुळा करीं
नाचायला गृहास लावी हृदयें खेचुन धरी
घुंगुरवाला सुंदर बाळा गळां घागरी नवी
नाद जयाचे अणुरेणूंतुन काव्यशास्त्र बोलवी
गोवत्साचा संग, तयामाधिं दंग, बाळ रंगलें
घुंगुर घंटा गळां बांधुनी नाचविण्या गुंगले
'काळी कपिली गाय, जिवाची माय, तियेच्या गळां
घंटा घणघण नाद उमलवी बाळमनाचा कळा
गाडीला घातले बैल, सोडिले सैल, कांसरे
झुमझुम नादें उपरागें मन स्नेहरसव सरसरे
बालमनींची धांव, सुखाचे भाव, मोद पाझरे
कवळ्या हृदयीं प्रेम पालवे चिद्‍वृत्ती बावरे
घंटेनें अव्याज दील बुडविलें भूलसागरीं
सात्विकतेची उषा विखुरली शैशवकालावरी

* * * *

## घंटा २ री

तारांची तरलीत जात, गगनांत गात राहिली
यामिनि मुरकी मुरळ भरविते प्रणयीजनहृद्दलीं
नवयौवन उन्माद बहर, उडविला कहर मानसीं
तरुण वयाचें मंदिर खुललें रजोगुण दे मुसमुसीं
आयुष्याचा द्वितिय याम, सौंदर्य धाम मधुरसा
कामलता उद्दाम फांकली अनल पेटवी नसा
दयितांच्या चरणांत झणित नूपूर रणित राजसा
आव्हाहन करिती तरुणांच्या मानसिक सारसा
पद नूपुर किंकिणी ध्वान्त तन्मणी, ऐकितां स्वरा
चतुर जनांचा तरल नूर हो ! प्रामाणिक ही गिरा
कंकणरव झंकार, ठण टंकार जोडवीं करी
जागृत करि कामास नेत्रहि राजस रजसें भरी
घंटेच्या ह्या भिन्नजाति, नादास देति तानता
रजोगुणाची रसमात्रा होईल कशी अन्यथा
वीतराग हृदयांत, पडे बरसात बहकली मति
अनुमानें अतिवेगें निघती, मनोरथाहुन गती !
सत्वाचा अनुवाद थिजे, पडसाद भिजे मागुती
तारुण्यांतिल धीर डळमळे, कोसळली उन्नती
हा घंटारव असा, प्रथमिंचा तसा, भिन्नगुण असे
भिन्नाघातें चिच्छक्तीवर ठसे ठसविती कसे ?

* * * *

## घंटा ३ री

घडिमागुन लोटते घडी, संध्येंत उडी टाकली
मार्गप्रतीक्षा काळ करी तों निशादेवि पातली
जीवाचा उतरता काळ वार्धक्य जाळ लागला
जरा पसरतां जरा भीरु नर भीतीनें भागला
तों घंटास्वन येत, शांत नादांत, देवळांतुनी
जसा झोत काव्याचा यावा दुःखी राष्ट्रांतुनी

देवालयिं वाजली घांट, आध्यात्म वाट दाखवी
वयोवृद्ध खडबडला, जैसा राष्ट्रा उठवी कवि
घंटेचा परिसतां सूर, लागली हूर तत्क्षणीं
उद्वेगानें मानससमता चळों लागली क्षणीं
जीवाचा भूत्पिंड, खंड ब्रम्हांड तमीं व्यापिला
कृतांतकाची खंत लागली, अंत उभा ठाकला
कर्मांचें अनुताप भूत, धुवुनियां हात, पाठिशीं—?
पुढें हालते छाया कसली ! आशेची धुसधुशी
रागानें पाडिलें गूढ, कर्तव्यमूढ जाहला
तमोगुणाचा जळता गोळा जीवानें कवळिला
सत्वांतुन उतरला राज, तामसी गाजला क्षणीं
अशी परिणली लाक्षणिक परी उमगुन घ्यावी कुणी !
त्रिगुणात्मक किंकिणी घांट, संसार हाट रेखिला
वर्तविती क्षरआयुष्याच्या त्रिदशा सद्बुद्धिला

---

# ४ तुटकी तरवार !

[साताऱ्याला एका मराठे सरदाराच्या घरीं पाहिलेल्या तुटक्या तरवारी संबधीं]

समरखेळनी सांग कुठिल तूं दुबळाइत प्यारी ।
रास नांव तव काय ? कुणाची होतिस अखत्यारी ?
कुणा विराची कमर खेचुनी बसलिस अलबेली ।
स्वारीवरच्या कुणा जिवाची रखवाली केली ? ॥
ज्या मर्दानें जिनगी जुमला विकुन तुझ्यासाठीं— ।
तुझ्या जिवावर नांव कराया, केलि मोल–पाटी ! ॥
त्या वीराच्या उजळ यशानें हंसलिस का केव्हां ? ।
रुधिरानें न्हाउनी माखुनी मुसमुसलिस जेव्हां ! ॥
लुसलुसत्या नवल्या धरतीचे सोडुनिया ओट ।
मुलुखामुलुखीं वीर निघाला धरून तुझें बोट ॥
त्या वीराच्या कुळ गोताचा राखाया तोरा ।
सांग कधीं धजलीस कराया गैबीचा मारा ॥

पहिल्या पदराच्या लाजेतिल तोडोनी छबिने ।
मानेवरती तुला टाकुनी गेला तडफेनें ॥
पोरपणामधिं तुझा घरधनी बनुन भला वीर ।
शूर शिवदित जाउन दडला, असला इतबार ! ॥
सडेतोडीचा सलाभ म्हणुनी देताना घाव ।
राखिलास का ऐन तुफानीं लढवय्या राव ! ॥
पोर मराठा दावित होता ही असली माया ।
शिवरायाच्या परंपरेला बरखत आणाया ॥
वीर तुझा तो नाचत असतां शिरांगणवरतीं ।
अहेवूपणानें आणिलीस का कुंक्वाला भरती !
माने पुढतीं मान कापुनी मारुन दळभारी ॥
मान मारितां मोडुन पडलीस ! कांहीं दिलदारी !
ऐन बरिची झुंज रंगली, तो क्षण साधोनी ॥
खाउन कच मोडलां, चरकली चढणारी ज्वानी ।
शूर शाहिराच्या हृदयावर पाजविली तुजला ॥
शिवशाहीचे पाणी पिउनी घात कसा केला ? ।
कुण्या हातचा डाग तुझ्यावर असला ओढवला ॥
निजलेल्या बेसावधतेचा खून काय केला ? ।
कुळशिळवंता परनारीवर डाळुनिया डोळा ॥
हयवानाची बनुन सहेली घात काय केला ? ।
झालिस केंव्हां फंदफितुरिची कमअस्सल राख ॥
तेंच पाप तव उभें राहुनी मारि तुला हाक !! ।
जुलमी अधमांच्या मंत्रानीं करुन दगा फटका ॥
मोडुन पडलिस विकल होउनी गिळताना घुटका ? ।
पापि मनाची उंच पातकें साचुन तव भालीं ॥
म्हणुन अशी का छिन्न होउनी जगलिस या काळीं ।
तुटक्या टोकानें तुज पुढच्या राखियलें देशा ॥
हाय जगोनी म्यानामधली झालिस दरवेशा ! ।
तुझ्या जिभेची वीज रखरखी विझुन कशी गेली ॥

माय देशाची लाज नागडी बघणें तव भालीं !! ।
तुझ्या मुठीवर नाचत होता मर्दाचा हात ॥
तिथेच निजली माय देशची काळोखी रात !! ।
रणतीर्थांची जाफत केलिस शिराउरावरतीं ॥
आज परी तुज खाउन बसली गंज ताब पुरती !!
कशास तुजला दोष लावणें गेला तो देश ॥
आज राहिला मायभूमिचा नुसता निर्देश !! ।
पाकपितर त्या रणमस्तांची करण्या बदनामी ॥
जशी राहिलिस आजवरी तूं, तसेच हे आम्ही !! ।
तव तुटलेल्या पात्यावरती इतिहासी पान ॥
कसें कळावें अम्हास, आम्हीं बनलो नादान !! ।
रक्त उसळतें हीच नको का बनवाया शाई ॥
लिखाण कसलें, लेखण भाला हीच लोकशाही ।
तोंड तुतारी करुन फुंकणें बहिऱ्याचे कान ॥
कोट कमानीसह दुमदुमुदे तरुणांचे रान ! ।
तुटक्या तरवारी ! तू बसलिस होउन बेमानी ॥
नांव तुझें ठेऊन ओतिली शब्दांतून वाणी !!

* * * *

तुटक्या तरवारी ! तुज पुढती नमलिं शिर सहज ।
कुर्निसात घे त्यांतच असुचा पहिल्यानें आज ! ॥

---

## ९ भिरभिर वारे.

उशास पर्वत घेउन, सागर—
निद्रा करिती भू-शय्येवर
कलकल तालातून वाहला शांत रसाचा नाद
तयाचा स्वप्नामधिं पडसाद !
सुखशय्येतिल सागर, असला
अथांग शांतीनें भरलेला

त्यास हलकुनी फुंक मारितो दर्यांच्या नस्तांत
नाचवी तुफान झंजावात !
अस्मानाचे अफाट वारे
विराट नासांतील फवारे !
अवनितलाला रोधुन नेती गिरकीच्या फेरांत
धराया गगनश्रीचा हात !
मेघराज भरधाव हालती
अनेक जगताची जणुं भरती
वाहुन नेतो वसुंधरेच्या कुठल्याशा क्षितिजांत
करोनी दिग्पालावर मात !
घुमट मनोरे नउ-खण राशी
गोष्टि बोलती अस्मानाशीं
त्यांस हादरुन शिर नमवाया सुचवी वारंवार
जगावर बेछुट तू अनिवार !
वन-रानाचा करुनी पावा
वाजविणारा सुरेल, रावा !
देइ तुझी ही अद्भुत जादू, गाइन मीं जोमांत
घालुनी जनहृदयाला हात !
स्वतंत्रतेचा तू गाणारा,
स्वतंत्रतेवर तूं जगणारा,
भविष्य काळावरचा उचलुन पडदा काळाभोर
दाखवी स्वातंत्र्याची कोर !
भवितव्याच्या उज्वलतेचें—
दिव्य चित्र, झुळकवर नाचे ?
बहिरुन बसल्या आत्म्यावरतीं फिरव तुझ्या करजाल;
थांबवी दुर्दैवाची चाल !
उदास चाले जीवन-झरणी
वरतुन वाटे विषाद-सरणी
प्रणयांवाचुन दील-दिवाण्या आयुष्याचा तोल
कसा कुणि सांभाळावा बोल !

सुने उसासे, माळ तयांची
साहिल कुठली कोण कुणाची ?
एकाकी हत-जीव उदासिन जुळवित एकच सूर
खेळवी हृदयाची हुरहूर ?
कशास तुजला हें रडगाणें,
अनंत काळांतुन तव फिरणें,
सांग कौतुकें सौंदर्याचीं चिर रहाणारीं सांग ?
जयाचा घेउन येशी थांग.
प्रबल तुझ्या भिरभिर वहाणींतुन
उचलुन ने मज या रहाणींतुन
हृदयीं सलतें अन्यायांचें दुर्दम काटेरान
नको तो जगण्याचा सन्मान !
पूर्व शकांतील गूढ भावना
चिरतनांतिल रूढ कल्पना
भटकत भटकत येति तुझ्यातुन त्यांचा मज सहवास
घडावा, ही हृदयाची आस !
स्पर्श तुझा देहावर नाचे
स्पर्श तुझा नयनावर साचे !
त्याच क्षणाला घेइ भरारी बिन-पखाचा राम
सोडुनी या देहाचा धाम !!

---

## ६ राम बोलो भैराम !

( पादा कुलक )

झोपेविण मीं, निराश रजनी—
लोटित होतों उदास शयनीं
गुंगी ताठे नेत्रावरतीं
पुढुन चित्रित स्वप्न सरती
तों, आदळले मम स्वप्नावर

१२४९८ ... (स्वच्छ प्र

खोल मुखांतुन गळलेले सुर
कानीं पडतां मरणच वदले
शब्द खुणेचे रस्त्यामधले.

देवाच्या नांवाची भाषा
योजुन ज्ञाता पुढची आशा
मरणाच्या काव्याची करणें
याविण काय दुजें उमटविणें ?
जागोजागीं स्मशान निर्मित
त्या काव्याचे ध्वनी निनादित
जातां पुढपुढतीच निमाले
शब्द खुणेचे रस्त्यामधले

प्रहर तसा तो सामसुमीचा
घडी जीवाच्या रखवालीचा—
विचार नसता दचकुन पाही
मनीं मांडिली भाले—राई !
चक्रावरती चक्र उलथलें
मनास फसवुन अगतिक केलें
सैरावैरा घुमूं लागले
शब्द खुणेचे रस्त्यामधले

मरण कुणा आलें भगवंता
परि पळभर थकल्या मम चिंता
दुसऱ्याच्या मरणाचा क्षण तो
आत्म-शुद्धिपर कुणा न होतो ?
" कृती स्वतःच्या समतोलानें
" निरखा मरणाच्या मोलानें "
हें कळवाया हवेंत घुमले
शब्द खुणचे रस्त्यामधले

मरणाची धगधगती सीमा
पल्याड कसला अजत्र-खाना ?

लुटूं नये जगतानें यास्तव
अज्ञाताआदींचा विस्तव
टकमक पुढच्या पुढेंच धरिला
त्यांत मानवी देह घेरिला
नातरीं येतिल कुटून असले
शब्द खुणेचे रस्त्यामधले

मरणा पुढची लज्जत कळती
तर जगतें निर्मानव होती !
आयुष्याच्या काळ नदीवर—
बुडणारा, जगतो मरणावर
आयुष्या आशेचा थारा
आशेला मरणांत उतारा
अरुण अशा या गहनावरले
—शब्द खुणेचे रस्त्यामधले

देहाला आत्म्याच्या भेटी
मरणक्षणीं का दे जगजेठी ?
जीवाच्या स्वर्गाला ध्याती
इच्छेची साउलीच हातीं !
पळत्या काळावरी इमारत
मरण—वाट एकच कां त्यांत ?
राम—दाविती कोण यांतले
—शब्द खुणेचे रस्त्यामधले

अनंत तो जिव, कुडी अंतमय
वैषम्याचें अघटित हें द्वय
देह-स्मशानीं जीव घे उडी
कुणी बनविला कुणा सौंगडी ?
जन्माला मरणाशीं बांधी
आत्म्याला अमरत्वीं सांधीं
उकलितात का गूढ यांतलें
—शब्द खुणेचे रस्त्यामधले

जिवत असतां, क्षण मरणाचे
विरुद्धांतिल बावन प्रीतीचे
कितीक येती, येउन जाती
सुखदु.खाच्या नदींत विरती
तसाच किंवा अतर्क्य हा क्षण ?
( मनांतल्या हृदयांत उठे रण )
तें शमवाया हवेंत हसले
—शब्द खुणेचे रस्त्यामधले

जिवंततेचा पडदा सारून
आंत पहावें का मरणातुन ?
चिरंतनाच्या छुरल्या खालीं
असेल का ती चिद्घन लाली ?
त्या शांतीतिल शीत जलानें
सचेल न्हाणित नव लीलेनें—
नव खेडाला, जरी बाणले
—शब्द खुणेचे रस्त्यामधलें

जन्मा पासुनि " राम " फसावा
कुणी करावा शाब्दिक धावा ?
जगण्यासाठीं राम म्हणावें
मरणावेळीं रामच गावें !
कसा कळावा राम असाहा ?
मरण्यावेळीं काय ? अहाहा !
मरणातुन परि काय राहिले !
शब्द खुणेचे मस्त्यामधले.

श्री ग्रंथ संग्रहालय ... नं.

# ७ "गझल् गीत"

( अप्रकाशित " गझल-गीत " नावाच्या काव्यांतील कांहीं उतारे. )

( चाल.—कहाले जाऊं०— )

१

नतांगी येत सामोरी थरारे पुलकिता काया
जडावा नयन नयनाशीं, भिडावी भावना हृदया
स्मितानें सौख्य सुचवीतां मुखाचे शब्द भग वाया
तदा तें प्रेम उभयाचें दुणावी श्रेयसी माया
पळाचा खेळ हा सारा, भविष्या भरून रहाणारा
सुखाचा पाक हा पहिला उसाशानींच हलणारा
करानें उचलितां पेला सुधेचा वरून वहाणारा
मुखाचा स्पर्श परि होतां बनावा आतुनी कोरा !

२

दिलाचा दिलरुबा तुटला जिवाचा शुष्क स्वर वाहे
अकालीं मालवे ज्योती तियेचे गझल् वारस हे !
प्रवाही शशिकला भुरकी जिवाला सौख्यकर होई
सिवांती निरवितां नयनीं तुषारी हतमना येई
उसासे प्रीतिचे सुटतां तयानां साद नभ देई
दुसंगी दुःख जन्माचें, जरा ही कल्पना जाई ॥
प्रदोषीं अचल चित्तानें बसावें शांत एकांतीं
दिसाच्या शून्य-मय गीती-लकेरी तोंच गुणगुणती
नभांकी खेळत्या चपला हुकारा वरतुनी देती
पुढोनी पूर्व कालाचे विरागी चित्र-पट हलती !
इथे जी बेदिली वाहे विषारी जीवना वरुनी
सुधेनें रंगल्या जीवा असावी ठाउकी कुठुनी !

३

तियेची मुखच्छवि पसरी हवाई मधुर सोनेरी
गुलाबी सांज कीं दुसरी जहाली मानवी नारी !
उषाका बालिका स्वरुपीं विलासी वासना मारी !
सभोती शांतता आणी सुखाची देव अधिकारी

वनश्री सहज सौंदर्यी सजोनी गमत जणुं आली !
विण्याची स्वप्न-मय वाणी सुरेली मूर्त जणुं झाली
समाधी प्रेम-गीतांची, अशी का स्त्री-मिषें ल्याली !
रुपाचा ईश्वरी हेतू जगाला शिकविण्या आली !
मनाची शुद्धता करणें नसे का श्रेष्ठ हा महिमा ?
जिथें सौंदर्य दिव्य तिथें प्रभूची जागती प्रतिमा.

४

तृषार्ता भागल्या जीवा मिळेना थेंब-भर पाणी
जहाल्या तृप्त जीवेच्छा, अशांना अमृतीं न्हाणी !
हताशा कंटकीं विव्हळे अशांना शब्द-शर हाणी
दुसंगी दैव दुष्पंथी जगाला विषमता आणी !
भुकेल्या अर्ध-पोटाला पुरेसा घास आशेचा
उदासी चाळल्या हृदया निवारा प्रेम-शब्दाचा
मनाच्या सर्व रोगानां उतारा एक मायेचा
परी तें उलट या जगतीं ! वदाया ना उरे वाचा !
अपुर्तें काव्य जिवनाचें, अपुर्त्या वासना ओली
प्रभूनें पत्रिका भालीं कुणाच्या पूर्ण आखियली ?

---

## ८ अंबरा-रोहण.

वनवन करितां काव्य कलेसह-जोस्नेवरुनी नभीं
पाहिली धवलभुजा कामिनी ॥
नीलांबरिचा पदर बांधिला, वातायनिं राहुनी
सुखविते बिंबाधर शालिनी
पवनावरुनी क्रीडन करण्या पतंग जो सोडिला
तयाची सूत्री धरि गुणखनी ॥
आरोहण स्वर्गावरि करण्या न धजे तो शठ तरीं
चडफडे अंतरिं ती मानिनी ॥
हुतुक्यामध्यें मरुद्राज ये गरगर गरगर फिरे
स्तब्धता पावे वातायनीं ॥

रसिकानंदें तरल होवुनीं, केशपाशिचीं फुलें
घेतलीं कचगुच्छा सोडुनी ॥
गल्लगुलाबावरुनि धावली, कृष्णकुंतलावली
तृप्त हो स्तनयुगला भोगुनीं ॥
पवनवराला वाटुनि हेवा, वेगें घालुनि उडी
पळविली पार्श्व-शरीरांगणी ॥
है कामिजनांचे खेळ असे सोसुनी
ती सुत्री करिची अल्प अल्प सोडुनी—
त्या पतंगराजा चढवी वरतीं झणी
बाह्य जगाला विसरुनि ललना दृष्टिरूप चालली
पतंगीं एकचित्त ठेवुनीं ॥ १ ॥

❀ ❀ ❀ ❀

शशि-अंकावरि कपिल यामिनी निद्रावश जाहली
विसरली विनयाला भामिनी ॥
म्हणून पतिला लाञ्छन जहाली, कृष्णडागही दिसे.
परी तो भूषण चंद्राननीं ॥
वासंतिक मधुचंद्र असा हा पूर्ण कलानीं नटे
शांत करि अवनीतल हांसुनी ॥
अंतरिक्षिची नितान्त स्वर्नदी पुष्पाचा पसरिते—
स्रोत, नवलाख तारकांगणीं ॥
धराहि बहरे बसंत मार्गीं, यावा पुष्पित दिसे
डोलती दिग्गज मोहुनि मनीं ॥
समया ऐशा पतंग चढला, हेलावे सरसरे
चंद्रिका वेधायाला झणीं ॥
पतंग झोला पाहुनि वाटे काय दुजा चंद्र हा
घालितो स्वर्गाला गवसणी ॥
किंवा वाटे मृत्युलोकिचें सत्वतेज हें वरी
चाललें धिक् लोका मानुनी ॥

कीं पतिव्रतांची तेजोमयता जनीं
न धजे रहाया, जहाली दुनिया सुनी
कीं उदात्ततेचा आत्मा चिंतामणी—
शरीर सोडुन पाश छेदुनी स्वैर गतिक संचरे
बिथरली ग्रहमाला देखुनी ॥ २ ॥

❀ ❀ ❀ ❀

पतंग चढला धावे वरतीं नयनालाहि न दिसे
बावरी होवुन जा मानिनी ॥
रसिक राजसा सूत्री ओढी खळ तो परि •नावरें
गुंगला बाष्प जणूं सेडनीं ॥
प्रेमाचा हा डाव संपला, उदासतेची कळा
पसरली सहजीं कमलाननीं ॥
" वेल्हाळे का हताश होसी ! देइन मीं सत्वरीं
हृदयींचा पतंग, मम काढुनी ॥
हत्-पटला खालीं दडलेला पहा राजहंसहा—
जिवाचा मम काव्याचा हा धनी ॥
कल्पकतेच्या धाग्यावरुनी तरंगत जाया वरीं
सज्ज कर चतुरे ! गजगामिनी ॥
ह्या वसुधेचा पतग शशि सुखखनीं
मम आत्मराज तव पतग गे शोभिनी !
तव दृष्टि प्रेषणीं अंबरिं जाइल झणी
पतंगलीला तुझ्या देखिल्या, ठसल्या ज्या मन्मनीं
अळविल्या काव्यामाधिं गाडनीं " ॥ ३ ॥

---

## ९ —स

( **चाल**—उठ हरी झडकरी राधा आली० )

पाहिल्या सालर झोपे मधुनी
स्वप्नसंगमीं तुज पाहोनी

जागा झालों मचक-शयनीं
सभोवार पाहियलें नयनीं
शांत गतीनें वायु झुळझुळे
खुले चांदिणें बाहिर ढवळें
केविलवाणी आशा फिरते । येई राजसे कविता झुरते
कविता विरते !

गंधवती परिमळ दरवळतो
मनांत जैसा विचार सरतो
कंठ-भरानें कोकिळ गाई
एकाकी, मज दडपण होई !
यावेळीं तव हृदया जवळी
प्रणयबद्ध लावावी टाळी !
दीन-दिवाणी आशा फिरते । हृदय राजसे कविता झुरते
कविता विरते !

जादूची जहरी मादकता
नैराश्याची मद-मोहकता
सुकल्या ओंठावर ठाठरते
जीवाची ज्योतहि तडफडते !
याच क्षणाला तव हृदयावर
मान ठेउनीं मरणें सुंदर
मरण्यासाठीं मन गहिंवरतें ! येई राजसे कविता झुरते
कविता विरते !

---

## १० कोळणीचें गाणें.

[ एका वैभवशाली कवीच्या सहवासांत असतांना असल्या वेडगळ गाण्याचा उद्बोध होण्यात आश्चर्य कसले ? शिवाय कसल्याहि गाण्यानें श्रम हे हलकेच होणार ! ]

चांद बिजेचा नभावरी
पाहुन उमले विभावरी

कवळुन बसली दारापाशीं पाय घेईना पुढें मुळीं
ही नाव खुळी ?
सख्या साजणी या ग जरा
वाट पहात इचा धनी घरा
लोटुन देऊं इला माहालीं, पाहुन घेईल पती भला
या धरूं तिला
तुफान वारा भिरीभिरी
चाल ग नावे पती-घरीं
हृदयावरतीं तुला ठेवण्या हात लाटेचा पुढें करी
या थडीवरी
पोरपणातिल तुझे दिन
लाजुन आले झाले-पण
नाव नवी तूं दर्यासंगें गोडी चालव हवीतशी
ग जशी खुशी
कलकल शब्दें तुझा पती
बोलुन पहिली दावि प्रीति
सागर हृदयावरतीं लोळतां संसाराच्या जशा तऱ्हा
त्या दिके जरा !
पाणी चढते खळाळले
अथांग झालें प्रेमामुळें
नाव पतीच्या करांत मुरली पदर शिडाचा असे नसे
तें कुणा दिसे ?
नवती नार बांधुनि शिड
लाज रुसे पदराच्या आड
काय तरी पती ! पदर उडविला, चिंधी चोळा तिचा असा
हा करी कसा
कवळी काजळी माझी नाव
हलका सलका तिचा भाव
प्रेम लुटी मधिं कुठें लोपली ! गाऊं कशाला वेड्या वाणीं
ग साजणी ?

---

# केशवकुमार.

[ यांचा जन्म १२ आगष्ट १८९८ साली पुणें जिल्ह्यांतील सासवड येथें झाला. यांचें नाव प्रल्हाद केशव अत्रे असें असून हे देशस्थ ब्राह्मण आहेत. यांचे प्राथमिक शिक्षण पुणें येथील नेटिव्ह इन्स्टीटयूशनमध्यें झालें. व उच्च शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमध्यें झालें. हे इ स. १९१९ सालीं बी. ए. ची परिक्षा पास झाले हल्लीं हे मुंबई येथील न्यू हायस्कूलमध्यें शिक्षक आहेत. यांच्या फुटकळ कविता " मनोरंजन " " नवयुग " " उद्यान ' " काव्यरत्नावली " मधून प्रसिद्ध होत असतात. लो टिळकांच्या मृत्यूवर " अकरावा अवतार," हें लहानसें खंडकाव्य त्यांनीं लिहिलेलें आहे. ]

## १ स—

चंद्राची चढती कला झुलविते पृथ्वीवरी सागरा,
नाचे हर्षभरें मयूर बघुनी मेघावली धूसरा,
स्वर्गींच्या जलदेवतेस्तव तृषा लागे सदा चातका,
बैसे लावुनि ध्यान पर्वत तसा स्वर्भूकडे सारखा,
कोठें कोण ? परस्परांत कसला संबंध कांहीं नसे,
किंवा इच्छितलाभ होइल अशी आशा न कोणा असे,
प्रेमानें झुलतात जीव जरि ते आजन्म वेड्यापरी,
आनंद क्षणमात्र मी न मग कां गावें तुला सुंदरी ?
किंवा दुर्लभ तूं असून मजला, गावें तुला मी कसें ?
प्रेमाचें बवणें परी न असतें लाभाकडे फारसें !
विश्वाच्या फुलवाटिकेंत फुललें सौंदर्य जें राजसें,—
त्यातें पाहुनिया दुरूनि झुरणें हें रम्य भारी असे !
रूपाचा तरि गंध दे उधळुनी विश्वांत जा तूं कसा,
तेणें होडनि धुद अक्षय मला येथें पडू दे असा !

## २ संगीत–श्रवण.

बाले, थांब जरा–क्षमा कर–तुझे गाणें करी हे पुरे,
झाला व्याकुळ जीव, धीर हृदयीं आतां न कांहीं उरे !
कांठाला भिडली शराब अगदीं ! प्याला जिवाचा भरे,
आतां थेंबहि टाकशील तर हा सांडेल सारा बरें !
गाण्याची चढली निशा, वहिरल्या बेभान या भावना,
रोमांचातुनि कापरें थरथरे, माझें मला भान ना !
जीवाचा चुकणार तोल बघ हा ! आतां सखे, सावरी—
तारूं हें फुटकें बुडेल भरल्या दर्यामधे ना तरी !
वाहोनी सरिताजलावरि जशीं जातीं फुलें सागरीं,
माझे प्राण तसें सुरासह तुझ्या गेले अनंतोदरीं,
गीत-ब्रह्मजलांत जीव पडता आतां असा पोहणी,
सारें जीवनगीत होय मजला बेसूर हें साजणी !
बोलूं काय पुढें ?—न शब्द उमटे, चाले न हा श्वासही,
बाले, यास्तव टाकितों क्षणभरी स्कंधीं तुझ्या मान ही !

---

## ३ प्रभात–तारा.

प्रभात झाली, दिशा निवळल्या मावळली रजनी,
ब्रह्मांडाच्या डोळ्यावरची आसरली ग्लानी !
फेर थांबला आकाशींचा दमल्या सुररमणी,
एका मागुनि एक घरोघर त्या गेल्या निघुनी.
स्वर्गाच्या कुंजांत एकटी खिन्न वदन करुनी,
वाट कुणाची बघते अजुनी ही ताराराणी ?

❀ ❀ ❀ ❀

सोडुनि गेल्या सर्व मैत्रिणी अवचित काय हिला,
स्तब्ध राहिली ह्मणुन भयाकुल होउनि ही बाला ?
कीं आकाशीं वेचुनि नेलीं फुलें अप्सरानीं,
फूल त्यांतलें एक राहिलें एवढेंच चुकुनी ?

बालरवीच्या स्वागतार्थ कीं गगनश्री नटली,
तिनें लाविली काय कपाळीं वज्रांची टिकली ?
जाण्याच्या घाईंत रजनिचा चंद्रहार तुटला,
त्यामधला हा हिरा सांडुनी काय नभीं पडला !
गगनाच्या तबकांत लावुनी काय निरंजन हें—
कुणी उगवत्या परमेशाला ओवाळित आहे ?
कुणास झाली उषा-रवीच्या लग्नाची घाई,
मंगलाक्षता म्हणुनि उधळलीं वधूवरांवर ही !
गगनश्रीला सोडुनि जातां विरही चंद्राची,
ही आशा कीं एक तिच्यावर उरली शेवटची !
मृतशय्येवर पडली रजनी कीं तेजोहीन,
कंठीं घोटाळतो काय हा अजुनि तिचा प्राण !
स्वर्देवीच्या विरहाची कीं वेळ सरत आली,
ओझरतो हा आनंदाचा अश्रु तिच्या गालीं !
कुणा विलासी गंधर्वाचें विमान हें अजुनी—
प्रभात झाली तरी फिरतसे एकटेंच गगनीं !

* * * *

हळुच कुणी इतुक्यांत उघडिलें पूर्वेचें दार,
बावरली विरहाकुल तारा, सुटे सर्व धीर !
सोन्याचा पोषाख चढवुनी तो सूर्यापुढतीं,
हांसतहांसत तिचा चिमुकला आला प्राणपती !
" हृदयेशा जागलें रात्रभर किती तुह्मासाठीं—
पुरे गडे जिवलगा, पाहतां आतां अंत किती !–"
बघतांबघतां नाचत मुरडत ती चंचल पुतळी,
क्षणात लपली रविकिरणाच्या कोमल करजालीं !

---

## ४ लज्जागीत.

लाज गडे लाडके ! एकदां लाज गडे पुरती !
हृदयाची एवढीच आशा आतां या जगतीं !

तव लज्जेचें गुलाबपाणी लाजत वाहूं दे !
मृदु वर्षावें त्या ही सगळी सृष्टी लाजूं दे !
लाजत लाजत खेळ खेळती लज्जेच्या पुतळ्या,
आकाशाच्या निळ्या अंगणीं या वेलीं सगळ्या.
ज्योत्स्नेच्या बुरख्यांतुन बघ ही अल्लडशी पोर—
हळूच बघते लाजलाजरी चंद्राची कोर !
त्या लज्जेची मंगल गंगा पाझरते खालीं,
विश्व लाजतें, रजनी तर ही त्यातच विरघळली !
प्रभात-देवी लाजुनी बसली या क्षितिजामागें,
अरुण उगवतां नाचत हांसत बघ येईल वेगें !
पक्षी निजले ! पुष्पें निजलीं ! निजल्या फुलवेली !—
निजल्या कसल्या ! लज्जेनें परि निश्चल तीं झालीं !
वाग्देवी ही माझी लाजे गातां या समयीं,
काव्यस्फूर्ती जागी असुनी ताळयावर नाहीं !
लज्जेचें लागलें असें हें वेड पुरें जगता,
'लाजा ! लाजा !' चराचरांना वदतें तें आतां !
लाजायाची लाज कशाला मग तुजला व्हावी ?
लाज गडे हं ! हळुच लाज ग !—कुणि पाहत नाहीं !
हृदयीं बसला जरी आपल्या प्रीतीचा मेळ,
वदनिं तुझ्या सारखा पडेलची लज्जेचा खेळ !
तव गालीं लज्जेची फुलल्या लाव बागशाई !
भिजव सारखी प्रणयाश्रूंच्या तिजला वर्षावीं !
प्रीतीची फुलवेल फुलव तव लज्जा-पुष्पांनीं !
-धरींन हृदयीं अशी जिवाची लाजाळू राणी !
प्रीतिदेवते ! उधळ हिच्यावर लज्जेचा रंग !
लज्जेच्या रोमांचीं सगळ थरथरुंदे अंग !
प्रेमचितार्‍या ! एकसारखीं लज्जा-चित्रें हीं,
कपोल-फलकीं हिच्या मनोरम रंगवीत राहीं !
प्रेम शारदा-प्रवाह थांबविं तव मिटल्या वदनीं,

गालावर कीं फुटतिल त्याच्या लज्जा-निर्झरिणी !
खुल्या मनाचा भाव कळाया शब्दाची आशा—
कशास तुजला ? लज्जा केवळ प्रणयाची भाषा !
लाल पताका या लज्जेच्या-छे !-भगवे झेंडे !—
प्रणयाच्या किल्ल्यावर या तव अक्षय फडकूं दे !
विश्व मरो वा तरो तयाची कोण करी परवा ?
या चित्राचा लाभ सदोदित मम नयनां व्हावा !
ध्यानीं स्वप्नीं अशी दिसावी लज्जेची मूर्ती !
मरतांनाही दृश्य असावें हें डोळ्यांपुढतीं !
" अशीच क्षणभर उभी रहा !"-कीं तुज बघतां बघतां—
गजत 'केशव-कुमार' गाइल या लज्जा-गीता !

---

## ५ फूल-पांखरें.

सृष्टीच्या हृदयावरतीं
अक्षय भरभर हीं फिरतीं,
वाऱ्यांतुन मारित गिरके,
स्फूर्तीचे आलाप मुके—
घेत नवनवे,
जीवेंभावें,
खंड न ज्या, ते-हेच बरें-
कविरायाचे गुरु खरे !
फुललेल्या ताटव्यांतलीं,
फुलें मनोहर जीं दिसलीं,
चुंबून तयां हंसवावें,—
क्षणांत मग दूर पळावें,
यांच्या लीला—
या हृदयाला,

वेड लाविती खरेंखुरें,
आणिती काव्याचें वारें !
बांधावर हिरव्यागार
निसर्ग-बाला सुकुमार,
बहार नवतीचा पहिला—
देहिं जयांच्या मुसमुसला !-
त्या वेलींचे—
प्यार जीविंचे !
कारण, त्या शिकविती गडे,
हीं प्रीतीचे गोड धडे !
वनदेवीचा लडिवाळ
एकुलता निर्झर बाळ,
बालनिरूपिणी सरस्वती
काव्यमया ज्याच्या गीतीं—

अखंड वाहत
तरंग उधळित,
ते हीं मनिं साठवितात !
हिंडुनि त्या कांठोकांठ !
जाइजुईमोगरिंमधुनी—
कांटेऱ्या कुंपणांतुनी—
नाच सदा चाले यांचा,
ध्यास यांस हा नित्याचा,
यां न विसांवा,
या नच थकवा,
करिती तपश्चर्या वेडी,
जी चित्ता विभ्रमिं पाडी !
फूलपांखरांनों, तुमचें—
वेड एक हें दिव्याचें !

जडतेची जडता हरुनी—
स्फूर्तीला जागी करुनी—
ब्रह्माडाला,
नाचायाला—
लाविल ! ही जादू तुमची !
कधिं न कुणां साधायाची !
दिव्याच्या पायांमधले,
हे हलते घुंगुरवाळे,
नाद तयाचे जे उठती,
हृद्याच्या हृद्यीं शिरती !
मग जे उमटत,
तेथुनि अस्फुट—
प्रतिध्वनी, कुणि त्या वदती—
‘ कविरायाची रसवंती !’

# “ कवि विरकुड ”

[याचे नांव सखाराम गोविंद विरकुड. यांचा जन्म मुरुड—संस्थान जंजिरा येथें इ. स. १८९४ साली झाला. हे मुरुड येथील चौकळशी–माळी–ज्ञातींतील एका कुलीन घराण्यांत जन्माला आले असून यांचें वडील श्रीयुत गोविंदराव हे जंजिरासंस्थानांत स्वतःच्या कर्तबगारीनें व अश्रांत उद्योगानें तेथील व्यापारी वर्गांत प्रामुख्यानें गणले जात आहेत. श्रीयुत विरकुड यांचा मॅट्रीकपर्यंतचा विद्याभ्यास जंजीरा येथील प्रसिद्ध हायस्कूलात झाला असून पुढील बी. ए. पर्यंतचें शिक्षण मुंबई येथील वुइलसन् कॉलेजमध्यें झालें. वयाच्या १९ व्या वर्षींच यांच्या काव्यलतेची फुलें विकास पावू लागलीं. यांची बरीच कविता स्फुट असून विविध आहे. या खेरीज, “ कर्मवीर तानाजी मालुसरे ” “ महाराष्ट्रशाहीर गोविंदाग्रज ” ( आर्तगीत ) “ महाराष्ट्राची सवाई धर्मपिली ” व “ शुक्लपक्षांतील अमावस्या ” अशी यांचीं चार प्रसिद्ध स्वतंत्र काव्यें महाराष्ट्ररसिकांच्या पूर्ण परिचयाचीं आहेत.

## १ प्रार्थना.

ब्रह्मसुते ! आशिर्वच तूं देइ बालकाला,
निजसेवाव्रतबंधन आजचि करि याला.

शुद्ध मनोभावाचा
संभव सुकुमाराचा
मंगल निश्वासाचा
निष्कर्षचि हेतु करी बालजीवनाला.

आशेची चढवि तार,
दुःखाची नमवि धार
दुष्टांचा वाक्प्रहार

सहज मधुर हास्यानें सह्यकरि जगाला.
मरुनि अमर जे झाले
तद्यश गा स्फूर्तिबलें,
निर्जिव जननांत खुळे
मरति रोज, त्यांसि विलरि कार्यप्रतिभेला.
भूत वर्तमान जोड,
भविष्यांत दे उजेड,
गुणपरंपरा अखंड !
भूतलीं ललामभूत करि भारतभूला.
प्रेषित हा प्रेमाचा
जन हृदयीं हो साचा,
स्वार्थ पूर्ण भावाचा
धूर दूर करण्याची सांग कला याला.
शांतीचा सून रणीं
करुनि धन्य हो अवनी !
भेसुर प्रांति श्मशानि
छेडि मधुनि मंजुळ तव तरल सतारीला.
हृदयाचे गूढ भाव
रंका करितात राव
विकल हात नृपवैभव,
विशद करी, कुशल भरुनि रंग त्या पटाला.
मनुजांचे शुभ वांछित
ईशकृपा करि निगडित,
संगम हा दिव्य खचित,
भूस्वर्गांमधिल दावि ऐक्य ह्या जगाला
सौंदर्य, प्रेम, सत्य,
प्रकट करा यासि नित्य,
शोभवि तव बाल मृत्य,
पूजिल जन भावपूर्ण दिव्य तव यशाला.

## २ स्पृहणीय मृत्यु.

दारुणतर संग्राम संकटीं लढतां लढतां पडे
सदसी प्रहार शीर्षीं घडे
मुठींत धरुनी प्राण पडे परि रणस्थळीं विव्हळ
लागली स्वयशाची तळमळ
तोंच उठे आरोळि जाय जी आकाशा भेदुनी
निनादित होय सकल मेदिनी
मारा हाणा पकडा म्हणती कैद करा सत्वरीं
भ्याड हे पळती गिरिकंदरीं
आत्मबलाच्या विजयश्रीच्या हर्षानें तत्वक
नाचतें समरश्री-सोज्वळ
" कोण पळाले, कुणास घाली विजयश्री मालिका ? "
पुसे तों निकटवर्ति सैनिका
शत्रुबळ पळे निशाण टाकुनि स्वैराचे चोंहीकडे
आपुला विजय-ध्वज फडफडे
ऐकुनि ऐसें पुनश्च त्याच्या वीरमदा ये भर
कांपती स्पष्ट अधर थरथर
खड्ग मुष्टिवरि अपाप वळला कंपित त्याचा कर
व्रणांतुनि निघे रुधिर निर्झर
क्लांत देह जरि निजला होता मृत्यूशय्येवरी
मुखाब्जा हास्य प्रफुल्लचि करी
काय बरें हें गूढ असें हो प्रभाव कसला तरी
अवगणी मृत्युसही क्षणभरी !
सुधापूर्ण ती सुहास्य शोभा वदनीं नाचे कशी
अंतिची वेळ जरि ये अशी !
कर्तव्याची ध्येय सफलता हास्य आणितें बरें
मृत्युचा काय तिथें पाड रे
धरातलावरि असती ऐसे श्रेष्ठ सत्य नरमणी
रमति जे हंसती मृत त्यांहुनी

कर्तव्याच्या हांकेसरसे धांवतात हे असे
सुभेरी-रव-तत्पर वीरसे
संतत अंगीकृत कार्यांतें शिरीं घेति निर्भयें
जयाजय कसाहि मग त्यांत ये
आत्म समुद्यमिं मृत्यु जयांनां प्राणाहुनि आवडे
करागत स्वर्गसुखें त्यापुढें
तसाचि या वीराचा मृत्यू-मृत्यु नव्हे जन्मतो
सदिच्छा फल प्राप्ति जो वितो
जन्मवरी हें ध्येय ध्यायिलें नष्ट होऊं जीवित
स्वकर्मीं असेन जेव्हां रत
स्वाभिमान-प्रेमाश्रूंच्या मग कशा न यावया सरी
धन्य तो कृतकृत्यचि भूवरी !
त्या साधूची वीराची त्या स्मृति मम हृन्मंदिरीं
कोरिली सोन्याच्या अक्षरीं
मुठींत धरुनी नाक दैव हें उभे त्यापुढें असे
स्वामी सन्मुख जणुं भृत्यसे
धरा धरा तर कर्तव्याची कास घट्ट निजकरीं
अपयशें खिन्न न व्हा क्षणभरी
पंगू होउनी दैवचि याचिल तुह्मांस सद्भाग्यणीं
परिस्थिति भूत न दे जांचणी,

---

## ३ वीणावादन.

मंजुल मृदु तरल बोल वीणारव बोले !
पूर्णेंदु स्वमुखावरि
घनपट हा ओढुनि धरि
लज्जायुत नत मुखकरि
दुस्तर नभिं चाले । पाहुनि तव विमल रूप वीणायुत बाले !
चपल पवन निजवृत्ती

विसरुनि ही मंदगति
जल-निधि धरि परम शांति
निश्चल जग झालें । ऐकुनि मृदु तरल बोल वीणारव बोले !
ताऱ्यांचे अमित गोल
नाचति नभिं गान-लोल
त्यांनी बघ निज मंगल
गीत थांबवीलें । ऐकुनि मृदु तरल बोल वीणारव बोले !
कमलोदर बंधनांत
रसलोलुप मधुपजात
कमलिनि-गुण-सरसगीत
स्मृति शेषचि झालें । ऐकुनि मृदु तरल बोल वीणारव बोले !
चहुंकडे नितांत शांत
निस्तब्धचि विश्व दिसत
तव वीणा वादनांत
झोंपि काय गेलें ! मंजुळ मृदु तरल बोल वीणारव बोले !
तन्मय तव वृत्ति होत
वीणारव काढण्यांत
अर्धस्फुट गीत त्यांत
मिसळुनि तव गेलें । मंजुळ मृदु तरल बोल वीणारव बोले
तें आसन ती ठेवण
वीणारव दिव्य गान !
असते मनिं वेडावुन
शुक सनकहि गेले । ऐकुनि मृदु तरल बोल वीणारव बोले !
गिरिशिरिं करि गिरिगायन
सरस्वती मृदुवादन
प्रिय वीणा करिं घेउन
चित्र दृश्य झालें ! पाहुनि तव विमल रूप वीणायुत बाले !
तारांच्या छेडण्यांत

किंकिणरव वलय देत
करतालें धरिली साथ
किंचित् शिर हाले। मंजुळ मृदु तरल बोल वीणारव बोले.
विशद करी भाव गूढ
हृदय उघडुनी सताड
वृत्तिस विस्मरण गाढ
पाड तूं रसाळे। मंजुळ मृदुतरल बोल वीणारव बोले!
मंद मंद गीत होत
आकाशीं भरुनि जात
सुरभि मुखोच्छ्वास निघत
भरलिं अंतराळें। मंजुळ मृदु तरल बोल वीणारव बोले!
ऊठ ऊठ परि झडकरि
चल मम मानसमंदिरिं
आसन दे हृदयावरि
मन अधीर झालें। पाहुनि तुज दूर असी वीणायुत बाले!
आतां करि पंचमांत
गीत सुरू अप्रतिहत
तंतुवाद्य छेडि त्यांत
हृदय भरुनि आलें। ऐकुनि मृदु तरल बोल वीणारव बोले
आंतुनि मत्प्राण बाई
तव गीता साथ देई
जीवनमय काव्य तोही
स्फूर्तिनेंच बोले। ऐकुनि मृदु तरल बोल वीणारव बोले!

---

## ४ फुलल्या पारिजातकास।

हांस मधुर हांस सतत दिव्य पादपा तूं
हास्याचे मृदु सीकर
पसरुनि हे अवनीवर
कुसुमामिषें हृदयभ्रमर

लोभविला जगताचा यांत काय किंतू
सरिता निज नाथकरीं
मिळतां मृदु हास्य वरी
परि न सरी करि लवभरि
धवल सुरभि कुसुमांची, रजत फेन त्यांची
प्रणयाचें कथि रहस्य
बाला करि सलिल हास्य
उठत सुरभि सुखोल्लास
दृश्यरूप परि न त्यास गोड तव फुलांचें
रजनिसवें रजनिनाथ
स्वैर नभीं उधळितात
उडुहीरककण नितांत
मार्दव तव सौरभ तव त्यांस काय ठावा
सकल विश्व झोंपि जाय
तृणपर्णेंहि शिथिल होय
भ्रमरापरि भ्रमण हाय
करवि सुखद गंध तुझा शांत अशा कालीं
भीत भीत मंद पवन
कुरवाळी तुज दुरून
हळुच कुठें मृदु चुंबन
चोरुनि मग आकाशीं शांत लीन होई
कोठिल तव मूल जनन
महितल वा नंदनवन
कीं परेश-श्वासांतुन
मधुर असें गोड असें पूर्ण रूप आलें
तव कुसुमा तव कुसूम
मृदुता तव मृदुतेसम
सौरभ तो तव अनुपम
उपमा उपमेय सर्व तूंचि तत्समान

अंशांशें करि अपूर्ण
वस्तुजात थोर सान
नच झाली तृप्ति ह्मणुन
ईशें निजरूप साम्य पूर्ण तुला केलें
शुभ्रसुमन कीर्तिध्वज
विलसो तव वृक्षराज
भ्रमर पवन रोजरोज
गायक तव स्वेच्छेनें होउत जगिं सारे.

---

## ५ राष्ट्रकवीस आवाहन.

( चाल—पोवाड्यासारखी )

सोड समाधी राष्ट्र शाहिरा ! आजवरीचें मौन पुरे
स्वातंत्र्याचे उत्कर्षाचे गा पोवाडे खरे खुरे
शिशिर संपला वसंतमार्गीं गुलाब उधळी भू-बाला
खऱ्या कोकिला स्तब्ध रहाणें रुचेल कां तें सांग मला !
रवि संक्रमणीं स्वकर पसरुनी प्रतिभेची मंगलमाला
पुढें करी ती स्वीकारुनि करि रोमांचित भारत-भूला
वाट तुझी ती चोख करूनी पायघड्या तव पसराया
कवी यशाचे आम्हीं भुकेले शतकावरि झटलों वाया
गतकालाचें चित्र काढुनी सद्यस्थिति समजायाला
तुझी पाहिजे मदत देखण्या राष्ट्राच्या नवध्येयाला
उदयोन्मुख हो राष्ट्रभाव हा बोल करीं स्वातंत्र्याचा
उत्कर्षाची ध्वजा खुले बघ अरुणोदय नव संस्कृतिचा !
राष्ट्र कल्पना—ऐक्य कल्पना—नसानसांतुनि जनतेची
उद्भुत झाली, आज पाहिजे साथ मात्र तव गाण्याची
सोड समाधी राष्ट्र शाहिरा ! आज नवा घे अवतार
मार डफावरि-थाप एकदां नवतीची चढवी तार !

अनभिषिक्त वा अज्ञात असशी सरसावुनि ये असा पुढें
अवतार नवा घेउनि किंवा गा स्फूर्तीचे पोवाडे
दूत " तुतारी " फुंकुनि रोवुनि " निशाण " अस्ताला गेला
अधीर झाली दुनिया सगळी बखत शाहिरा कां केला !
शांत रसाची परिसुनि " मुरली " रुणझुणला " धुंगुरवाळा ! "
द्रवलों आम्ही भान हरपलें मनिं किती झाल्या गुदुल्या !
शांत रुचिर मृदु भाव भुलविती वेळ असे जों शांतीची
संक्रमणाची वेळ आज या पुरे योजना प्रतिनिधिची
राव रविंद्रा ब्रह्म–शोधका वंदन तव सात्विकतेला
पूज्य सदा तूं परी पाहिजे कवि आमुच्या व्यवहाराला
शांत निर्झरी " गीतांजलि " तव सुधामधुर देइल शांती
कोलाहलिं परि पडे जनाला आज उद्यांची ही भ्रांति !
त्यांस उठवुनी, कर्म शिकवुनी मार्ग सुगम करण्या खंदा
व्यवहारी शाहीर पाहिजे जनतेचा प्यारा बंदा !
नवयुग आलें–आज बदलला काळ–चाललें संक्रमण
खड्या सुराची तुझ्या शाहिरा त्यांत मला भासे वाण
सोड समाधि राष्ट्र शाहिरा आज नवा घे अवतार
मार डफावरि थाप एकदां नवतीची चढवी तार !
सूर्याजीच्या सिंह प्रभेची बाजीच्या रणतेजाची
सांग कथा-वा भीमविक्रमी भानुप्रभ–शिवरायाची
अटकेवरि फडकविला झेंडा एक भरारीसा कोणी
दख्खनच्या अश्वांस पाजिलें सिंधूचे निर्मल पाणी
पानिपताच्या कृष्ण-पटावरि रक्ताचा फांसुनि हात
कां फुटली नव लाख बांगडी सांग कुठें झाला घात !
गडगडावरि भगवा झेंडा डौलानें स्वच्छंदानें
फडकुनि फेडी पांग जना-दे शौर्याचीं ताजीं स्मरणें
निज रुधिराचा सडा घातला स्वातंत्र्यास्तव वीरांनीं
हृदयस्पर्शी चित्र रंगवी जादूच्या तव शब्दांनीं
स्फूर्ति प्रबोधक वीर कथांची–गुंफ गोवणी–प्रतिभेची
मार डफावरि थाप अशी कीं तार चढे नव नवतीचीं !

शब्दोशब्दीं जीव उसळुं दे शौर्याचे नव तेजाचे
चिरंजीव या संक्रमणा करि धन्यवाद घे राष्ट्राचे
चढवि तार मग मार डफावरि थाप अशी तडका फडकीं
सोड थराहुनि आत्मवैभवें भ्याड मनें कुजकीं पडकीं !
नैतिक बौद्धिक अध्यात्मिक वा शास्त्रांमाजीं आर्यांचें–
विचार गेले पुढें जगाच्या, चीज काय झालें त्यांचें !
रणारणांतुनि प्रिय रक्ताचे पाट वाहिले आजवरी
फोल काय ते ? मोल तयांचें बोल बोलुनी स्पष्ट करी
वीर प्रसवा वीर कन्यका वीर वरांच्या हृदयलता
भूषण झाल्या भारत-भूला गाउनि अगाई गीता,
शूर चरित्रें प्रतिभा सूत्रें नित गाउनि वात्सल्यानें
राष्ट्र-पाळणा हलवुनि केलें प्रेमें वीरांचें जतन,
झरा पांगलो त्या हृदयांचा वत्सलता झाली अपुरी
तव काव्याची त्यांस पाहिजे मात्रा संजीवनी खरी !
समाज-घटना राष्ट्र-कल्पना आज पुन्हा जाग्या होत
त्यांस कराया प्रबल हवी तव गाण्याची किंचित् साथ
संक्रमणाची शपथ तुला बघ सोड भीड घे अवतार
मार डफावरि थाप एकदां नवतीची चढवी तार !
जन-हृदयाची तार हलूंदे तुझ्या गायना समवेत
नाडीचा पडसाद पडूंदे रक्ताची उसळी उडत
पीळ पीळ जीवास पाडुनी जीव जीव करुनी वेडा
हिंद कल्पना हिंद भावना संवर्धक गा पोवाडा
काव्य कल्पना दीप पेटण्या स्निग्धा-द्रवें मेलीं का
निसर्ग सुंदर ललित मनोहर वांझ भरत-भू झाली का ?
सह्याद्रीची नितांत स्थिरता गंगेची निर्मल शुचिता
अनंत सोज्वल गभीर सागर स्वैर सदा उसळत असतां
राष्ट्राचीं हीं सुंदर दृश्यें, जीवाचे जीवन बघ
कसे तोडले कसे जोडले जोड तयाचा संबंध
क्रौंच-वधानें रक्त उसळतां स्फूर्तीचा जपुनी मंत्र
आद्य कवीनें आदर्शप्रद शतकोटी रचिला ग्रंथ !

पाश्चात्यांची पार्थिवसृष्टि अध्यात्मिकता आर्यांची
तुझ्या गायनीं एक होउनी जोड जमो देहात्म्याची
नाजुक दृढतर भव्य भयप्रद शौर्य तेज हीं एकत्र
विविध रसांनीं रम्य छटांनीं संमोहक सजवी चित्र
सांग जगा संदेश शेवटीं आर्यत्वाचा प्रज्वलित
वदवि जनांतुनि, ' भारत-भूच्या पुत्रानें केली मात ' !
सोड समाधी राष्ट्र-शाहिरा ! आज नवा घे अवतार
मार डफावरि थाप एकदां नवतीची चढवी तार ! !

---

## ६ महाराष्ट्राचें निशाण.

( महाराष्ट्राच्या संस्थापकाचें मूळचें निशाण जरिपटका कीं भगवा झेंडा, असा विक्षिप्त प्रश्न मनापुढें उभा राहून इतिहास-संशोधनाच्या कामीं अनभ्यस्त असल्यामुळें केवळ कल्पनेच्या तर्कावरच खालील प्रबंध रचिला आहे. )

सोड समाधी राष्ट्र शाहिरा ! आजवरीचें मौन पुरे
स्वातंत्र्याचे उत्कर्षाचे गा पोवाडे खरेखुरे
स्वातंत्र्याचें उत्कर्षाचें निशाण माझ्या राष्ट्राचें
रंगरूप नाठवें हाय अजि वाद माजती शब्दांचें !
परी गडावरि तव हृदयाच्या अक्षय जें आहे रुतलें
स्फूर्तीच्या वाऱ्यावरि त्यांचे दे सोडुनि पडदे सगळे
लाज वाटते आज शाहिरा प्रश्न मनीं आला काय
जरिपटका कीं भगवा झेंडा राष्ट्राचा होउनि जाय ?
राष्ट्राचें सौभाग्य उजळिलें ज्या रंगानें रूपानें
विसर पडे अजि हाय शाहिरा वैधव्याचें हें जगणें !
राष्ट्राला जीवंत रक्त अविरक्त मिळे ज्या स्फूर्तीनें
विसर पडे अजि हाय शाहिरा वैधव्याचें हें जगणें !
तीन कोट खर्चिले होन त्या थाटाच्या अभिषेकांत
राष्ट्रोद्धारक पदर फडकला कुठल्या रंगा रूपांत !
गतपितरांचे आनंदाश्रू गगनांतुनि संतत पडत

रोमांचित जो पदर जाहला प्रभात-मंगल-कालांत
अस्तकाल परि हाय निशाणा राष्ट्राचा झाला आज
चैतन्याचे वारे पडले शौर्याचा उतरुनि साज

*     *     *     *

रंगपंचमी रग उधळिला—काठ रुपेरी ताटाचे—
छोटेखानी शिवपितरांनीं तेंच रूप तव कायमचे
रंगपंचमी रग उधळिला पल्लव तव झाला लाल
काठ रुपेरी ताटाचे त्या जरिपटक्याची मखमाल
महाराष्ट्राचा उषःकाल तो भगवा लालट रंगाचा
आशा फिरवी वरुनि रुपेरी पदर रुन्या मखमालीचा
ऱ्हास शशीचा—परदास्याचा—अस्ताचलिं निमता होत
धर्म भावना राष्ट्रकल्पना स्फूर्तीनें उदया येत
जरतारी ते काठ शोभले उत्कर्षाचे रग नवे
चढत्या उदर्यीं कुणी बोलले त्यासचि का भगवे भगवे !
जरतारी ते कांठ सर्व मखमाल खुले जरतार वजा
आंग पाहुनि मांग त्यास दे भगवा झेंडा नाव तुजा
प्रिये प्रेरणे बोल खोल तव हृदय नको संकोच अतां
भगवा झेंडा जरि पटका हा एकचि होता कीं नव्हता !
वैराग्याचे धर्मभक्त आसक्त कुणी भगव्या रूपीं
राष्ट्राचा शाहीर शिपाई घेइल जरिपटका हातीं
शिव-भक्तीच्या जरिपटक्याला भाग्याचा भगवा रंग
असे चकाके असें लकाके रूप तुझें मनिं अभ्यंग !

*     *     *     *

जरिपटका तूं भगवा झेंडा एकरूप होऊनि ऐसा
कसें सांग मग चलन दिलेसी महाराष्ट्राच्या इतिहासा
कुणी धतलें चोरुनि चुंबन तुझिया पदराच्या आड
साजणि सोडुनि जात शिपाई परमुलुखीं करण्या दौड
रंग उसळले त्या प्रेमाचे शौर्याचे कर्तव्याचे
भगव्या रंगाहुनी तुझ्या ते होते ना नव बहरीचे !

षण्मासाचा विरह शिपाई चाकरींत सुकल्या जाई
रमणींहृदयीं तूंच फुलविशी आशेची नव अमराई
समरकर्दमी कवटाळुनि तुज वीराची पडली स्वारी
प्राणसंकटीं आठवली नच जीवाची मैना प्यारी
" हा दुनियेचा पालनवाला गर्भ सखे होईल काय "
ह्मणे शहाजी तोंच जिजाई एकान्तीं लज्जित होय
त्या लज्जेची छटा काय तव रंगावरि ही खुलवटली
अभिमानाची त्या पितराच्या जरतारी झालर झाली !
काशि एकान्ती देत जिजाई शिक्षण गर्भांतिल राया
राष्ट्र-निशाणा महाराष्ट्राचा मजुरा करण्या तव पाया !
निघे शिपाई मुशाफरीला गृहकर्मी रमल्या ललना
बाळचमु चिमुकल्या करीं तुज घेउनि करि क्रीडा नाना
निशाण हातीं उजळत जाई आशेचे भावी क्षितिज
बाल शिपाई निघे मजेनं, हाय निभाले तें तेज !
लदुपदुचे ते कडेकोट सर करण्याची त्याची मौज
काय गुदगुल्या होत मनीं तो आठवतां त्यांचा साज
शूरांच्या शौर्यात रंगला राष्ट्राचा शृंगार झरा
गुलाब फुलला बहर उसळला ठसा तुझा तिथला न्यारा
स्वारी करुनी येत शिपाई विजय तुतारी फुंकीत
कुरवाळी तुज घेउनि हृदयीं तो कुठला गोंडस हात !
तुलाच पहिली विजय आरती चुंबन उच्चासन तेथ
शूर वीर राहिले बिचारे मागें तव हेवा करित
गर्दी कोठल्या कर्डी कपाटीं जनीं वनीं तांडव केलें
महाराष्ट्राचे प्राण तेथवरि जादूनें खेंचित नेले
अबलांच्या अब्रूवरि पडला दुष्टांचा डोळा डावा
सह्याद्रीच्या वनप्रदेशीं तोंच पदर तव फडकावा
जुलमानें गांजल्या जिवांना ओझरतें उडतें रूप
पारतन्त्र्य शृंखला पटापट तोडाया आणी हुरूप
भिन्न भावना भिन्न कल्पना राष्ट्राच्या जीवा गणिक
तूंच ओतिल्या तूंच पोशिल्या अन्य नसे कोणी एक

दासांच्या उपदेशाहुनि तव हाकाटी मोठी जबरी
सर्व मराठा मेळविण्याची हातोटी अगदीं न्यारी
शब्दांचा संदेश न काढी दास्यांतुनि हा देश वरी
स्फूर्तीची परि तुझी भरारी महाराष्ट्राच्या गडांवरी
शून्यांतुनि ब्रम्हांड निघालें स्तंभीं नरहरी कडकडलें
तेंवि निशाणा तव पदरांतुनि महाराष्ट्र जन्मा आलें
घरिंदारीं कीं गडगडावरि खिंडीची धरुनी नाकें
चालविलीं त्यां राजकारणें नाचविलीं अगणित पथकें
राष्ट्राचा अभिमान शौर्य तूं राष्ट्राचा कलिजा प्राण
राष्ट्रदेव तू राष्ट्रधर्म तूं श्रेष्ठ असा दुसरा कोण ?
निर्जिव असुनी जीवन देशी भ्याड मनें करिशी शूर
स्वयें हालशी परि हलवीशी अनंत हृदयांचे दोर

* * * *

जरिपटका तूं भगवा झेंडा एकरूप होउनि ऐसा
कसें सांग मग चलन दिलेंशी महाराष्ट्राच्या इतिहासा
तूंच दाविला विशद शिवाला दुष्ट डाव अफजुल्ल्याचा
सैंड तोड त्या दिली सलामी हात हाणिला बिचव्याचा
सिंहगडावरि सिंह धांवला तीनताड उडुनी बुरूज
सोलावरुनी त्या अंधारीं तूंच खेंचिली वरि फौज
शेलाराच्या वृद्ध शिरांतुनि रक्त कढे नवज्वानीचें
निराधार तें निशीथ समयीं निशाण पडतां राष्ट्राचें
बाजीचें रणतेज फांकलें अमर तुझ्या चित्-शक्तीनें
महाराष्ट्राचा प्राण रक्षिला प्राण संकटीं भक्तीनें
डाव रंगला विरेस पडला दिल्लीला मोहरा वीर
ऐन समयिं या गडागडावरी दर्शन तव देई धीर
' यवन होउनी जीव नको मज मार मराठा असतांच '
वधस्थळीं कडकडली वाणी स्मरण काय तव होतांच
दख्खनच्या चुल्यास चारण्या धूळ धावला अलमगिर
छत्रपतींचें छत्र सलामत केंवि उरे पडला घोर

जिंजितटाला तोफ रोखिली धूम पळे राजाराम
तदा धनाजी संताजींना तूंच दिला बापा जोम
अबला झाल्या प्रबळ जडानां जीव मिळे रोमोरोमीं
वीज चमकली नीज उडाली राष्ट्र न झालें बदनामी
स्फूर्तीची तव अखंड आली परंपरा सोज्वळ ऐशी
विसर पडे त्या तुझ्या निशाणा धिक्कारचि वैधव्याशी
कलम सोडुनी राजकारणीं नागिण धारिली पंतांनीं
श्रेष्ठ तसे श्रीमंत परी ते लीन जाहले तव चरणीं
चौमुलखीं बसविला दरारा हिंडवीत नेलें तुजला
यशोवर्धिनी कीर्ति रक्षिता नरशार्दुल बाजी झाला
काव्याची कल्पना न झाली तरल तुझ्या पदरांभंवती
शाहीरांच्या रसवंतीची साथ मिळाली नच पुरती
अभिमानाची गिलच्या वरती करूं धावतां कुरघोडी
राष्ट्राचा फुलबहर होमिला पानिपताच्या रणकुंडीं ?
चमक दाविते तव प्रतिभेची पुरुषांवरि करुनि मात
कोण बरें ती–शेवटचीती–राष्ट्राच्या इतिहासांत
धन्य दिवस ते धन्य राष्ट्र तें धन्यताच तव स्फूर्तीची
दृष्टि बावरे सृष्टि अवतरे स्मरणीं गत इतिहासाची
शतकावरि दाखवुनि असली जादूची अद्भुत किमया
राष्ट्र निशाणा गुप्त जाहला दगडाची उरवुनि दुनिया
मान विभव वा शौर्य तेज वा सर्वांचा करुनी कळस
धर्मसंस्कृती भारत भूची अमर दाविली जगतास
उत्कर्षाची तेज बलाची शतकावरि करुनी सरशी
पाप्यांच्या पितरास आज परि नामशेष झाले असशी
दिव्य प्रतिभा-प्रभाव तो तव कुजक्या पत्रांतुनि हाय
संशोधुनि पाहणें कपाळीं परि अमुच्या आलें काय ?
क्षमस्व जरि तव चित्र न आलें यथातथ्य मम रंगांत
क्षमस्व घेई मुजरा माझा मेलेल्या अभिमानांत ?

---

# कवि-गजानन त्र्यंबक माडखोलकर

( जन्म मार्गशीर्ष व॥ ११, शके १८२१ )

## १ श्रीशिवराज्याभिषेक.

सह्यगिरीच्या स्वर्गंगाजलधौत शिरःप्रांतीं
उसळतात या आज कुणाच्या उज्ज्वल जयगीती ?
सुधामधुर निश्वसितें उधळुनि निद्रित जगताला
जागृत करिते अवेळींच कां आज उषाबाला ?
नक्षत्रांना भिजवुनि रजनी जातांना मार्गे
उत्सुकतेनें वळुनि काय ही बघते अनुरागें ?
आवरीत ही अमृतरसाची मोहन बरसात
अस्तगिरीवर आरोहुनि हा रजनीचा कांत—
दयितालिंगित आश्चर्यानें काय पाहताहे ?
गगनीं विजयध्वज कोणाचा हा फडकत राहे ?
वातावरणीं झुलति कुणाचीं हीं मंगलगीतें,
त्या गीतांच्या स्पर्शें स्थिरचर कां पुलकित होतें ?
सह्याद्रीचे कडे आज हे कंपित कां होती,
अचेतनांना स्फुरवि कोणती चैतन्यज्योती ?
विक्रमशाली यवननृपांचे निस्तुळ दळभार
दक्षिणेकडे आलें होउनि ते रेवापार,
महाराष्ट्रनृपमंडलाधिपति रामचंद्रदेव
विद्वत्संस्तुत, दीनजनांचा नाथ एकमेव,—
यदुकुलभूषण रणांगणीं तो पराभूत झाला
यवनांनीं मग महाराष्ट्र हा दास्याहत केला !
विंध्याचलपर्यंत थडकलें यशस्तेज ज्यांचें
अतुल बाहुबलवैभव त्या यदुवंशविलासांचें—

पाहुनि भुलली, अशेष भारतभाग्यश्री आली,
देवगिरीच्या दुर्गमदुर्गप्रासादीं ठेली !
देवगिरीची दौलत ती दुर्मद दुस्मानांनीं
अपहरिली अनुकूल करुनि धनलोलुप बेमानी,
परधर्माचे, परराष्ट्राचे ते दावेदार
विजयी झाले करुनि फितुरिनें यदुकुलसंहार !
स्वातंत्र्याला अपघातानें आलें हें मरण
तेव्हांपासुनि महाराष्ट्र हा झाला निष्प्राण !
आज उठविलें पुनरपि कोणी या निष्प्राणाला
निर्जीवाला जीवंतपणा फिरुनि कसा आला ?
यदुवंशाचें विगतवैभव प्राप्त पुन्हां व्हावें,
महाराष्ट्र हा स्वतंत्र होउनि दास्य लया जावें,–
मातृभूमिचें, स्वातंत्र्याचें करावया त्राण
अंगिकारिलें ह्मणुनि सुखानें फकिरीचें वाण,
पूर्वार्जितधनवैभव सांडुनि कडे आणि रानें
सह्यगिरीचीं स्वैर घुमविलीं राष्ट्रस्फूर्तीनें,
चैतन्याचें तेज उधळुनी दिङ्मंडल झुलवी
नव आशेचे अंकुर जनताहृदयांतुनि फुलवी,
स्वातंत्र्यरणीं सहज तळपतां ज्याची समशेर
मृत्युभयानें दळ गनिमांचें धांवे चौफेर,
दास्यमुक्त हा महाराष्ट्र त्या नरशार्दूलानें
शिवस्वरूपी शिवप्रभूनें, स्वराज्यदेवानें–
पुनरपि केला !–आज तयाचें अभिषेकविधान
दऱ्यादऱ्यांतुनि ह्मणुनि घुमतसे हा पटहध्वान !
मंगलगीतें ह्मणुनि आज या पुररमणी गाती
वनें उपवनें त्या गीतांनीं निनदित हीं होती;
तीं अभिनव जयगीतें ऐकुनि या मंगलकालीं
चराचराला जडाजडाला जीवकला आली !
गीतसुरांच्या स्पर्शानें त्या रानें टवटवलीं
रायगडाची विपिनश्री ही नवतीनें नटली;

ही हर्षांची, ही तेजाची भुलावणी भलती
सह्याद्रीचे कडेहि गुंगुनि हे डुलती झुलती !
आदिपीठ हें,—महेश्वराचें, माय भवानीचें !
अधिष्ठान हें,—स्वातंत्र्याचें धर्मस्फूर्तीचें !
ब्रह्मरसाची, भक्तिरसाची पुण्यमयी गंगा
पावन करिते अविरत याच्या विमल अंतरंगा !
विश्वकुटुंबी वागीशांची विश्वात्मक वाणी
आनंदानें गाले याच्या कीर्तीची गाणीं !
अगस्तितेजें निष्प्रभ होउनि अंकित हा झाला
पश्चिम सागर सदैव न्हाणी याच्या चरणांला !
कड्याकड्यावर उभी राहुनी रात्रंदिन याला
रक्षितसे ही गगनस्पर्धिनि तुंग दुर्गमाला !
प्राण वाहुनी समरीं याच्या स्वातंत्र्यासाठीं
धारातीर्थीं पावन झाल्या वीरांच्या कोटी,—
वश होउनि त्या वीरवरांना विजयश्री आली
महराष्ट्रभू स्वतंत्र पुनरपि पाहुनि ही झाली—
आनंदानें पुलकित होउनि डोलतसे आज
पुण्यसरित्संगततनुमंडल तो हा गिरिराज !
आज उदेलें स्वातंत्र्याचें हें मंगलपर्व
ह्मणुनि डोलतो आनंदानें ब्रह्मगोल सर्व !
अत्यद्भुत अभिषेकमंगल श्रीशिवदेवाचें
परमदिव्य पुण्याहवाचन स्वातंत्र्यक्रतुचें—
सह्यगिरीच्या उत्तुंगशिरःसौधावरि आहे
गाजवीत हें जगताला हा ध्वज फडकत राहे !

[ २ ]

स्थलदेवींनो ! जलदेवीनो ! आज चला जाऊं
रायगडावर, शिवप्रभूला जयगीतें गाऊं !
किर्र रान हें, दऱ्यादऱ्यांतुनि जंगल घनदाट
निर्झरिणींचे नित्य यांतुनी झुळझुळती पाट,

हे झुळझुळत्या निर्झरिणींचे मंजुळ रसरंग
यांतच मिसळा ते तुमचे हळुवार हृत्तरंग !
त्या गीतांनीं, या गीतांनीं एकरूप व्हावें
शिवदेवाच्या जयघोषानें वन हें निनदावें !
मधुर माधवस्पर्शानें या फुलत्या फुलवेली
मरंदलोलुप भृंगसंघ हा झुलतो भंवताली,
वाऱ्यानें हीं वृक्षवरांचीं फडफडती पानें
सृष्टिसतीचीं हेलावति जणुं मुग्धतरलगानें !
शिवरायाचें वैभव पाहुनि हृष्ट फार झाली
अश्रुबिंदु हे निशादेविचे टपटपले खालीं,
दंवबिंदूनीं खुलली विपिनश्री गाते गीतें
मंदवायुच्या हिंदोल्यावर आंदोलन घेते !
उषादेविचा निशादेविचा सरुनि लपंडाव
स्थिरचर उजळित पुढें येतसे पहा सूर्यदेव
परमेशाचे पढियंते हे भाट गाति यातें
नितांतमंजुल नवलपरीचीं दिव्य उषःसूक्तें !
त्या नादांतुनि मिसळुनि अपुले रम्य गीतनाद
जडाजडांतुनि आनंदाचे खुलवा पडसाद,
वनराजीला आनंदानें प्रेमानें डुलवा !
शिवदेवाचीं वैभवगीतें वाऱ्यावर फुलवा !
जगन्मंगले ! भवानिमाते ! आज तुवां यावें
आनंदानें या राज्याला अभयदान द्यावें !
तीर्थक्षेत्रें, धर्मक्षेत्रें होउनि उध्वस्त
स्वातंत्र्यासह झाला धर्मस्फूर्तीचा अस्त;
दास्यतमिस्रग्रस्त राष्ट्र या प्रतिपच्चंद्रानें
पुनरुज्जीवित केलें पसरुनि आशेचीं किरणें !
वैभव या प्रतिपच्चंद्राचें पूर्णत्वा गेलें
यशःप्रकर्षे याच्या उज्ज्वल राष्ट्रतेज झालें !
तुझ्या कृपेनें आज तपस्या सफल सर्व झाली
महाराष्ट्रभू स्वातंत्र्याचें हें लेणें ल्याली,

तुझ्या कृपेनें स्वातंत्र्योदय आज पुन्हां झाला
धर्मोद्धारक राष्ट्रोद्धारक नृप हा अवतरला !
तुझा तूंच हा वाढविं राजा प्रेमानें आई !
अभयदान या तव राज्याला तूंच आज देईं !
तुझ्या कृपेनें पावो अक्षय पुण्याची बढती !
ही सत्याची, स्वातंत्र्याची चंद्रकला चढती !

[ ३ ]

मानधन महाराष्ट्रा ! जीवित धन्य तुझें झालें
शिवदेवानें आज तुझें यश दिगंत हें केलें;
भाविपिढ्यांना तव दिव्ययशःस्नात दिशा दाही
तुझिया अद्भुत उत्कर्षाची देतिल या ग्वाही
" स्वातंत्र्यप्रिय नरवरपूजित महाराष्ट्र देश
लीलेनें हा झुगारितो परसत्तेचे पाश !
धर्मद्रोही, राष्ट्रद्रोही जुलमी जेत्यांना
खुशाल होवो वश हा भारत सांडुनि अभिमाना;
नष्ट जाहलें क्षात्रतेज जरि अखिल भारताचें
भ्रष्ट जाहलें धर्मजीवन प्रसुप्त जनतेचें,—
महाराष्ट्र तरि परसत्तेला कधीं न वांकेल
स्वातंत्र्यरणीं झगडायातें पुढता ठाकेल !
दासांचें हें राष्ट्र न,—तेजस्तत्त्वाचा श्वास
प्रतापशाली रणसिंहांचा स्वतंत्र हा देश !
काळालाही तें अत्युग्र क्षात्रतेज याचें
दुःसह झालें ! "—गंभीरगर्जित हें इतिहासाचें—
ब्रह्मकटाहापर्यंत महाराष्ट्रा ! थडकेल
आणि तुझ्या दुर्मद जेत्यांचें काळिज तडकेल !
तुझा जयध्वनि ऐकुनि हा ब्रह्मांड थरारेल !
अचेतनांतहि पुनरपि तेजःस्फूर्ति भरारेल !
प्रतिपच्चन्द्रा ! त्रिभुवन तुझिया तेजें धवळावें
जगाकडे या पुनरपि दास्यध्वांतें न वळावें !

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.

तुझ्या कृपेनें स्वतंत्र हतबल राष्ट्रांनीं व्हावें !
ऊर्जस्वल जयगीत तुझें हें जगतानें गावें !
आनंदाचीं अश्रुफुलें तुजवरुनी उधळीत
शिवप्रभूचा शाहिर गातो हें मंगलगीत !

---

## २ सागरास—

ज्योत्स्नाचुंबित हीं तुझ्या उसळती लाटांतुनी मौक्तिकें
तारांचेंहि जयापुढें दिसतसे हें तेज सारें फिकें,
देवा ! ही सुषमा मनोहर तुझ्या लाटांवरी शोभते,
माझें चित्त उदास हें न परि या दृश्यांवरी लोभतें.
माझें चित्त उदास गुंगत असे तंद्रींत हें आपुल्या
हा तंद्रींतुनि नाद जागविल कां त्याला तुझा प्रेमळा ?
माझें क्षुब्ध असेंच चित्त बघुनी ही दीन देशस्थिती—
लाटांच्या सम या विचारलहरी माझ्या मनीं नाचती.
अंतर्वृत्ति मदीय आणि तव ही आहे जरी सदृश
माझ्या दुर्भग या विचारततिला आशा न होणें वश,
माझे दुःखद हे विचार,—पचणें तु खांत यांचें जिणें,
आहे नाचत हें परंतु तुझिया लाटांवरी चांदणें !
लाटा आदळती धरेवरि तुझ्या या सारख्या येउनी
ब्रह्मांडास अखंड हा घुमवितो यांचा प्रचंड ध्वनी
मागें जाति, परंतु आदळति या वेगें पुन्हा येउनी
यांचें पाहुनि भव्य तांडव उठे हा भाव माझ्या मनीं,—
येतां संकटकाल, त्या न गणितां, त्याच्यासवें संतत
झाले जे झगडोनि देश अपुल्या तेजें पुन्हा उन्नत
त्यांचीं रम्य रहस्यपूर्ण चरितें, दिव्याक्षरें उज्ज्वला !
या लाटांवरती अनंत लिहिलीं तीं दाविलीं तूं मला,
राष्ट्रांचें इतिहासचित्र दिसतें लाटांत हें रेखिलें,
माझ्या मानस दृष्टिनें जलनिधे ! तें आज मी देखिलें,

त्यांच्या कीर्तिकथा *कवीशलिखिता त्या स्फूर्तिदा सुंदरा
मी गाईन सदैव बैसुनि तुझ्या तीरावरी सागरा !

+ + +

सौंदर्य लहरींमधोनि तुझिया जीं दिव्य हेलावतीं
माझ्या दृष्टिपुढें अशीच विलसो त्यांची सदा ही तती,
देवा ! नादरवें असेंच भर तूं ब्रह्मांड या आपल्या
आतां हें निववील गर्जित तुझें जीवास या तापल्या
आद्यापासुनि चाललें तव असे हें सागरा ! गर्जित
आद्यापासुनि नाद हा भरितसे विश्वास अव्याहत,
ज्यांचें ऐकुनि बोल हालति दळें ते पावले बा, लय
नाहीं मृत्यु तुला परंतु, तव हा दिव्यध्वनी अक्षय !
ज्यांचे ऐकुनि बोल निर्घृण दळें हीं दुर्बळां गांजिती
त्यांना योग्य अखेर, दैव म्हणतें, हीं प्राप्त होणें स्थिती;
जें जें सत्य, उदात्त तेंच जगतीं या शाश्वतत्वा चढे
ग्वाही गाजवितो तुझ्या ध्वनि अशी ही दिव्य चोंहीकडे !
हें ऊर्जस्वल तत्त्व नित्य तुझिया लाटांवरी खेळतें,
लोभानें भरल्या भयाण कधिं या विश्वास लाधेल तें ?
लाटांसुनि तुझ्या सदैव उठती जे नाद ते झेलुनी
द्यावे या जगतास, हेतु दृढ हा रत्नाकरा ! मन्मनीं
इच्छा होईल पूर्ण ही जर कधीं, सृष्टीस या येईल
स्वर्गाचें मधुरूप, देव नर हा या भूवरी होईल
सृष्टीचा महिमा सदैव मग हे गातील वेडे कवी
आशा हीच उदात्त गर्जित तुझें माझ्या मनीं नाचवी !

---

## ३ महाराष्ट्रास—

स्वातंत्र्याचें मंदिर तूं । जगदुद्धरणीं तव हेतू
संतकवींची तूं स्फूर्ती । परात्पराची तूं प्रीती

---

* ' कविं कवीनाम् ' असा ईश्वर.

मांगल्याचा,
देशभक्तिचा,
सुरम्यतेचा
संगम अभिनव हा झाला । महाराष्ट्र रूपा आला.
तुझ्या समर्थांचीं गीतें । गाउं अम्ही अभिनव चित्तें
अभिनव चित्तें ती गीतें । गाउं, जागवूं जनतेतें
तीच जागृती
देइल अंतीं
दास्या मुक्ति
तव यश नेइल शिखरातें । गाउं समर्थांचीं गीतें.
अभंगतत्वें धर्माचीं । अभंग कीर्ती देशाची
अभंग सेवा साधेची । अभंगवाणी तुकयाची
भावभक्तिचें,
स्वानंदाचें,
स्थान सुधेचें
तुझ्या तुक्याचीं हीं गीतें । शांतवितीं अमुचीं चित्तें
स्वातंत्र्याची तूं भूमी । प्रभु एक तुझा तो स्वामी
निधान तुझिया प्रेमाचें । नाम तुझ्या शिवरायाचें
तो तानाजी,
माधव, बाजी,
नाना गाजी
सकळ मराठा मेळविला । भगवा झेंडा खेळविला.
जय बोला हो जय बोला । अरुणदेव उदया आला
जय जय जय जय जयशब्दें । दुरितांचीं पळवूं अब्दें
दैन्य पळालें,
विश्व उजळलें,
नवयुग आलें
तुझें गीत हें गाइन मी । महाराष्ट्र–सेवाधर्मी.
तुझे धीर ते राऊत । महाराष्ट्र सेवक सत
अश्रूंचे घातले सडे । म्हणुनि उभें हें पीक पुढें

सुधारणेचें,
जनसेवेचें,
कार्य तयाचें
पूर्णतेस नेऊं आम्ही । महाराष्ट्र–सेवा–धर्मी.
परंपरेचा, कीर्तीचा, । भूतकाल उज्ज्वल त्याचा,
संतांच्या कर्तृत्वाचा । अभेद्य पाया प्रेमाचा
नव तेजाचे,
नव धर्माचें,
नव राष्ट्राचें
मंदिर त्यावर उभवुं अम्ही । महाराष्ट्र–सेवा–धर्मी.
तुझे नवे भालाईत । अम्ही सकल जमलों येथ
रडोत रडतिल मढीं जुनीं । धरूं न त्यांची खंत मनीं
स्वातंत्र्याचें,
चिरसमतेचें,
अभिनवतेचें
निशाण उभवु नवें आम्ही । महाराष्ट्र–सेवा–धर्मी.
परवशतेचा हा भाला । रुतला तुझिया हृदयाला
नव्या दमाचे वीर अम्ही । कीर्ति तुझी नेऊं व्योमीं
प्राणहि देऊं,
स्वर्गी जाऊं,
निशाण रोवू
दास्य तुझें निवटूं आम्ही । महाराष्ट्र–सेवा–धर्मी.
पुढें पुढें हो पुढें पुढें । स्वातंत्र्याच्या गिरीकडे
अश्रूंचे वालीत सडे । राष्ट्राचे राउत निधडे
स्वार्थी मेले,
तेजें न्हाले,
पुढें चालले
गीत तयांचें गाइन मी । महाराष्ट्र–सेवा–धर्मी.

## ४ एक प्रसंग !

–दुष्काळांत खेडेगावीं घडलेल्या एका करुण–प्रसंगाचें अस्पष्ट शब्दचित्र –

उभीं हिरवीं शेतांत पिकें होतीं
आस गरिबांच्या नाचतसे चित्तीं
कोप दैवाचा तोंच अहा, झाला
पुढें आकित दुर्भिक्ष काळ आला.
लोक अन्ना मोताद सर्व झाले
शेतकरि ते ' अन्नान्न ' करित मेले
घांस नाहीं खाण्यास गुरें मेलीं,
अवकळा त्या खेड्यास दिसे आली.
आठ दिवशीं बाजार भरे तेथें
धान्य देशाहुनि खरेदीस येतें,
जोंधळ्यांचे घातले तिथें ढीग
माणसांची लागली एक रीघ.
धनिक सरसावुनि कसा तिथें आले
खरेदीचें तें काम सुरू झालें,
गुरें विकुनी आपुलीं कसायाला
धान्य घ्याया हा गरिब लोक आला !
वखारीचें त्या बघुनि तिथें दार
उभी होती राहिली एक पोर;
सान होती ती पोर अंत्यजाची
बालभावाची मधुर मूर्ति तीची.
प्राण होते डोळ्यात तिचे आले,
आंसवांनीं जाहले गाल ओले,
अशी तेथें ती पोर अंत्यजाची
उभी करुणा भाकीत त्या जनांची,–

" घरीं चिमण्या खेळती ज्या अनेक
पोर तुमची मी त्यांत असे एक
तुम्ही दादा ! आधार अनाथाला
जोंधळ्याची मज मूठ एक घाला !
घरीं भावंडें चार अम्ही सानीं
बये गेली टाकोनि अम्हां रानीं,
तुम्ही दादा ! आधार अनाथांचें
चोज पुरवा पोरक्या पाडसांचें !
घरीं बाळें आहेत भुकेलीं हो,
हाच त्यांच्या चित्तास एक लाहो,–
' अतां अमुची येईल घरीं ताई
हंसुनि चुंबिल देईल गोड कांहीं !'
देह माझा हा इथें उभा आहे
जीव माझा त्या जिवलगासि पाहे,
तुम्ही दादा ! आधार अनाथाला
जोंधळ्याची मज मूठ एक घाला !"
अशी बोलत ती उभी करुणवाणी
लोचनांनी गाळीत तिथें पाणी,
एक आला तों धनिक विप्र तेथें
पाय धरुनी विनविलें तिनें त्यातें,
महाराचा स्पर्श तो ब्राह्मणाला
सहन नाहीं क्षणभरिहि त्यास झाला,
लाथ मारुनि चाडाळ पुढें गेला
दाखवुनि तो मृत्युचें दार तीला !

---

## ९ कालचा महाराष्ट्र !

[ इसवी सनाच्या आरंभापासून तों सतराव्या शतकाच्या अंतापर्यंत महाराष्ट्रावर तीन परचक्रें आलीं पहिलें शालिवाहनाच्या काळीं शकाचें आलें, दुसरें, सत्याश्रय पुलकेशीच्या वेळीं बाण कवीचा आश्रय—दाता श्रीहर्ष याचें आलें व तिसरें संभाजीच्या वेळीं औरंगजेबाचें आलें. महाराष्ट्र स्वभावतःच स्वातंत्र्यप्रिय, हा आपला स्वभाव त्यानें त्या तिन्ही परचक्रांना दाखविला. प्राचीन इतिहासाचीं पानें चाळीत असतां महाराष्ट्राच्या या स्वभावाची साक्ष ठिकठिकाणीं सांपडते आणि ' कालचा महाराष्ट्र कसा होता ? ' हा प्रश्न मनांत घोळूं लागतो त्या प्रश्नाला उत्तर देण्याचा हा पामर प्रयत्न आहे. ]

---

### ( शार्दूलविक्रीडित )

" राज्य ‡ त्यागुनि जे वनांत दडले होते शकांच्या भयें
झाले भेकड दाक्षिणात्य नृप ते उन्मत्त आतां जयें.
होते चिंतित काल कोण असुचें वारील हें सांकडें
झाले क्षत्रप नष्ट आज ह्मणुनी उन्माद यांना चढे !
लीलेनें जरि दक्षिणापथ तुम्हीं केलात निष्कंटक
नाहीं सर्वच भूतलावरिल ते निःशेष झाले शक,
ज्याची खड्गलता रणीं चमकतां विद्युल्लता लोपते
आला, श्रीशकचक्रवर्ति सहसा तो आज आला इथें !
झालें उत्तर जिंकिता अखिल ज्या निर्वीरमुर्वीतल
आलें गर्जत उत्तरेकडुनि तें वेगें शकांचें बल
आतां वारिल कोण संकट महाराष्ट्रा ! तुझें हें पुन्हा
चित्तीं तूं शरणागतीविण दुजी आणूं नको कल्पना !
आंध्रांचा ह्मणतात * भृत्य तुजला,—आला शकांचा उद्यां

---

‡ Bhandarkar's History of the Dekkan P P. 28-29

* शालिवाहनवंशीय राजे आपणांस ' आंध्रभृत्य ' म्हणजे ' आंध्राचे सेवक ' म्हणवित असत. " मराठी रिसायत, " पान ७.

तूं होशीलच भृत्य वाहवुनि वा या शोणिताच्या नद्या ! "
आले घालित धाक हा शक जरी, झाला न त्यांना वश
केला संगर शालिवाहन नृपें नेलें दिगंता यश.
स्फूर्ती अद्भुत संचरे क्षणभरी—लोकांचिया अंतरीं
आला पाहुनि हा भयप्रद पुन्हां घाला स्वराष्ट्रावरि
झाल्या जागृत वीरवृत्ति अवघ्या, चैतन्य तें संचरे
निष्प्राणांतहि,—हें चराचर तदा स्वातंत्र्य तेजें स्फुरे !

[ २ ]

लाटांची घनघोर फेर जरि हीं क्षुब्धार्णवाची झडे
झाले हे न कदापि कंपित तरी सह्याचलाचे कडे
काळाचा जरि काळ येउनि उभा ठाकेल यांच्यापुढें
सह्याचे रणधीर पुत्र नच त्या होतील हे बापुडे !
सेनासागर हा अफाट बघुनी रेवातटीं थाटला
पोवाडा अतिभव्य बाणहृदयीं ज्याचा जरी दाटला,
सेनासागर हा तुझ्या परि नृपा ! येणें न आतां पुढें
लाटांचे बळ हें पडेल सहसा याचें इथें तोकडें,
कन्या दक्षिण ही अगस्तिऋषिची विंध्याद्रिला संमत
हा रोधील सदैव विंध्य तुझिया सेना समुद्राप्रत !
येथें तीं नच नांदतात हरिणें;—हें दंडकाचें वन
सिंहांचें गिरिगव्हरातुनि घुमे येथें शिलोत्पाटन !
भीतीनें तव हीन हूणहरिणें गेलीं दिगंता जरी
वीर्योत्कर्ष तुझा बघोनि जगती झाली जरी बावरी
प्रेमें मालवसिंधुगुर्जर तुला मानोत हर्षा ! प्रभू
नाहीं, ही परि शौर्यशुल्कसुलभा * नाहीं महाराष्ट्रभू !
राष्ट्राचा रणघोष गाजवुनि हा चालुक्य-चूडामणी
हर्षाचा परराज्य लोभ तुडवी पायांतळीं तो रणीं,

* " शौर्यशुल्कः सुलभो दक्षिणापथ । " म्हणजे शौर्याच्या जोरावर दक्षिणापथ–महाराष्ट्र सहज जिंकता येण्यासारखा आहे अशी बढाई हर्षाच्या सैनिकांनीं मारली होती ! ' हर्षचरित ' उच्छ्वास, सप्तम पा. १२४ ।

सत्याचा अभिमान वाहुनिच तो भूपाल सत्याश्रय
हर्षामर्षंहि तुच्छ लेखुनि रणीं झाला तया दुर्जय !

[ ३ ]

जातां स्वर्भुवनीं शिवप्रभु पुढें स्वातंत्र्यवीराग्रणी
धर्मोन्मूलनकार्य योजुनि मनीं सावेश दिल्लीहुनी
सम्राट् सैन्य असंख्य घेउनि जवें राष्ट्रावरी आदळे
राष्ट्राचें तिळमात्र धैर्य न परी त्याच्या भयानें ढळे.
झाली शंभुवधें * क्षणैक जनता निःस्तब्ध शोकें जरी
नाहीं मालवली कधींहि मनिंची स्वातंत्र्यनिष्ठा तरी !
धर्मोच्छेद करावयास सजला,—मानील कां त्या प्रभू
स्वातन्त्र्यप्रिय शंभुराजरुधिरस्नाता महाराष्ट्रभू ?
" घाली पायघड्या फुलें पसरुनी सृष्टी जिथें संतत
गंगासिंधुतुषारशीतल सदा वाहे जिथें मारुत
जेथ जानपदा न युद्धपटहस्फीत ध्वनी ऐकवे
भोगैकप्रिय कान्यकुब्ज अथवा काश्मीर तो हा नव्हे !
दिल्लीवल्लभपाणिपल्लवघनच्छायेंत हें निर्भय
होतें गर्जत सैन्य !—तें परि इथें पावेल आता लय—
सह्याच्या खडकाळ माळ दरडी उल्लंघितां यांपुढें !
धर्मध्वंसन-कार्य हें नच तुझ्या हातून आतां घडे !
नाहीं !–दास ह्मणोनि शक्य जगणें नाहीं महाराष्ट्र हा !
स्वातंत्र्यास्तव संगरीं झगडणें ही एक याची स्पृहा ! "
ही जाणीव पुन पुन्हा पटवुनी दिल्लीपतीच्या मना
धर्माच्या जयघोषणीं जिरविल्या त्याच्या वृथा जल्पना !
यावच्चंद्रदिवाकरौ तंव महाराष्ट्रा ! यशोदुंदुभि
लोकीं गाजविला पुन्हां करुनि ती स्वातंत्र्यशाही उभी !
झाले वीर विनष्ट आज जरि ते,–तें चित्र अत्युज्ज्वल
आहे दृष्टिपुढें तसेंच !–करितें चित्तास शोकाकुल !
झाला लुप्त तुझा स्वभावच महाराष्ट्रा ! कसा आज तो ?

---

* संभाजीच्या वधानें.

तेजोभग न राष्ट्र मानधन जें त्याला असा साजतो.
तेजोभग तुझा असा परि कसा झाला न कांहीं कळे,
कोणाचा तुज शाप भोंवुनि तुझी तेजस्विता मावळे ?
स्वातंत्र्याविण जें जिणें विफल तें तेंव्हां तुला वाटलें,
स्वातंत्र्योत्कट दिव्य भाव तव ते सारेच कां आटले ?
जावो, वैभव तें अशाश्वत तुझें गेलें लयाला जरी
बुद्धिभ्रंश पुढें असा तव महाराष्ट्रा ! न व्हावा परी.
काळाची करणी कठोर,—तुडवी तो नश्वराला जरी
त्याला अद्भुतरम्य राष्ट्रयश हें दुर्लंघ्य आहे तरी !
काळाला न कदापि शक्य करणें विच्छिन्न ज्यांचीं यशें
आहे दिव्य चरित्रचित्र तुझिया त्या पूर्वजांचें असें !—
त्यांचें विक्रम वैभव स्मरण हें चित्ता तुझ्या चेतवो !
स्वातंत्र्योत्कट भाव जागृत करो ! तेजस्विता द्योतवो !
बुद्धिभ्रंश अशेष लोपुनि महाराष्ट्रा ! पुन्हां विस्मित
होवो पाहुनि विश्वमंडळ तुझें शार्दूल विक्रीडित !

---

## ६ भगवा झेंडा.

[ १७६१ सालापूर्वी शनवार-वाड्यावर भगवा झेंडा फडकतांना पाहून कोणत्या मराठ्याच्या मनांत हे विचार आले नसते ?—

( चालः—पोवाड्याची. )

शिवप्रभूच्या स्वातंत्र्याचा हा भगवा झेंडा !
श्रीसंतांच्या शौर्यश्रीचा हा भगवा झेंडा !
संतकवींच्या सायुज्याचा हा भगवा झेंडा !
वागीशाच्या वाग्विभवाचा हा भगवा झेंडा !
पतिव्रतांच्या पुण्याईचा हा परमोद्रेक !
जुलुमावरलीं स्वातंत्र्याची ही भाला-फेंक !
सत्याचा निर्गुण काळाला हा शाश्वत धाक !
कर्तव्याची, भवितव्याची ही भेदक हाक !

'पौरुष करितें दुर्बल घातक दैवावरि मात'
या तत्वाची याद जागती ही झुलते येथ !
स्वातंत्र्यास्तव लढतां लढतां जे गारद झाले
रणसिंहांच्या हृदयांतुनि त्या उसळुनि वर आले—
चैतन्यासह जनसेवेचें मंगल जें ध्येय
मूर्तरूप तें गगनवितानीं हेलावे काय ?
राष्ट्रोद्बोधक ऊर्जस्वल संदेश समर्थांचे
जागवीत ते किंवा ध्वज हा वाऱ्यावर नाचे ?
सहज नभीं हा स्वातंत्र्यध्वज जेव्हां आंदोले
अभिमानानें राष्ट्रतेज हें वाटतसे डोले !
या राष्ट्राचें परम तेज हें जगतीं थडकूं दे !
भगवा झेंडा वातावरणीं अविरत फडकूं दे !

---

## ७ हिवाळ्यांतील वाऱ्यास.—

ही खेळतसे येथें संध्याराणी
नवलाचीं लेउनि लेणीं;
रविकिरणांनीं तप्त फार ही झाली
कोमेजुनि जगती गेली,
प्रभुकरुणा हें दृश्य बघुनि कळवळली
टपटपां आसवें गळलीं !
पसरुनि संध्या अरुणराग भंवतालीं
मग मायापांखर घाली,
कनकप्रभरविकरजाला
मिरवुनी खुले घनमाला
भुलवी ही जरि नयनाला
तरि तिमिरीं हा विरुनी जाइल सारा
क्षणभंगुर दृश्य पसारा !
मम हृदयीं हे विचार येउनि गेले
मन उदास माझें झालें;

जलनिधिलहरी कृत्रिम सीमा कोंड्या
उल्लंघुनि उसळत होत्या !
त्या लहरींना चुंबुनि शीतल झाला
शिशिरवात वाहत आला,
तत्स्पर्शानें पुलकित तनु मम झाली
क्षणभर वृत्तीहि उडाली !
जरि अंग बधिरलें सारें
तरि मन तें पिउनी वारें
कल्पना विश्व सग न्यारें
बघता बघतां गुंग जाहलें—गेलें
विरुनि त्यांत, तन्मय झालें !

* * * *

जरि गात्रें हीं बधिर मारुता ! केलीं
त्वत्स्पर्शानें या वेळीं
तरि जागृत हें बधिर चित्त मम झालें
तुजसवें स्वैर आंदोले !
नवजीवन जें अपरेला × अवतरलें
तेंच कां तुजसवें आलें ?—
आरोहुनि हा मरुद्गणांचा झोला,
बोल बा मुक्या चंडोला !
त्या तेजाच्या स्पर्शानें
बधिरता उडाला येणें
चैतन्य परि पुन्हां स्फुरणें
हा अनुभव जो आला त्या अपरेला
तोच कां इथें ये मजला ?
ही परिस्थिति कां वृथा मजवरी भूल
मन अधिकचि होत मलूल,

× पश्चिमेला युरोपांत; युरोपात उठलेली स्वातंत्र्याची लाट.

तुज विदित न कां आज महाराष्ट्राला
कोणता काळ हा आला ?
तुजवरुनी हीं स्वप्नें वाहत यावीं
क्षण एक परंतु टिकावीं !
मग फसविशि कां स्वातंत्र्याच्या श्वासा !
नसत्याची लावुनी आशा ?
तेजाचे तरल तरंग
हे करिती हृदय दुभंग
हा नश्वरतेचा संग—
जरि गुंगवितो क्षणभर जीवाला या
तरि जाइल आतां विलया !

* * * *

तरुलतिकाना एकसरें या वेळीं
हेमंत अदय हा जाळी.
मज भंवती ही भयाण जगती दिसते
व्याकुळ मन पाहुनि होतें,
बघ गेली ही करपुनि सारी सखया !
देवाची फुलती दुनिया.
परि परतुनि तो येतां मधुर वसंत
मग मरेल हा हेमंत !
फुलतील पुन्हा फुलवेली
लहरींच्या नव आंदोलीं
करितील तरुसवें केली !
परि फुलेल कां माझा हा * फुलबाग
सांग बा प्रेमळा, सांग !
त्या क्रूराच्या श्वासानें हा जळला
फुलबाग, जीव तळमळला,

* महाराष्ट्राची काव्य-वाटिका.

हा फुलेल कां पुन्हा कधितरी आतां
                    ही एकच मजला चिंता,
या हृदयाचें देइन तुजला मोल
                    बोल बा राजसा बोल !
ही नसत्याची लावुनि आशा सखया !
                    मग दुखविशि कां या हृदया ?
        मी विनति तुला ही केली
        परि व्यर्थ सर्व ती झाली
        वाऱ्यावर वाहुनि गेली !
तूं लहरि पुरा, लहरींतुनि या तुझिया
                    ने वाहुनि माझ्या हृदया !

*        *        *        *

हळुवार अती अभ्रखंड जरि असतें
                    गुलजार गुलाबाहुनि तें
तरि चुंबित तूं त्याला वारंवार
                    प्राणाहुनि मानुनि प्यार,
तत्तोयाचे उधळित दिव्य फवारे
                    झुलवित हें अंबर सारें
इह जगताला भुलवित तूं जातास
                    फुलतें मग हृदय उदास !
        वर्षाव करोनि सुधेचा
        —परमदिव्य चैतन्याचा—
        फुलबाग महाराष्ट्राचा—
हा वठलेला पुनरपि बघतां बघतां
                    फुलविला आज मी असता !
जरि पिकलेलें क्षुद्र पर्ण हें असतें
                    तरि तुजसह भरभर उडतें,
मग गगनाच्या सौधावरतीं चढुनी
                    स्वर्गंगेचें जल पिउनी

तें अनुभवुनी दिव्याचे रसरंग
होउनी पुन्हा अव्यग
दुर्दैवाच्या अगणित चंचल रेघा,
—जीवाच्या जळत्या आँशा—
त्या जात्या मग बदलोनी
पुनरपि या गगन-वितानीं
तुजवरि आरोहण करुनी
अनुभवगीतें उधळित तीं चौफेर
मी भ्रमलों असतों स्वैर !

* * * *

त्या गीतांनीं मग हीं करुण कहाणी
फुलबागाची गुफोनी
अस्फुट गीतें गाउनि संतत मी तीं
ऐकविलीं जगता असतीं !
मग मन माझें गीतरूप होवोनी
हें अनंतात मिसळोनी
नवतेजाचीं, स्वातंत्र्य-स्फूर्तीचीं
—राष्ट्राच्या भवितव्याचीं
गाउनी नवनवी गीतें
स्फुरवितो भग्न हृदयांतें !
मग सांग मारुता ! मातें
फुलबाग मला माझा जो अंतरला
लाधेल कधीं तो मजला ? ”

१८४९८

# सौ. फुलमाळिण.

[ नांव—सौ. सरस्वतीबाई कवनईकर. वय–२८ शिक्षण पुणें येथें. नंतर नर्स व मिडवाइफच्या परीक्षा देऊन पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाल्या. हल्लीं मुकाम मुंबई. ]

---

## १ कांट्यावरचा गुलाब.

( चाल०—चन्द्रकांत– )

गडग्यावरच्या थडग्यावरती शून्य सुखें पाहीं ॥
एकच फुलला गुलाब तेथें पुष्प दुजें नाहीं ॥ १ ॥
निर्जन वनिंच्या भयाण सौख्या, डोलत कां राही ॥
अशा जिवाला जीवन देउन कोण कुणा पाही ॥ २ ॥
दो दगडांच्या भर मातीच्या जिवनावर शांत ॥
कांट्यावरचा गुलाब करितो सुवास आक्रांत ॥ ३ ॥
हेतु तयाचा अपूर्ण भासे वास्तव एकांतीं ॥
अर्ध कड्याच्या निर्जनांत घे ? गुलाब विश्रांती ॥ ४ ॥
नको नको हा तोडुन ठेऊं मस्तकिं स्वकरानें ॥
आंतर्यामीं पूर्ण कोरिला निराश भ्रमरानें ॥ ५ ॥
भ्रम आशेचा भ्रम-रंगाचा दृष्टिस भ्रमवितो ॥
पतंग तेजा सन्निध जैसा देह-भ्रमीं पडतो ॥ ६ ॥
भ्रम जन्माचा भ्रम मरणाचा, भ्रम–चक्रीं फिरतों ॥
आयुष्याच्या कर्तव्याला प्राणी डगमगतो ॥ ७ ॥
सुख नेत्रांन सृष्टि-सतींच्या सौंदर्या पाहीं ॥
भ्रम–पटलाला दूर फेकुनी शांति मना देई ॥ ८ ॥
पराग मरूनी देह विरागी सौरभास मुकला ॥
अशा गुलाबा मुक्त कराया प्रभुजी कां चुकला ? ॥ ९ ॥

सरसर धारा कडकड तारा फिरत्या वाऱ्याला ॥
धीर मनाचा वीर बैसला कंटक थाऱ्याला ॥ १० ॥
सूर्य तपाला तोंड देउनी भानू शमवीतो ॥
सामर्थ्याच्या शौर्यावरती मुक्तिस मिळवीतो ॥ ११ ॥

---

## २ आशेची भिकारीण.

चाल०—( पुरे पुरे हा कावा प्रेमा मी. )

काय जगीं या आहे जादू सांगा मज कोणी
जीव-लतेच्या फांदीवरती पल्लव आशेचे
प्रेम सुखाच्या जोरावरती कां हे जोमायाचे जादू० ॥ १ ॥
भास उगवली कुणी पेरिली थाग मुळी नाहीं
स्वयंशक्तिनें बांधुन घेतां प्राणी मोहुनि जाई जादू० ॥ २ ॥
कोठुन आलो कोठे जाणें कांहिं कळेना हें
आशेच्या या धाग्यावरूनी आत्मा चालत आहे जादू० ॥ ३ ॥
संसाराच्या दर्यावरती माया-जालानें
जणूं पकडिले जीव मच्छ हे कुणी धीवरानें जादू० ॥ ४ ॥
दोन गोल ते समान ठेवित शिड आकाशींचें
वाऱ्यासंगे नाव चळवितो कौतुक रघुरायाचें जादू० ॥ ५ ॥
अथांग लहरा नाव डळमळे धडकी हृदयाला
क्षणात तरवी अथवा बुडवी कोठिल जादूवाला जादू० ॥ ६ ॥
वाढत गेली पुष्पें आली जीवलता भरली
तोंच अकालीं विज कडाडे जळून खाकहि झाली जादू० ॥ ७ ॥
आभासाचें वैभव दाउन हंसवुन रडवीतो
काळ गजाच्या पायाखालीं कमलें चुरडित जातो जादू० ॥ ८ ॥
माझे माझे म्हणुनी चढली कळसावर गेली
कुणी लोटिली दरींत पडली देहखाला मुकली जादू० ॥ ९ ॥
बिन-आधारी वृक्षाला या कोळी धागावी
निज अंगीच्या जाळ्यामाजी या विश्वाला गोवी जादू० ॥ १० ॥
पारदर्श ह्या वायूलहरी निश्चल बनवीतो
सुख-सौख्याचा खेळ खेळुनी प्रकाश उघडुनि देतो जादू० ॥ ११ ॥

चालुन आलें शरीर दमलें टाकुं कुठें आतां
हिंडत राहुन त्या रूपाशीं होइल केव्हां समता जादू० ॥ १२ ॥
धांवत जाउन घेउन यावी भिक्षा भक्तीची
भाव-मनाची माळा जपिते आशेच्या मुक्तीची जादू० ॥ १३ ॥

---

## ३ भ्रमराची चाल.

दिवस दिवस ही चालुन जाई मंद पाउलें पुढें पुढें ॥
चरण-रजावर लोळण घेउनि वृक्षावरती वेल चढे ॥ १ ॥
भार कळ्यांचा हार घालिते दृष्टी फेका तयाकडे ॥
मीपण सोडुन पुष्पें फुललीं सुगंध सुटला चहुंकडे ॥ २ ॥
डुगिंत त्याला गुंगत आला झडप मारिली फुलावरी ॥
रंगित हृदया संगित करण्या स्वच्छंदानें पान करी ॥ ३ ॥
मधु गंधाला लुटूनि घेई रसिकावरती ताण करी ॥
वायूसंगें भ्रमर चालतो वसंत-ऋतुचा मानकरी ॥ ४ ॥

---

## ४ चित्रमय जगत.

चाल :–( चंद्रकांत )

वसुंधरेचा कागद घेउनि सागरशाईनें ॥
भगवंतानीं चित्र रेखिलें अतुल कल्पनेनें ॥ १ ॥
दाहि दिशाचे पडदे सोडुन झालर पाण्याची ॥
नभीं चांदवा चंद्र लाविला किनार मोत्याची ॥ २ ॥
कोर कोरुनी मिनार भरली हिरव्या रंगाची ॥
त्यांत खुलविली परिमळ शोभा अगाध सुमनांची ॥ ३ ॥
हिमाचलाचा सिंह गुरगुरे नाद घुमे भेरी ॥
अनंत रूपाजलीं बैसली शेषावर स्वारी ॥ ४ ॥
सागर कन्या सेवा करिते ब्रह्म डुले भारी ॥
रत्नफणीचा विंझण वारा झुलवीतो वारी ॥ ५ ॥

पंच-भुतेंही स्वैर नांदती ईश्वर-दरबारीं ॥
त्रैलोक्याला व्यापुन राहे निज तेजें हारी ॥ ६ ॥

---

## ५ रान फुलें.

(साकी वृत्त)

बहार लुटिचा वसंत सरतां दुःखित झालीं रानें ॥
शोकसागरीं वेलि बुडाल्या गळून पडलीं पानें ॥ १ ॥
अन्नावरचीं रान-फुलें मग कोठुनि दिसती नयनीं ॥
सुकून गेलीं सांदित पडलीं काळ्या फत्तर-शयनीं ॥ २ ॥
कडे पठारीं झिरपत होतें जिवंततेचें पाणी ॥
त्या पाण्याच्या थंडाईला फुलें फेकिलीं कोणी ! ॥ ३ ॥
देवा घरचा कल्पतरू का ? फुलून पडला येथें ॥
वैराग्यांनीं फेकुन दिधलीं पाणिदार हीं मोत्यें ! ॥ ४ ॥
जिवा शिवाची मानस पूजा वाटे येथें पडली ॥
कां वनदेवी विसरुनि गेली हार तुऱ्याची परडी ॥ ५ ॥
मुशाफरीचा राजस राणा चांद-नभाचा मानी ॥
शुद्ध चांदण्या इथें पसरूनी गेला केविलवाणी ॥ ६ ॥
वन्य फुलांचें सूळ माजलें कोकण प्रांतीं थोर ॥
त्यांतच बसली, बसून थकली वन-भिल्लाची पोर ॥ ७ ॥
तिच्या गळ्यांतिल रान फुलांचीं माळच दाणोदाणी ॥
तुटून पडता रंगुन गेली कविराजाची वाणी ॥ ८ ॥
सैरावैरा वाऱ्यासंगें गरगर धरिती फेर ॥
कुठें पडावें जाऊन स्वर्गीं मनास लागे घोर ॥ ९ ॥
मन-सुमनांचीं बावन बिरुदें ओतुनि गेला कोण ॥
ज्या पुष्पांनीं सहज सजावें सगळें हिंदुस्थान ॥ १० ॥
काव्य तरूवर असाच येवो कळ्या-फुलांचा बहर ॥
त्रैलोक्यावर सुवास पसरो होवो जयजयकार ॥ ११ ॥

---

## श्री. अज्ञातवासी,

यांचें नांव दिनकर गंगाधर केळकर असें आहे यांचा जन्म पुण्याजवळ करंजगांवी झाला. कविता लेखनास सुमारें १९१५ पासून सुरवात केली त्यांची स्फुट कविता मनोरंजन, नवयुग, विविधज्ञान विस्तार, चित्रमय जगत, अरविंद खेळगडी विलसोनियन वगैरे मासिकांतून येत असते. विलसन् कॉलेजांत असतांना मराठी भाषेच्या अभिवृध्यर्थ त्यांनी मित्रमंडळीच्या सहाय्यानें " मराठी लिटररी सोसायटी " नामक संस्था काढिली त्यांचा " समग्र स्फुट काव्य संग्रह " लवकरच छापून बाहेर येणार आहे

---

### १ मायभूमि.

ध्यास मायभूमि ! तुझा लागला मदंतरीं
जननि गे तुझे
श्री हरी परी
मधुर नाम घुमघुमतें या मदीय मंदिरीं
काल तुझे वीरमणी
चमकले रणांगणीं
आणि आज तेच गुणी
दास आपुल्या घरीं
ध्यास मायभूमि तुझा लागला मदंतरी १
दाटुनिया येत गळा
पाहतां अशी तुला
भासतसे कीं मजला
खुपसली सुरी उरीं
ध्यास मायभूमि ! तुझा लागला मदंतरी २
शांति धरिली आजवरी
क्लेश होत अंतरीं

'हाय हाय' जीव करी
डागण्या किती तरी
ध्यास मायभूमि ! तुझा लागला मदतरीं ३

---

## २ पुणें दरबारीं.

शत्रुच्या खड्या समशेरी
वांकती पुणें दरबारीं
पेशवे मऱ्हाटी स्वारी
तळपती तिखट तल्वारी
तो वाघ-वाघ म्हैसुरी
कापतो उरीं
टिपू चौधारी
तळपती तिखट तल्वारी. १
चौघडा यशाचा झडे
उचलती विडे
थाट सरदारी
तळपती तिखट तल्वारी २
रणरंग पुण्यातिल दंग
बांधुनी चंग
घेत ललकारी
तळपती तिखट तल्वारी ३
वांकती थोर सरदार
दिल्लिचे वीर
पुणें दरबारीं
तळपती तिखट तल्वारी. ४
फुरफुरे लाख भिमथडी
सलामी खडी
झडतसे फैरी
तळपती तिखट तल्वारी. ५
केवढी—पुण्याची भिती
पहा ! कापती
चळचळा वैरी
तळपती तिखट तल्वारी. ६

---

## ३—श्री महाराष्ट्रास—

( चाल—पोवाड्याची )

छत्रपतीच्या महन्मंगला महाराष्ट्र देशा !
श्री दासांच्या धीरोदारा महाराष्ट्र देशा !
अभंगवाणी श्रीतुकयाच्या महाराष्ट्र देशा !
उदय पावती पहा तुझ्या त्या मावळत्या आशा ! !

❀ ❀ ❀ ❀

सह्याद्रींची कडेकपारीं निजलेली राई
आहे आतां राया ! उठली गाया अंगाई
होते इतुके दिवस उन्हानें निर्झर जे अटले
वीरांचीं ते स्तोत्रें गाया उठले रे उठले !
देशभक्तिच्या रक्तानें जी माखुनियां होती
माळावरती गारठलेली ती तांबुस माती
दृष्टी होता नवतेजाची पालवती झाली
आर्य-देवते ! तव पुण्याई आज फळा आली.
सिंहगडाचे बुरुज यशाचे निजले जे होते
वातावरणीं थरारणारीं गुणगुणती गीतें
तानाजीची जुनी समाधी दगडाची हाले
" जय " शब्दांचा ध्वनी त्यांतुनी रात्रंदिन चाले
रायगडीचा राया ज्याची दगडाची छाती
करवंदीच्या जाळीमधुनी डोकावी वरती
जंगलशाही मधला राणा उठला सभाजी
जरिपटक्याला तोलित चाले दख्खनचा बाजी
शिवरायाच्या भगव्या झेंड्या ! फडकत गगनात
रहा राजसा ! मृतराष्ट्रांनां आशीर्वच देत
हा कृष्णाचा, हा व्यासांचा, आर्यांचा देश
जगदोद्धारासाठीं येतो आहे उद्यास !

---

## ४ तानाजी मालुसरे.

निजला आहे सिंहगडाचा येथें हा राणा
भूमातेचा कलिजा राजस तान्हाजी तान्हा

❀ ❀ ❀ ❀

छत्रपतीचा हा तेजस्वी रणबाहू उजवा,
दख्खनच्या हा रणदेवीचा आवडता ठेवा

चकाकला हा तारा; धरणी तेजानें न्हाली
शिरकमलानें याच्या पूजा देशाची केली.

* * *

केली यानें पुन्हां सांगतों अपुल्या रक्तानें
सिंहगडावर स्वामीसाठीं या बरकंद्यानें.

---

## ५ कै० बालकवि.

( पुण्यस्मरण ! )

फुलवंतीचा हार कवे ! तूं वालुन नटलास,
पाहवलें हें नाहिं राजा ! त्या यमराजास
फूल चुरडिलें ! ! दाहिं दिशांना सुवास दरवळला.
महाराष्ट्राचा कवी धाकुटा अजरामर झाला

---

## ६ उठ रे भाई !

निशिदिनीं तळमळे भू-जननी-
कळवळा न कां ये तुज अजुनी !
निंदुनि जनसी भाई ! जगभर
अन्नास्तव कां वांकविशी शिर
उदरीं कांटे ह्याहुन जा-भर
कां धरा शिणवीसी तूं जगुनी
कळवळा न कां ये तुज अजुनी
स्वच्छंदानें सह्याद्रीवर
उघडे डोळे करुनी जा-फिर
ऐक-, काय तो दगडी डोंगर
तुजपुढें कथिल रे हळहळुनी
कळवळा न कां ये तुज अजुनी २

स्वतंत्र वारा आहे सुंदर
खडी शाहिरी गात निरंतर
कुठें परंतु–तूं ! ! पामर
माता रडविशि दिन-रजनीं
कळवळा न कां ये तुज अजुनीं

---

## ७ कै० " कविवर्य " गोविंदाग्रज "

हा दख्खनचा दिवा, फुलांचा हा फुलता झेला.
रसवंतीचा राम लाडका, काळमुखीं पडला ! !
चिरंजिव तूं कवे ! तुझ्यासम कवी तूच बाला !
धन्य ! धन्य ! हा तुझा, तुवां बा ! महाराष्ट्र केला.

---

# मनोहर, बी. ए.

या कवींचें नांव गोपाळ गंगाधर पोतदार असें असून याचा जन्म सातारा येथें सन १८९६ त झाला सातारा येथें प्राथमिक शिक्षण झाल्यावर धुळयास दुय्यम शिक्षण झालें व पुण्यास उच्च शिक्षण होऊन यंदा ते एम. ए. च्या परिक्षेस बसणार आहेत. पहिली कविता " जन्मभूमि " ही १९१३ सालीं लिहिली-" छत्रपती " नांवाचा एक पोवाडा लिहिला असून पुष्कळ खंडकाव्यें अप्रसिद्ध आहेत. कै. गोविंदाग्रज कवीचे हे शिष्य असल्यामुळें कवितेच्या संख्येपेक्षां कल्पनेचें नाविन्य व तीव्र मनोभावनांची उत्कटता या गोष्टींवर यांचा विशेष भर आहे. " प्रेमसेवा " हें नाटक हल्लीं हे लिहीत आहेत.

## १ " प्रार्थना "

( उदास मनाचें रडकें गाणें सुखात पोहणाऱ्या जीवांनां कटाळवाणें वाटतें ! )

---

नव्या वसंता उधळ सुखाचीं सुमें त्रस्त भूवरती
क्षुब्ध सागरीं शांत हसूं दे तळचीं माणिक मोतीं !
आशेचे मृदु किरण नाचुं दे चिर नीलाऽऽकाशीं,
प्रत्यक्षाची गांठ पडूं दे काव्य कल्पनेशीं !
नव प्रेमाची मूर्ति माझी मागे झाली खाक,
हातीं आली भूतकालच्या सुखस्मृतीची राख !
त्या जीवाला भरलेलें तें हृदय दिलें, हें असलें
रितें, गोड घ्या करुनी, रसिका मानससुम सुकलेलें !

---

## २ कां—?

आयुष्याचा स्वर्ग खेळतो बालपणीं हृदयीं !
तारुण्यामधिं भयाण दुनिया नशिबाला येई ?

कल्पनेंतली रम्य कल्पना प्रेम-सौख्य—भास !
प्रत्यक्षीं परि जीव नाचवी उल्हासी आस !
सौख्याशेच्या अंधुक-रात्रीं मिटलेले डोळे !
कल्पनेंतल्या रम्य दिनांचे बघती सोहाळे !
सौंदर्यांचा स्वर्ग पाडितो नयनाला भूल !
आशा लहरी हृदयावरती करिती कल्होळ
सुंदर असल्या दुनियेच्या या उघड्या बाजारीं
नैराश्याच्या निःश्वासाची गर्दी ही सारी !

---

## ३ तालाचा बेताल.

रानरानचीं फुलें आणिलीं, देवी, तुजला पूजाया,
दहा दिशांला उधळुनि दिधलीं तूंच सुमें तीं कां वाया ?
तव इच्छेच्या तालावरती सूर जिवाचा मम लागे,
तुझ्याच जीवासाठीं केलीं नवीं नवीं ती किति सोंगें !
सुंदर असल्या जीवासाठीं लाथ मारिली जगावरी !
अनेक तोडुनि एक जोडणें तेव्हां गमलें हितकारी
पुरवाया तव लहर एक कीं, जिवाजिवाचें मोल दिलें
हाय ! परंतु कांहीं नाहीं तुझ्या मनाला तें आलें !
आकाशीची चटकचांदणी येईल हाताला ह्मणुनी
पुढती केला हात, त्यात परि फत्तर पडला हा ! वहनी,
नाचविलें या मना सदा तव नयनांच्या तालावरती !
तालाचा बेताल वेतला कसा, सखे, जीवावरती ?
वेड लागता प्रेमाचें मग जन्माचा होतो खेळ !
“ मनोहराचा जीव धुंडितो कोणाला रानोमाळ ?

---

## ४ तुंबळ सागर.

तुंबल सागर खळवळला, तुफान वारा हा सुटला !
लहरीवर उडती लहरी, फेन नाचतो वरीवरी !

रत्नाकर हृदयीं भरला, रत्नांचा बाजार खुला !
आला नाविक बहु शूर, रत्नें काढाया चतुर !
एक लाट ने स्वर्गाला ! दुसरी दावी पाताळा !
नाविक दमला, यत्नीं हरला, मनिं घाबरला,
गगन-चुंबि सागर-लहरी, धरिती नाविक वह्ट उरीं !
प्रेमाचा चुकला ताल, झाली मगर मिठी सैल !
जीवाचें दिधलें मोल, यत्न जाहले परि फोल !
निर्जिव नाविक जलावरी, होता लोळत बहूपरी.
आयुष्याची अमदानी, विषय सुखाच्या लहरींनीं,
खळबळली हृदयीं फार, मन नाविक मनिं बेजार !
स्वधर्म, प्रीती, अमोल मोतीं, तळीं हांसतीं,
येतिल केव्हां हाताला ? प्रश्न पडे हा चित्ताला.

---

## ५ निष्ठुर चंद्र.

काळोखाच्या काळ्या रातीं
निद्रित विश्वाच्या एकांतीं,
सुंदर, हंसऱ्या तारा–पंक्ति,
तारानाथा ! आनंदानें होती मनिं बेहोष !
" येईल भुवनीं जीवन-राजा,
सौख्यनिधी तो परेश माझा,
पुरविल मग तो अगणित चोजा,
तरुण मनाला सौख्यावांचुनि काय दुजें दिसणार ?

* * * *

म्लान अशी का तारा झाली ?
लाली विरली वदनावरली
हास्याची ही उकळी निवली !
हाय ! खेळतो चंद्र-भूवरी सागर लहरींशी !
उत्कंठेचा सुटता धीर,
नैराश्याचा मनिं अंधार,

आनंदाला करि बेजार,
प्रेम-निराशा सौख्यमंदिरीं लावी भीषण आग !
विषण्ण होउनि ताराबाला,
सज्ज जाहली अपायाला,
मन-सुमनाला हृदयेशाला,
भग्न मनांच्या राशी दिसती रात्रीं आकाशांत !
असंख्य आशा–तारा चित्तीं,
निष्ठुर चंद्रा बघुनी गळती !
मेलेल्या प्रेमाला गीतीं
गातां, येतें " मनोहराला " हास्य बहू भेसूर

---

## ६—स.

दृष्टी लावुनि पाहशी मजकडे कां, सांग, आतां, गडे
मेलेलें सुख कां कधी पुनरपि होइल वाटे ? खडें,
येतो कंठ भरून गद्गद रवें जों दृष्टि मागे वळे !
रात्रीचें सुख आठवुनि दिवसां आकाश–तारा गळे !
जीवाचें जग हें असेंच झुरतें चित्रें बघोनी जुनीं !
मेलेला मधुमास हा रडवितो सृष्टी सतीला वनीं ।
गेलेला सुख-स्वर्गसे तो पुनरपी देऊ कसा प्रेमले ?
हें हातांमधलें भयाण जगही मच्चित्तनेचीं सले ;
नाहीं शोभत दिव्य हार तुजला हा अश्रुचा सुंदर !
प्रेमप्राप्ति सदैव, स्वर्ग तरि तो नांदेल भूमीवर !
चित्ताचें रडकें स्मशान दडवी, भेसूर, आतां पुढें ।
सौख्याचें हसरें सुखीं विलसवी उद्यान खोटें गडे !
प्रेमाची जळती चिता भडकली चित्तामध्यें भीषण
देवा ! कोण करील या मनिं अशा आतां दयासिंचन ?

---

## ७ केव्हां—?

कर्तव्याचा भार वाहुनी दमलेला जीव !
विश्रांतिस्तव पाहत होता सौख्याची शीव !
एकांताच्या भयाण हृदयीं भरला बाजार
विषण्णतेचा, तेथें त्याला कुठला आधार ?
जड हृदयाची उदास दृष्टी खिळली आकाशीं,
भग्न मनांच्या असंख्य तेथें मेलेल्या राशी

* * * *

आनंदाचें हसणें मंजुळ तों आलें श्रवणीं,
सौधावरती दिसे कुणाची सुंदरशी राणी
नाचत होता वदनावरि त्या वसंत सौख्याचा !
पवन सुगंधी तारुण्याच्या फुलत्या पुष्पाचा ।
तारुण्याच्या मनमोहक त्या भाग्याचा स्वामी,
नेऊं सजला हृदय-शारदा मोदें सुख-धामीं !
" नाथ "—मानिनी विनोद युक्ता, कोप वृथा दावी,
" देवि"—गायनें सुखासुखांचीं कुणी कशीं गावी ?
मूक गायनें गातां, झालें मीलन नयनांचें !
आलें हृदयां भरतें तेव्हां पहिल्या भेटीचें !
आनंदाच्या प्रासादीं सुख-सौधावरि दोन
प्रेमळ हृदयें जड जगताला गेलीं विसरून

* * *

रुक्ष भूवरी बसला होता हतभागी जीव !
रम्य स्वर्ग तो बघुनी आली नशिबाची कींव !
तरंगणारा अश्रू त्यानें नयनींचा पुसला;
देवा, केव्हां स्वर्ग तयाचा येइल हाताला ?

---

## ८ आशा स्वप्न.

[ सौंदर्यदर्शनानें वेडे न होणारे महात्मे धन्य होत ]

रूपाला बघुनी सदैव मन हें वेडें बनावें पुरें !
नित्याचीच मनां असे संवय ही होतें बहू बावरें !
औदासिन्य जनांसि दाखवुनिया चित्तें झुरावें मनीं !
प्रेमाला लपवावयास्तव सदा रीति अशी ही जनीं !
मार्गानें फिरतां विषण्ण हृदयें दृष्टी पडे सुंदर,
बाला कोणि अतीव मोहक बहू, नाजुक, चेतोहर,
बाल्याची पहिली छटा भरुनिया सौंदर्य लोळे मुखीं
कैचें दुःख तयास ज्या मनिं मुळीं नाहींच चिंता फुकी ?
लोकाचार ह्मणूनि दृष्टि फिरवी अन्यत्र तेव्हां कवी,
कैसें चित्त वळेल पाहुनि अशी सृष्टी विधीची नवी ?
आशेची पहिली मनांत उठली जी लाट ती थांबली
सौख्याची न कधीं मनां संवय ती दृष्टीहि भांबावली
दुःखांची अनुभूति नित्य असलें हें चित्त, देवा, वदे
आशा-स्वप्न कधीं घडेल मम हें प्रत्यक्ष सृष्टीमध्यें ?

---

## ९ बाल मुकुंद.

" बालमुकुंदा, नंदाऽऽनंदा, आनंदकंदा, गोविंदा,
प्रेममरंदा, पदारविंदा तुझ्या भाळला जिव बंदा !
आयुष्याच्या सट्टयामध्यें सौदा सौख्याचा हरला !
शांत जाहलें शांतीचें तें मुद्दल जिव हा घाबरला !
बाह्यांगाची आवड, नावड अंतरंगिची, व्यवहार
जगताचा, हा सदा कुणाला सौख्य कसें वद मिळणार ?
सुंदर युवतीसंगें काढुनि आयुष्याची अमदानी,
जनता मग ही कीर्तिलक्ष्मिच्या चरणीं लागे प्रौढपणीं !
वेदांताच्या पुष्कळ, बाष्कळ, निष्फळ गप्पा मारोनी,
परेश-भक्ति-यत्न-विचारी जग मग लागे वृद्धपणीं.

प्रफुल्ल जीवित-सुम सुख-भृंगे हुंगुनि जेव्हां तें सुखतें
वृद्धपणीचें म्लान पुष्प तें कोणा देवा आवडतें ?
देवासाठीं तारुण्याच्या ऐन उमेदीवर पाणी
सोडुनि, काडें हाडांची जे करिति धन्य ते वीरमणी !
कुंजविहारी, मुरलीधारी, चेतोहारी, श्रीकृष्णा,
तुझ्याच चरणावरी वाहिल्या संसाराच्या मम तृष्णा ! ”

* * *

“ श्याम कन्हया, नको धावुनि घालुं मिठी मम हृदयाला
परमपावना जरि ती, दिसते विपरित विषयीं जगताला !
नको नको रे स्वमुख मन्मुखीं ठेवुनि चुंबु घननीला !
पापी जगतां पापी दिसते शुद्ध, शुद्धरे गोपाळा !
बैस, असा तूं यमुनाकाठीं सदासर्वदा गोविंदा,
जन दृष्टीच्या समोर बसली अशी पहा ही ही राधा !
प्रेम चोरटें सदा जगाचें फुलतें बहुपरि एकांतीं !
शुद्ध प्रेमा बहर माधवा, आपण आणूं लोकांतीं
डोके भरुनी मला कन्हया पोटभरी तुज पाहूं दे !
मंजुळ-मुरली-नादें माझी सौख्यसमाधी लागूं दे !
कल्पनेतलें रूप पाहुनी प्रत्यक्षीं तव, वनमाली !
अंत होऊ दे राधा-वैयक्तिक जगताचा या कालीं !

---

## १० पंचप्राणांची पूर्णाहुती.

[ संपन्नतेच्या रामराज्यांत सुद्धां दुष्काळाचा वनवास घडतो ! ]

उत्कंठेची सीमा झाली आतां या पुढती,
आशेचा ही अंत जाहला या दुर्बल चित्तीं
आनंदाचें वारे कुठलें आता या नाशिबीं ?
परिचित झाली या हृदयाला सौख्याची गरिबी !
ओळख नाहीं मुळि हास्याची ! पूर निराशेचा
आला, झाला हार गुंफुनी तयार अश्रूंचा !

आयुष्याच्या खडतरतेचा कडेलोट झाला !
दीन मनाच्या शून्य दृष्टिला विषय न मुळिं उरला
पहावयाचें आतां कांहीं नुरलें या जगतीं
'मनोहरा' च्या मना मस्तकीं लावि मृत्युविभुती !
नैराश्याच्या भेसुर असल्या जळत्या आगींत।
प्रभुराया, दे एक तरी चिरशांतीचा झोत !
विषण्णतेच्या भयाण भीषण या अंधारांत,
अधुकशी तरि देवा दे रे समाधान-ज्योत !

* * *

सर्वस्वाची आहुतिहि घे, दुर्दैवा, आतां
पंचप्राणांची पूर्णाहुति घ्या जीवन-नाथा

---

## ११ शांता.

[ तारुण्याच्या कंटकमय मार्गांत पाऊल न टाकलेल्या व बालपणाच्या हिरवाळींत खेळणाऱ्या सुंदर बालिकेस—

( चाल-अजि हौस जिजीची पुरवा—शिवसंभव. )

ये शांत कराया देवी
सुखस्वर्ग जिवा-या दावी !

बाल्याची गहिरी नजर, रुळणारा कुंतल भार,
मंदस्मित फुलत्या कळिचें, दो गुलाब मृदु गालांचे
पाडिती मनाला भूल, जाहलें हृदय बहु लोल
नवनवी नवाई भासे, हें उदास मन क्षण हांसे,
विषयाचा भीषण नाद, उठवी न अझुनि पडसाद
विरहाची जळती आग, जाळी न मनाची बाग !
अधरांचें गायन मूक, अज्ञात अझुनि तें सूख
स्फुरणारी बाहू लतिका, कवटाळि न कोणा विटपा
स्वप्नांतहि निद्रा गाढ, पुरवी न मनाचे लाड !
दिनसान पळति बाल्याचे, हंसण्याचे, आनंदाचे,
विरहाच्या येतिल राती निद्रेची करितिल माती !

तोंवरी खेळ, मग पुढती,
करमाला कळीं पडतां.
पहिल्या दो नजरा जमतां,
नाचेल स्वर्ग भूवरती !

निश्वास अश्रुची मैत्री
अधराचें गायन गाता !
हृदयास हृदय तें मिळता
फुलवील मनसुमें प्रीती !

तोंवरी खेळ, वेल्हाळे,
निवळूं दे मजला डोळे !

# कवि गिरीश.

या कविचा जन्म सातारा जिल्ह्यांत 'फत्यापूर' या गावीं आश्विन वद्य चतुर्थी शके १८१५ म्हणजे २८ आक्टोबर १८९३ इ. रोजीं झाला यांचें सपूर्ण नांव 'शंकर केशव कानेटकर' असें आहे. यांचें मराठी शिक्षण रहिमतपूर येथें व इंग्रजी शिक्षण सातारा व पुणें येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें झालें पुढील उच्च शिक्षण पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजांत घेण्यास सुरवात केली. एक वर्ष पदरांत पडलें व त्यांच्या सकटांस सुरवात झाली. शेवटीं यामुळें तो कोर्स सोडून देऊन पुणें न्यू इंग्लिशस्कूलमध्यें नोकरी धरली व पुढे कायमही झाले. परंतु मनांतील शिक्षणाची इच्छा जाईना व सांपत्तिक स्थिती साधारणच असल्यामुळें स्वतांचें शिक्षण स्वतांच करावें लागणार या विचारानें त्यानीं एक वर्ष शिक्षण व एक वर्ष नोकरी याप्रमाणें आपलें शिक्षण आटोपण्याचा उपक्रम आरंभला व त्याप्रमाणें यंदा त्यांचे शिक्षण पूर्ण होईल. हलीं हे सी बी. ए च्या वर्गांत आहेत

कविता करण्याचा नाद शाळेंत पाचवें इयत्तेंत असतांना इ. स १९०८ सालीं लागला व ते १९१२ पासून कविता लिहूं लागले.

त्यानीं पुढीलप्रमाणें खंडकाव्यें लिहीलीं आहेत.

( १ ) निर्झर-संगीत ( २ ) नक्षत्रोदय ( ३ ) वनश्री-विलाप ( ४ ) विहग-विहार ( ५ ) बालगीता ( ६ ) अभागी कमल ! ( ७ ) * आंबराई ( ८ ) * इंदिरा.

ही दोन काव्यें हे सध्यां लिहीत आहेत. यापैकीं "वनश्री-विलाप" व "अभागी कमल" हीं बरींच मोठीं म्हणजे प्रत्येकीं सुमारें २००० ओळींचीं आहेत. यांनीं स्फुट कविताही कांहीं लिहिली आहे.

---

## १ विश्व-कमल.

( राग असावरी )

मधुर तुझें प्रभु चरण नमावें !
नाम तुझें कवनीं गावें ॥ ध्रु. ॥

विश्व-कमल हें सहज उमललें ।
तव रूपाचे पराग फुलले ।
प्रेम मरंदें सुरुचिर भरलें ।
जीव-भृंग तेथें भावें ॥ १ ॥
स्वार्थानें मधु मरंद-पानीं ।
रत होउनि तो दिन रजनी ।
तव रूपाचे अणु होवोनी ।
मुक्तिपदातें मग पावें ॥ २ ॥

---

## २ काव्य-देवीचा निवास.

जीचे पादसरोज सुंदर सदा सेवावया सागर
मोत्यांच्या नव अंजली उधळितो लाटांसवें सुंदर
चूर्णें शुभ्र सुरक्त तीं निशिदिनीं स्वर्गांतुनी वर्षतीं
जेथें चंद्र रवी जरा विरमुनी प्रेमें मनीं हांसती;
जेथें निर्झर धांवती, पसरली उत्तुंग शैलावली
पुष्पें खेळतिं भोंवतीं मृदु जिथें भूमीवरी वा जलीं
वायू वृक्ष विहग वा विहरतीं वेली मुलें वा फुलें
जेथें रंगुनि दंगलें स्थिरचर प्रेमें त्रिलोकांतलें,
सौंदर्यें सगळीं नटून बसलीं जीच्या सदा भोंवतीं
संगीतें मधुरध्वनी करुनिया जेथें सदा राहतीं
पावित्र्यें वसतीं सदा, विपुलता, सौख्यें जिथें नांदतीं
जेथें षड्रस-भाट मंजु वदती ॐकार-नाद स्तुती
चारी वेद सुरम्य मंडपिं जिच्या स्तंभांपरी शोभती
तेजाचें विलसें वितान, हृदयें हास्यें जिथें नाचतीं
शब्दांच्या नव झालरी लटकतीं मोत्यांपरी सोज्वला
स्फूर्तींच्या कनकासनीं विहरते तेथेंच ती मंगला
स्वच्छंदें सुविहार ती अविरत श्री विश्वराज्ञी करी
सत्तेचें बल गाजवी अतुल ही या रम्य विश्वावरी
निःस्वार्थी परि जाहला सम तिथें तो कर्मयोगी कुणी
प्रेमें तन्मुखि ती सदा विहरते तत्सेविका होउनी.

---

## ३ जीवितोद्यान.

( चाल–घनःश्याम सुंदरा श्रीधरा— )

भवबंधाच्या नैराश्यतमीं जीव अंध हो जरी
आशेच्या तारका उगवती त्यांतच सुंदर परी
जीवनकुंजीं मन कल्पना विरती दृश्यामधें
मोदवायु मग वाहुं लागतो मंद मंद त्यामधें
उत्साहाचा वसंत येउनि फुलवी दाही दिशा
स्फूर्तिलता नव मधुर बहरती प्रेमजलानें तशा
निर्मलतेचा गंध पसरुनि हृदय होय पावन
कृतिच्या कलिका तोंच उमलती हळुहळु रात्रंदिन
तारुण्याचा धवल चंद्रमा हांसहांसुनी, परी—
काल-नगाच्या खालीं लपला सुकृती होउनि, तरी—
—दिक्कालीं इह-कर्तव्याची चित्रें चिर पाहतां
कृतिमय होउनि निशिदिनिं लागे झुरणी जीव स्वतां
अज्ञानाची रजनी संपुनि मोह विलय पावतो
हृदयप्रांतीं ' दिव्यभास ' नव अरुण दिसूं लागतो
जीवात्मा–चंडोल वृत्तिच्या तारा मधु छेडुनी
मंगल गीतें गाउं लागतो स्वयें सूर मिळवुनी
ज्ञानरवीचे दिव्य किरण ते पडतां या उपवनीं
हसतें, फुलतें, झरतें, विरतें सारें एकस्वनीं
फुलें हांसली, बाग बहरली वायु मुदें खेळला
निशा निमाली, उषा उदेली खेळ जरी संपला—
—स्वानंदाच्या नादरसीं तरि जीव सुखें गुंगतो
विश्वबंधुता हृदयीं भिनतां ' परमेश्वर ' होइ तो

× × × ×

नैराश्यांतुनि उद्भव होतो प्रेमाचा या परी
कृतिमय आशा ' नरका नारायण ' नच कीं ती करी ?

## ४ अकालीं मावळलेल्या ताऱ्यास—

[ गरीबींतून वर आलेल्या, कणखर मनाच्या मित्रप्रिय प्रियमित्राची श्रीयुत धोंडो विठ्ठल तांबे बी. ए. ( ऑनर्स ) याची मृत्युवार्ता ऐकून ]

( साक्या )

बालपणींच्या जीवन-मित्रा ! कोण अता रणधीर
दारिद्र्याच्या रम्य रणांगणिं गाजवील समशेर !
× × + +
अस्तगिरीवर उदय जाहला तव, या क्षितिजाजवळी—
दूर अंबरीं ? परि भूतें हीं निजलीं विश्वामधलीं
ब्रह्मांडांतिल गोल झोपले डोलत नाभिं फिरफिरुनी
म्हणून तुजला मार्ग न दावी कोणी विश्वा मधुनी
अंधाराच्या ओसाडींतुन सूर न देई कोणी
तरी गाइलीं तुवां आपुलीं जित्या जिवाचीं गाणीं
किरणें फेकुनि इवली अपुलीं विश्वाच्या अंधारीं
मार्ग शोधिला उदयगिरीचा आशेच्या संसारीं
मार्गामधल्या सुकल्या सुमना तेज जरा देवोनी
सौंदर्यानीं हांसविलेसीं गाउनि त्यावर गाणीं
मेघ पातले ! वीज कडाडे !! आकाशहि कोसळलें !!!
परि जीवाचें जिवत गाणें एक तुवां चालविलें
उदयगिरीवर येउनि अपुल्या नव कोमल किरणांनीं
जन्म दिलेल्या 'अस्तगिरीला' हांसविलें नयनांनीं
निजलें होतें विश्व, परी मी लावुनि तुजवर डोळे
पहात होतों पुरोगतीचे खेळ तुझे हे सगळे
"—इवला तारा 'अस्तगिरीचा' अनंत आकाशांत—
फिरे एकला, उदयागिरीवर चमकवि आत्मज्योत—"
—हेंच दाविसीं विश्वातें, परि विक्रम याहुनि थोर—
करिशिल ह्मणुनि जिवास होता आशेचा आधार
आशेचें परि काव्य राहिलें अपुरें—
आशा-कवना चिरशांतिचा एकच पूर्णविराम
+ + +

डोळे लावुनि बसतां येईल तारा उदया खास
जीव लावुनी तुजवर, शिणवू कुठवर परि जीवास ! '

---

## ५ शिकार.

( सूत्रः—सिंहगडाच्या रानांत लपून बसलेला वाघ सांपडत नाहीं म्हणून निराश झालेल्या, एका जातिवंत, मराठ्या शिकारी शिलेदारास उद्देशून )

मर्द मराठ्या ! उठ, विखारी भाला निज सावरीं
व्याघ्र, बघ, लपला या कंदरीं
कट्यार आतां परजुनि वीरा ! घाल उडी त्यावरी
ढाल घे नरशार्दूला ! करीं
निज बिजली समशेर चमकवी खेळुनि या संगरीं
पिऊं दे रक्त तिला क्षणभरी
करुनिया गर्जना दुमदुमवी हें वन
करि मेघनाद ही बिजली सरसावुन
हा नाद भेरिचा घुमवू दे कानन
चराचराला जागृति आतां आणुनिया सत्वरी
विखारी भाला निजसावरीं

( २ )

शिंग फुंकुनी बोलावुनि घे त्यातें अगावरी
चालवी भाला मग त्यावरी
पोटासाठीं गोवध करि जो चोर, तयाच्या शिरीं
नाचवी चपला धारा पुरी
मृग भक्षुनि जो वनदेवीच्या स्वातंत्र्यातें हरी
जाणवी धारा त्यातें पुरी
शमवाया अपुली क्षुधा नित्य बहुपरी
तव बाधव वधि तो नरभक्षक निजकरीं
बेबंद जाहली काय पुरी वा दरी
क्रोधाग्नीच्या ज्वाला भडकति ज्याच्या वीरांतरीं
तयाला शिकार लाधे खरी

( ३ )

नरवीराच्या रक्तामधुनी कण वाहति कोणते ?
' शिवपदा ' स्मरुनी मज सांग तें
गीत कोणतें नादुनि राहे वीराच्या अंतरीं ?
सांग तें नाचें का संगरीं ?
' समशेरीवर शीर शत्रुचें झेलावें ' या विना
कोणता स्वर्ग सांग तन्मना ?
मुखिं खड्ग धरोनी शिवबा तीरापरी
का पोहत गेला दुसऱ्या तीरावरी ?
गोवधास्तव कुणा जाणविं धारा पुरी
त्या सिंहाचा छावा खेळवि व्याघ्रातें बहुपरी
तयाला शिकार लाधे खरी

( ४ )

अतुल असे सामर्थ्य तुझें, नच जाणिव त्याची तुला
तयाला एक दीन जगिं तुला
रणशिंगातें फुंक जरा मग पहा मृतांचीं शवें
जिवंतचि होतिल नादासवें
रणांगणीच्या वनांतरिच्या अस्थी उठुनी क्षणीं
नाचतिल जिवंत देहांतुनी
या सिंहगडीचें रक्त सजीव होउनी
त्या रायगडींची भुतें येथ येउनी
त्या पुरंदराचीं शस्त्रास्त्रें धडकुनी
माय भवानी शिवनेरीची कृपा करिल तुजवरी
शिकारहि लाधे तुज मग खरी

( ५ )

"पुण्यपुरी"च्या पुण्याईचे आशीर्वच मंगल
तुला हा पर्वतीश देइल
नद्या-निर्झरीं कडेकपारीं दडलेल्या गर्जना
बोलतिल खड्गांतुन खणखणा

तिलक सलीनें निघतांना जो तव भालीं लाविला
—ऐक ! तो ' जयोऽस्तु ' बोले तुला
समशेर सावरी ! सावज हें सोडिना
जाणवी कृतीनें भाल्याची कल्पना
लेखणी लवोनी गाइल मग गायना
सर्वस्वाचा यज्ञ कराया शिर घेउनि निजकरीं—!
सजे त्या शिकार लाधे खरी ।।

---

## ६ देशभक्तीचा मंत्र

( अभागी कमल ' या सामाजिक खंड-काव्यांतील एक उतारा )

पुरा कडोसा पडला नव्हता ! किरणें सुंदर पिवळीं
नाचत होती पिकावरोनी रानीं सायंकाळीं
हाकित होता मोट अजुनि ही शेतकरी शेतांत
दोराखालीं चाकें होतीं ' किरकिर ' शब्द करीत
चुचकारोनी मधुनच कोणी ' राजा-सरदाऱ्याला
खड्या सुरानें गाणें गाई थकवा घालविण्याला
वहात होतें झुळ झुळ झुळ झुळ पाटामधुनी पाणी
डोलत होतीं पिकें रानचीं वाऱ्यावरती फुलुनी
घरास वळलीं गुरें, थांबलीं वाकवटिं कुण्णेंत
माती उधळुनि कोणी होते डरकाळ्या फोडीत
पाणी पिउनी नीट घराला गेल्या कांहीं गाई
कुणी गाठिली गवत कोवळें खाया ताटिंची मळई
पांगुनि गेलीं हीं खिल्लारें, आणाया वळवून—
धांवधावुनी गो-पाळाचा गेला जीव दमून—
मळईमधल्या शेंगा घेउनि हातीं, उगरी-वरुन
पहात होता मौज खालची हांसत कोणी तरुण

× × × ×

मर्दपणाची मोहक जादू विलसे वदनावरती
विद्वत्तेची नवी तरतरी भालीं खेळत होती

अधरावरतो लिहिला होता देशभक्तिचा भाव
गालावरती रंगत होता प्रेमाचा नव डाव
कारुण्याचें पाणी होतें तेजोमय डोळ्यांत
दूरदृष्टिची नजर विजेची भरलीं होतीं त्यांत
पावित्र्याची ठिणगी चमके नयनीं तेजःपुंज
पीळदार मृदु तनुवर विलसें अभिमानाचें तेज
विशाल वक्ष.स्थलीं विराजे औदार्याचा भाव
देशभक्तिचें कार्य कराया वाटे आला सिंह
नव्या मनूच्या सुधारणेचा शिलेदार, जणुं, शूर—
जुन्या रणावर गाजविण्यातें येइ नवी समशेर
× × × ×
हळु हळु मग गुरें घराला गेलीं दृष्टीपुढलीं
सूर्यावरती टक लावोनी वृत्ति तयाची रमली
—" बिंब चाललें खालीं, होइल अस्त अतां सूर्याचा,
चराचराला नवा दरारा बसेल अंधाराचा"—
—याच विचारीं जरा रंगला, तों दिसला डोळ्याला—
महाराष्ट्राच्या सौभाग्याचा सूर्यकाल गेलेला ! !
—" आर्यत्वाची दिव्य संस्कृति गेली जग जाहीर
आचाराची झाली माती ! गेले थोर विचार !
'—भगवा झेंडा गेला गेला 'जरिपटका' पाताळीं !
—भारतभूच्या आतां नकळे आहे काय कपाळीं ! !
शूर वीरही गेले हिरवे दगडाच्या छातीचे !
नांव कशाला ' रायगडाचें ' अथवा ' सिंहगडाचे ! !
' पुरंदराची ' प्रतापगडची ' घेउनि आम्हीं नांवें
पोवाड्यांतुन पोकळ आतां बोल फुकाचे गावें !
काप जाऊनी भोकें उरलीं ! जाउनि जीव शरीर ! ! '"
दुर्दैवाचीं रडकीं गाणीं कुठवर हीं गाणार !

❀ ❀ ❀

" रसातळाला धर्महि गेला ! अभिमानाची चाड—
नसे जराही परसेवेला जपतो जीवापाड !

ग्रहण लागलें धर्मरवीला ! आले शाब्दिक थेर
धर्म बिचारा झाला आतां रूढीचें माहेर !

\+ + + +

बंधन सुटले नीतिबलाचें ! करुणा जाय लयाला
बंधुभाव ही प्रेमळ, आम्ही हाय ! हाय ! घालविला !
स्वराज्य गेलें ! स्वधर्म गेला ! ! समाजनीति गेली ! ! !
नको नको गे भारतमाते ! रहूं अशी या काळीं !—"

× × × ×

टप टप गळलीं दोन आसवें टप्कन डोळ्यांतून—
याच विचारीं; भवतीं पाहे तरुण जरा दचकून !
' काय करावें देशहिताचें कार्य ' पुन्हा हा मंत्र
वाऱ्यावरुनी पाण्यामधुनी घुमला परि सर्वत्र

× × × ×

झर झर गेला क्षणांत उतरुन उगरीवरुनी खालीं
मंद पावलीं पुढें चालला पाहोनी भवताली.
एकविचारीं जीव रंगला, समरसलें मन त्यांत
देशभक्तिच्या अभिमानाच्या गीतीच्या वेडांत
" स्वदेशसेवा विद्धत्तेला पूर्णत्वातें नेई
सेवेकरितां जीव तरी हा वेडा वेडा होई
समाजसेवा होइल जीवा काय फुकें बोलोनी
माथा उमळे काय कधीं मनिं नकाश्रू गाळोनी
कर्तव्याच्या रणांगणांवर मरणें देशाकरितां
हाच जिवाचा मोक्ष—त्यांतही गाणें मरतां मरतां
निःस्वार्थाच्या ' पानपतावर नच आम्ही लढणार
धर्माचा ' भगवा झेंडा ' कोणचि फडकविणार ?
कारुण्याच्या जोहारानें नच आम्ही रडणार—
तर विधवांची हाक कुणाच्या कानावर जाणार ?
बोलत ऐसें बराच गेला वाळवंट चालून
बोल बोलले कोणी कानीं वाटे वाऱ्यांतून

"—तर विधवांची हाक कुणाच्या कानावर जाणार—"
तर विधवांची हाक कुणाच्या कानावर जाणार—"
शब्द नादले ! पुनरपि घुमले ! कितीक उठले नाद—
वाऱ्यावरुनी, पाण्यामधुनी घुमले मग पडसाद

× × × ×

मान उचलुनी वरती पाहे—तों दृष्टीला कांहीं
मोहविणारें दिसलें, म्हणुनी भर भर पुढतीं जाई

---

## ७ लाजविलेला गुलाब.

( श्लोक )

होती सांज ! दुरून मार्गिं मजला प्रेमें गवाक्षांतुनी—
पाहोनी, झणिं खालती प्रियसखी भेटावया धावली,
दाराआड परंतु मीच लपतां, गेली पुढें धावुनी—
वेणींतून गुलाबपुष्प गळलें तों—अंतरीं लाजली ॥ १ ॥
झाली खिन्न मनीं सखी,—सुमन मी आनंदलो घेउनी !
झाले गालगुलाब पांडुर तिचे—! मी हांसलों पाहुनी !
दृष्टी फेकुनि भोंवती टकमका पाहे मनोहारिणी
होई पूर्ण निराश कीं 'फसविती डोळे असे' मानुनी ॥ २ ॥
दीर्घोच्छ्वासचि सोडुनी परतली—दारामधें पातली
डोळ्यांतून विषण्ण तोंच पदरीं प्रेमांसवें सांडलीं
गेली पाउल आंत एक—हळु तों मी जाउनी मागुनी
हातांतील गुलाब खोवुनि दिला वेणीमधें हांसुनी
भीतीनें मुरडून मान वदली—"हें काय बाई असें ?"
—"ओले गालगुलाब लाजविति या पुष्पा"—वदे मी—"असे !"॥३॥

# कवि-संमेलन.

## १ वन्दे मातरम्.

### ( कवि-श्रीयुत कमलासुत. )

[ जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ]

भारतभूचे सुपुत्र ! ऐका मातेचें गाणें
पराक्रमाच्या भूमीवरती सत्याचें जगणें,
हिमालयाचा मानदंड हा मातेचा प्राण
समृद्धीची या देशाला आहे का वाण ?
प्रेमाश्रूंचे लोट वहाती गंगायमुनांत
हिमालयाचें हृदय उतरवी सिंधु समुद्रांत.
काश्मीराची श्रीनगराची शोभा पुष्पांची
पर्वतराजी दाट पसरली गरदी वृक्षांची.
निसर्ग संपत्तीनें भरली पूर्वपश्चिमाही
दक्षिणेस केवळ सोन्याची ती लंका राही.
निसर्गांत कलविद्याचा इथें समावेश
आद्याचार्यांच्या बुद्धीचा अभिमानी देश.
संगरकौशल्याचा केवळ हा समरप्रान्त
विधी ठरवितो प्रथमस्थान जगीं याचें निभ्रान्त.
स्त्रीरत्नाची खाण असा अभिनव भारतदेश
पुरुषार्थांचा लेवुनि बसला तेजस्वी वेष.
पुरातनाची दोन निशाणे अभिमानें येथ,
नवीनतेचिहि ध्वजा फडफडे वातावरणांत.
त्या दोघांचा संगम म्हणजे मंगलता साच
मांगल्याचा दिव्यत्वाचा सदा इथें नाच.
भारत म्हणजे आद्य-ऋषींची दिव्य तपश्चर्या
भारत म्हणजे इतिहासाची काव्यमया आर्या

भारत ह्मणजे श्रीबुद्धाच्या बुद्धीचें सार
भारत ह्मणजे अवघ्या श्रेष्ठत्वाचें माहेर
भारत ह्मणजे सुमृद्धीचें सुंदर सौभाग्य
भारत ह्मणजे प्रीतिभक्तिभावाचें साम्राज्य
भारत ह्मणजे नीतिसत्यसौंदर्यकलासदन
भारत केवळ परात्पराचें तेजोमय वदन
भारतदेवी ! नितान्त गावी भाषा वेदाची
पुण्यमया पावनहि त्रैलोक्याच्या मोलाची
चित्रपटचि हा परमात्म्याच्या दशावताराचा
ऋषीश्वरांच्या तपःसिद्धिचा इतिहासचि साचा
पराक्रमी रामाच्या शौर्याचीच पुण्यभूमी
श्रीकृष्णाची अभिनवलीलापुनीत ही भूमी
आर्यत्वाच्या पतिव्रतांचें हें पावन स्थान
मूर्तिमंत पाण्डवजायेचा जळता अभिमान
पश्चिमेस साभिमान वसते नगरि सुवर्णाची
स्मरणकुतूहल जागृत करते कथा सुदामाची
सुदामजीची स्नेहभराची पृथुकांची मूठ
समर्पिता सप्रेम, बनतसे सोन्याची लूट
पूर्व दिशेला विभवशालिनी नगरी रामाची
मानवरूप कीर्ति पसरली सीतामाईची
राज्यधुरंधर नृपति निपजले एकाहुनि एक
या भूमीच्या श्रेष्ठपदाची शोभा एकेक
धर्मराज हास्तिनापुरींची मूर्तिच सत्याची
भीमसेन या पाक भूमिची गदा सुधीराची
उदारधी कर्णासम दाता अलंकार साजे
ख्यात वीर द्रोणाचार्यासम भरतभुमि गाजे
योगेश्वर लर स्वतः होत सारथी अर्जुनाचे
श्लोक शोभितात भारत वाहवित भगवद्गीतेचे
कालिदास, भवभूती यांची पुण्यमया वाणी
ओघवती आजस्वी तरुणी भाषेची राणी

वाग्देवीचा बहुमोलांचा रत्नांचा कोश
शब्दकल्पनाप्रचुर असा हा श्रीभारत देश
जगन्नाथ जयदेव कवींची माघभारवींची
श्रीभासाचीं बाणकवीचीं शोभा काव्याची
काव्यशास्त्रकौशल्यकलासोज्वल भारतभूमि
चित्त रगलें तुझ्या वर्णनीं, गानीं, स्वप्नामीं
वीरप्रसविनि ! धीरस्वामिनी ! तुझ्या मंगलानें
भविष्य भरिलें तेंच गाउंदे स्फूर्तींच्या गानें.
महाराष्ट्र श्रीछत्रपतीच्या कीर्तीचा देश
महाराष्ट्र श्रीतानाजीच्या वीर्याचा घोष,
महाराष्ट्र राष्ट्रीयत्वाच्या स्फूर्तीचा देश
स्वातंत्र्यप्रिय शिवरायाचा मंगल, संदेश,
संभाजीची अतुल बुद्धि शिवबाची चतुराई
यांचा संगमसमावेश तो आजहि कां नाहीं !
करवीराचा वीर करारी नृपती खंबीर
त्याच दमाचा त्या जोमाचा नर बाणदार
दीनजनांची वाली त्यांची विजयी समशेर
मात सारखी शूरपणाची येथें करणार.
आणि कशास्तव श्रीटिळकांचा जन्म बरें झाला
नव्या मनूला स्वातंत्र्याचा धीर कुणी दिधला !
भारत उद्धाराया ईशें वीर पाठवीला
तोच श्रीटिळकांच्या रूपें येथें अवतरला
आजकालच्या हिंदभूमिचा जिवंत इतिहास
टिळकाच्या रूपें भूषवि या दिव्यप्रदेशास
या राष्ट्राचा पुण्याईचा पुंज टिळकबाळ
बाळ टिळक नुसता बुद्धीच्या तजाचा लोळ
हृद्देवताकण्ठस्थित नररत्नांची माळ.
त्यांत शोभतो मेरुमणी हा धन्य टिळक बाळ
राष्ट्रोद्धारासाठीं आत्म्याचा हा संन्यास
राष्ट्रोद्धारासाठीं त्याचा शरीरविन्यास

राष्ट्रोद्धारासाठीं त्याचें मूर्तिरूप तत्त्व
राष्ट्रोद्धारासाठीं आलें स्वर्गाचें सत्त्व
हीच, पंडितांनों ! टिळकांच्या नांवाची व्याख्या
हीच, पंडितांनों ! टिळकांच्या जीवाची आख्या
पंडित, शाहिर, थोर, कवी, मुत्सद्दी, सरदार
या सकलांचें एकरूप हें भारत माहेर
वंगभूमि सन्मानिनि जननी मोहनरायाची
प्रभा फाकवी थोरपणाची केशवचंद्राची !
वंगभूमिचे आगरकर, श्रीविद्यासागरजी
वंगमिभूवर सदा असेना सरस्वती राजी !
पूर्वदिशा ही दिशा ख्यात जशि भास्करोदयाची
पूर्वदिशा तशि प्रतिभा केवळ रवींद्रनाथाची
सुरेंद्रजीच्या वक्तृत्वाचा पूर वाहताहे
जगदीशाचें कीर्तिसुमन तर दरवळून राहे
संतमहात्में भक्तविरागी यांची तूं भूमी
धर्मवीर मोहनदासाची कर्माची भूमी
बालकवी, केशवसुत यांची कवितेची बाग
गोविंदाग्रजकविप्रतिभेचा बहारिचा राग
श्रीपादांची शिणेल वाणी तव गाणीं गात
कुठें गोष्ट तर माझ्या दुबळ्या कलमाची तेथ !
म्हणून भारतदेवी ! घ्यावी दासाची प्रणति
'कमलासुत' हें मस्तक ठेवी पदांबुजांवरती

---

## २ कमलिनी

( घनश्याम सुदरा )

( कवि-द. आ. कर्णिक )

अथांग जीवन पूर्ण सराच्या एका तीरावरी
फुले न कमलिनी सृष्टिदेविची राजस बाळा खरी !

जलदेवी निज तरलतरंगीं तन्मुख कुरवाळी
समीर लहरी अल्लड परि तिज हळु विंझण वारी !
पूर्वेच्या अंतरीं उसळता पान्हा तेजाचा—
प्याली, धाली तेजःशीला; ळळा न अन्याचा !
" जीवन वरिवरि रसाळ निर्मळ परि पंकिल ठाव "
म्हणोत कोणी, न शिवे तिज ही जहरी जाणीव !
सहज सुरकुनी मृणाल नाजुक जीवनिं जों पाहे
मंगलतेचें डुलतें झुलतें बिंबचि दिसताहे !
मुग्धमधुर भावांच्या मेळीं हृदय धरी फेर
पराग उधळित परिमल पसरित नाचें चौफेर !

*　*　*　*

दलांदलांवरि हळहळु खेळे शारदीचें वारें
शारदलक्ष्मी स्वयें अवतरे, रूपतेज न्यारें !
निजबाळेच्या लीलारंगीं जीव ओढ घेई
सहजगुणांचा साज त्यासवें जात, न नवलाई !
गंधमिषें कुजबुजे साजणी कुणि गुंजारावीं
' कन्या धन परक्याचें सलये ' या एकचि भावीं !
' फुलराणाजी हृदयिं झेलतिल या वेल्हाळीला '
' छे ग बाई ! वैभवशय्यें रुततिल बाळीला ! '
—तंव इकडे कर्णिकारतरुचीं थरथरलीं पानें
करपल्लवि ही त्या वेड्याची कमलिनीच जाणे !

---

## ३ छाया-लीला.

( सुनो ऐ जानमन तुमको— )

( एक छायाचित्र पाहून )

अहा ! लावण्यांबुराशींतुनी उसळोनिया आली
कुणाची भाग्यलक्ष्मी ही इथें मूर्तिमती ठेली
खुले हृद्भावना दल हें, झुले राजीव जीवाचें

हिची चाहूल परिसोनी तया तालावरी नाचे !
अये सोत्कंठ त्वन्मार्गावरती कंठी निशा सारी
जरी हृत्कोष शोषोनी मरंदा भृंग संहारी
निमाली निशा, उजळे उषातेजें पहा आशा,
भराया त्वच्चपलचरणा परागांच्या करी पाशा !

* * * *

अहा ! हें भाल ! लीला-भू विधी निर्मी सुतेलागी
इथें भ्रतोरणाखालीं सदा वागीश्वरी जागी
स्फुरे जी लोचनी दीप्ती जणूं पंचारती हातीं
कधीं दिक्काल विजयी ये कवीराया ! न्यहाळी ती !
जगन्मांगल्यकुंडांत रणीं झुंझार जे पडले
दिव्य समशेरिचें पाणी तयांचे नेत्रिं या खेळे !
जिच्या नादें जगीं जीव मूर्ती चैतन्य संचारे
अशी संजीविनी अधरा ! कधीं श्रवणांतरीं थोर ?
मनाच्या भावरानिं या विषाची पेरणी झाली—
तरी चिन्ता वृथा जो ही वरी झळकन् लवे बिजली;
तमावाटे तमीं शिरतां जयीं जीवाकडे भ्रांती—
बिजेचा चांद हा खुदकन् हंसे ! येईल का हातीं ?

* * * *

अहो छायेसवे खेळे खुळी ही कल्पना बाळा
तरल गंभीरही भावा कवळण्याचा हिला चाळा
सहस्रांही करी रविला न ते रेखावया आले
चित्तरंगा चितारीतां रंग त्याचे फिके पडले !
पुरे ग छंद, मजसंगें नजरबंदी जरा खेळे—
गतच्छायेंत हृत्पटलीं नवोन्मिन्न प्रभा मिसळे
तयांच्या संगमीं मूर्ती कुणाची रंगली सांग
जनीं विजनीं तीच लीला लालसा गे करी गुंग !

* * * *

( अनुष्टुप ) छाया सीता करस्पर्शें रामसंमोह घालवी
छाया लीला परी दुरुनी संमोहनचि चालवी !

## ४ वसुधा.

रूपवती सौंदर्यकला
विधिनिर्मित ही भूबाला
लेवुनि नैसर्गिक लेणीं
नटली ही सद्गुण खाणी.
पाचूचा हिरवा हिरवा
शालु हिला शोभे बरवा
जल लहरींचा
रविकिरणांचा
संगम संमोहन कारी
कांठ लाविला जरतारी.

[ २ ]

नानापरिचे नवे नवे
विलास हिजला नित्य हवे
पिवळें पातळ कधीं असे
कधिं हिरवा शालु नेसे
कधीं कधीं दवबिंदूंची
सुरे पैठणी नवलाची
आकाशींची
नव मेघांची
पांघरुनी काळी शाल
नटे कधीं ही वेल्हाळ

[ ३ ]

महाल हा सुंदर भव्य
रत्नें झळझळतीं दिव्य
छतास लटकविलीं सारीं
प्रभा पसरली जगावरी
लखलखाट त्या रत्नांचा
दिसे महालीं मौजेचा
त्यांत मोहिनी
करी निशिदिनीं
मऊ परा रेशमाहुन
सागर शय्येवरि शयन

[ ४ ]

कोण राजसे तुझा धनी
रमणा वांचुनि कां रमणी
लाजु नको लावण्यवती
ओळखिला त्यां तुझा पति.
विश्वाचा पालनवाला
तोच तुझा स्वामी गमला
प्रेमें त्याला
अर्पायाला
वाक्सुमनांचीही माला
' तारानुज ' वाही तुजला.

---

## ५ कळेल कधिं मज कां तें ?

कृ. प. तासकर बी. ए.

जग सारें गिरभिर फिरतें कोणाच्या भंवतीं भंवतें ?
सुख-स्वप्नामाजीं गढतें मन कसल्या नादावरतें ?

दिन रजनी श्रवणी येतीं कसलीं हीं मंजुळ गीतें ?
प्रिय बाला हृदयीं धरिते
नव बाला तल्लिन होते
तें बालक खदखद हंसतें.
परि कळेल कधिं मज कां तें ?
जग सारें भिरभिर फिरतें कोणाच्या भंवतें भंवतें ?
हीं नेत्रांचीं संगीतें हृदयांचीं प्रेमळ गुपितें !
हीं आत्मैक्याचीं गाणीं, ही दिव्यत्वाची वाणी !
हें कसें ? परी हीं हृदयें कां जाती एक बनूनी ?
हा युवक मदानें भरला
रमणीच्या पुढती नमला
बघ तीही नमते बाला
परि कळेल कधिं मज कां तें ?
जग सारें भिरभिर फिरतें कोणाच्या भंवतें भंवतें
हा प्रभाव विषयांचा का ? हा खेळ वासनांचा कां
हें अवडंबर देहाचें ? कीं पूजन हें अर्थीचें ?
छे, शंका तिळभर नुरते तेजाची ज्योति जळते
सो चिलया धांवत येई
जन सावित्रीतें गाई
जगिं बंधु सुदामा होई
परि कळेल कधिं मज कां तें ?
जग सारें भिरभिर फिरतें कोणाच्या भंवते भंवतें ?

---

## ६ हुरहूर.

( किशोर. )

मनीं हुरहूर !—कां गडे अशी अनिवार ?
शृंगाराची मदन मंजरी
हास्यक्रीडायुक्त मुखावरि
लावण्याचें लालाम-वारी
धीर गंभीर !—वाहुनी तरी हुरहूर ! !

नवयौवन संचरलें अंगीं
निसर्ग सुंदर चारु शुभांगी
प्रणय रसाच्या रंगत रंगीं
मुक्तकच भार !—नर्तनीं सदाचा चूर !!
मनोज्ञ आलापांचें गीत
स्वच्छंदानें गुगत गुंगत
व्यापित प्रणयाचा दिक्प्रांत
चालली कोण ?—कोणाचें हृदयीं ध्यान ?
खुडुनि आणिलीं पुष्पें चार
गुंफित रमणी हार मनोहर
हृदयिं रेखिली मूर्ति सुंदर—
" वारुवर स्वार !—ते-तेच बाइ दिलदार !! "
निर्गुण ब्रह्माची साकार
अविच्छिन्नता दृष्टी-गोचर
होतां, दिपतीं नयनें सत्वर
चित्त चवचाल !—हो, नाचतसे बेताल !!
आनंदाच्या साम्राज्यांत
निर्दोषात्मा स्वैर तरगत
पूर्णत्वाची तरिही भ्रांत
उणीव कशाची ?—भासतसे—भासाची ?
धवल चंद्रिका रस गंगेंत
न्हाउनि कुमुदिनी हर्षे डोलत
कृष्णमेघ तों आकाशांत
निराकुल शांति—वसतसे कुणाच्या चित्तीं ?
सौंदर्याचें मोहन जाल
पसरुनि केलें व्याप्त महीतल
संसृति कोलाहल कल्लोल
रोजचा तोच—दैवाचा दुबळा नाच !!
माझाच मला नाहीं ठाव
बुद्धिबळाचा परि हा डाव

हार पावणे भोळा भाव
चिन्मया माया—वा भारितसे नजरा या ?
अशाश्वताची सुटण्या संगत
परात्परार्शी व्हावी निगडित—
अंतःकरणे श्रद्धायुक्त
भक्त भगवंत !—वाहुणें ज्ञान गंगेंत !!

*   *   *   *

असंबद्धता अशी पसरणें
विश्व आपुडें उदास वाणें
घुमतां कर्णी हें रडगाणें
हृदय दुभंगे !—सानंद समाधि भंगे !!!

---

## ७ चंद्रकला.

वीर धीर धीमंत सकलगुणविद्यापारंगत
सुज्ञ शहाणा तरुण देखणा पंडित मंत्रिसुत.
हिंडत हिंडत राजमहाली आला तो शुभमति
राव त्यास पाहून पावला संतोषातें अति.
म्हणे राजसा पितयामागें अग्नि वस्त्रें तुला—
मन्त्रिपदाची संदह न मग निरोप त्याला दिला.
बालपणाची सखी तयाची राजसुता सुंदरा
दृष्टिस पडली सहज, मुरडुनी जातां निज मंदिरा.
राजसबाळा ती वल्हाळा चंद्रकळा सांवळी
रूपवती सुकुमार नार ती जशि ग चाफेकळी !
लावण्याची लता डहुरली सद्गुण सुम-भडित
पाहुन भुलला तिच्या रुपाला झाला मोहांकित.
जवळीं जाउन उभा ठाकला, कुशल पुसे तिजप्रती
" सांग राजसे ! कशास दिससि चिंतातुर संप्रतीं ?
बाल्यांतिल तव लीला साऱ्या अतां न दिसती गडे
कुणाजवळ तूं शिकलिस असले हे मौनाचे धडे !

तारुण्याची कळी उमलते तव देहीं गोजिरी
अल्पकाळ लोटतांच होइल फूल, सुभगमंजिरी !
वास फुलाचा त्या सुंदर दरवळुनी जाइल दुरी
देशदेशिंचे राव धांवतिल धरावयालें शिरीं !
लाजत लाजत म्हणे सुदरा " प्राणसख्या, दिलवरा !
कशास बघतां ठाव मनाचा माझ्या मानसवरा !
राजपुत्र सम्राटपुत्र ते नकोत मजला वर
देह असे हा चरणीं तुमच्या रात्रंदिन सादर
थोर थोर नृप होउन गेले शूर समर-शार्दुल
बाहुबळानें गाजविल हें ज्यांनीं भू-मंडळ !
पुत्रांना परि पाणी प्याया परक्यांची ओंजळ—
नित्य लागते, शौर्यहि हटलें, अटलें सारें बळ !
परवशतेवर भिस्त; न याना स्वातंत्र्याची रुची
संपत्तीस्तव विकुं न आम्ही देह मनें आमुचीं !
स्वातंत्र्याविण जळो जिणें तें राजकुळांतिल जनीं
विद्वानाच्या पदरीं पडणें श्रेयस्कर त्याहुनी
प्रेम त्यातुनी तुम्हावरतीं बाळपणापासुन
उगाच चतुरा ! बोल बोलला का लटके हांसुन ?
ऐकुन वाणी मंजुळवाणी बोधसुधेची खनी
पंडित मग तो डोलु लागला, फार तोषला मनीं.
विचार उभयां मानवला दोघेंहीं आनंदलीं
निरोप घेउनि सखिचा मग तो गेला अपुल्या स्थलीं
दासीकरवी राजसुतेनें पित्यास केलें श्रुत
तोही झाला प्रसन्न, केला विवाह नामांकित
मग तीं दोघें सुखांत पुढचा काळक्रमिती निज
कवनीं गाई गीत तयांचें शाहिर ताराानुज !

## ८ पतंगा ! वेड्या !

( पद—चालः—सगुण गुण माया )

कवि, कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी, कळोळकर

---

पतंगा ! वेड्या ! कां करिसी अविचारा या ॥ १ ॥ ध्रुपद ॥
घडेल ज्याचा स्पर्श तयाला ।
दग्ध करावें, ठावें ज्याला ! ॥
कसा धावसी त्या दीपाला ।
आलिंगाया ? ॥ कां ॥ १ ॥
किती दीप हा दिसतो सुंदर ! ।
होईल तदालिंगन सुखकर ! ॥
कल्पुनि हें जर जासीं द्रुततर ।
त्या भेटाया ! ॥ कां ॥ २ ॥
असे कल्पना तर ही व्यर्था ! ।
या दीपाच्या सन्निध येतां ॥
जळून जाइल पळ न लागतां
तव मृदु काया ! ॥ कां ॥ ३ ॥
नेम तुझा चुकतो ह्मणुनियां ।
असे सुरक्षित ही तव काया ! ॥
वेळ नको तिज भस्म कराया ।
दीपाला या ! ॥ कां ॥ ४ ॥
यांचें सुंदर बहिरंग दिसे ।
अंतरंग पण कृष्ण बहु असे ! ॥
याच्या ठायीं किंचितहि बसे ।
न दया माया ! ॥ कां ॥ ५ ॥
काय कुसुम समजतोस याला ? ।
सौंदर्यें जें भुलवि अखिला ॥
सिद्ध सदा मकरंदें तुजला ।
जें सुखवाया ! ॥ कां ॥ ६ ॥

चूक समज हा परंतु खास ! ।
दीस अग्नि !, बघ नीट तयास !
क्षणहि नको ज्या तव देहास ।
भस्म कराया ! ॥ कां ॥ ७ ॥
ह्मणुनि सुखाची निष्फळ आशा ।
धरुनी न वरी तूं यमपाशा ! ॥
करी उपवनीं क्रीडा खाशा
सुख मिळवाया ! ॥ कां ॥ ८ ॥
कीं तुज गमलें असार जग हें ।
नीट उघडुनी स्वनयन पाहें ॥
स्थळें रम्य दिसतिल लवलाहें ।
तुला रमाया ! ॥ कां ॥ ९ ॥
काय थोर तुज विपत्ति आली ? ।
ह्मणुनि तुला तनु नको जाहली ? ॥
झटसी दीपानलिं या काळीं ।
ती अर्पाया ? ॥ कां ॥ १० ॥
कीं तव सुमित्र, आप्तहि कोणी ।
गेले या जगता सोडोनी ?
असुत्याग करिसी ह्मणुनीं ।
त्यां भेटाया ? ॥ कां ॥ ॥ ११ ॥
त्यांच्या विरहें तुझ्या मनाप्रत ।
दुःख जाहलें किंवा बहुत ? ॥
करिसी कृत्य हें तूं त्या त्वरित ।
कमी कराया ? ॥ कां ॥ १२ ॥
अनुचित कृत्यें या आजवरीं ।
इष्ट हेतुला कोणी न वरी ! ॥
म्हणुनि सिद्ध तूं होई झडकरीं ।
तें न कराया ! ॥ कां ॥ १३ ॥
घोर पाप बहु आत्मघात हा ! ।
तेणें न घडे लवहि हित, पहा ॥

परमेशाची शपथ तूं वदा ।
तया त्यजाया ! ॥ कां ॥ १४ ॥
अतिशय खलजन निंदा ऐकुनि ।
कीं गेलासी तूं वेतागुनि ! ॥
म्हणुनि त्यजाया इच्छिसि अवनी
तीं टाकाया ? ॥ कां ॥ १५ ॥
पण ऐकोनी दुर्जन-निंदा ।
न टाकिजे स्वाहिताचा धंदा ! ॥
त्यजी न कधिंही तू आनंदा ।
करी कर्तव्या ॥ कां ॥ १६ ॥
चकचकतें तें सर्व सुवर्ण न ! ।
न भुलावें बहिरंग बघून ॥
जगीं सत्य या घ्याव शोधुन ।
हित साधाया ॥ कां ॥ १७ ॥
तसें संकटिं न भिऊन जाव !
बहु प्रयत्नें धैर्य धरावें ॥
जीवें भाव शरण रिघावें ।
त्या प्रभुराया ॥ कां ॥ १८ ॥
सदासिद्ध जो भक्त रक्षणीं
पूर्ण दया वसते ज्याच्या मनिं ॥
करील तो प्रभु तुझ्यावर क्षणीं ।
सुकृपा च्छाया ! ॥ कां ॥ १९ ॥

---

## ९ तुटणारा तारा !

( रघुनाथ आत्माराम प्रधान )

( भूपाली स्वर )

हा तारा तुटला आला आला खालीं.
हे कल्प-तरूचें पुष्प झुळुकेंही त्याली. १

---

१ खल-निंदा.

कीं स्वर्गङ्गेला अमर्याद थे भरती.
त्या लाटांतुनि हें सूचरि पडलें मोती. २
कीं प्रेम—पत्रिका पाठविली चन्द्रानें
हा भू-मातेला वायु नेत वेगान ३
की रम्याभरणचि आवडलें वायूला
परि नि-र्गुण वायू बद्ध करी त्या कुठला ? ४
की स्वर्णवृत्तिचा बिन्दुच वाट मजला
परि एकचि दिसता विचार मनि तो थिजला ५
की दिव्य दृष्टिचा द्विज हा रात्रीं फिरतो
या गभीर काळीं मूक-स्तवन करातो ६
कीं शाप-मुक्त तो त्रिशंकु-नृप मज वाटे
त्या पहा निरखुनी तो न कुणाला भेटे. ७
कीं धराच करिते सुधाकराची आरती.
प्रार्थुनि त्यास " बा ठेवि सुधेची वृष्टि. ८
की तारा-कन्दुक खेळ चालला हाच
हा इन्दु फेकितो धरा झेलिते साच. ९
छे दिपऱ्यांचा ना खळ सपला त्याचा
घे दृश्य-रूप हा नादच विश्वऱ्याचा १०
कीं संगत वाटे शुचि-तम आढार्थूचा
रोहिणी—सुधाकर—युगुलाच्या भेटीचा ११
की " आनन्दाचा कन्दच " ज्याला ह्मणती
तो हरी मूर्तिमान् ' रघू ' करी त्या प्रणती. १२

---

## १० वदुनि घेशिल ना मजसि तूं तसाही—

( सौ. म पत्की )

त्रस्त झालें मन बहु विवंचनांनीं
नित्य परिचित संसार यातनांनीं
शांतवाया घडिभरी तया केला

यत्न, आठवुनी श्रीहरी-पदाला
दार खिडक्या लावोनि सत्वरीं मी
समाधीची जणुं सोय करी नामी !
हेतु हा कीं एकांत पूर्ण व्हावा
बाह्य जगताचा ताप मुळीं नसावा.
स्वयें पद्मासन नीट घालुनीया
नेत्र झांकोनी हात जोडुनीया
मनीं आठवुनी बालरूप साचें
मधुर मंदस्मित सांवळ्या हरीचें
वृत्ति विरली हळुहळू मम मनाची
सुटुनि वलयें जणुं घोर यातनांची
मुक्त झालें पांखरूं कोंडलेलें
उच्च वातावरणांत उडुनि गेलें !
स्वर्ग-सौख्याला तुच्छ जयें केलें
सौख्य असलें क्षणभरीं लाभलेलें
भोगिलें ना भोगिलें क्षणहि एक
बाळ दारीं मारीत मला हांक—
" दार बाबा ! उघडुनि मला घेई
रुसुनि बसला ? कां राग तुला येई ?
काय नावडती आज तुझी झालें ?
म्हणुनि घेशीना मजसि तूंच कारें ! "
बाळ माझी लाडकी मला बाही
गोड शब्दांनीं दार ठोकिते ही
काय बैसूं लावोनि समाधीला ?
दूर लोटुनिया गोजिऱ्या फुलाला ?
ध्यान कसलें ! राहिली ती समाधी !
धांवलों मी उघडून दार आधीं !
हृदयिं धरुनि सोत्कंठ चुंबियेलें !
बाळ माझें अश्रुनीं न्हाणीयेलें !

\+ \+ \+

बालरूपी परमेश ! हृदय-साक्षी
प्रेम वेड्या-हृदयास जाणतोसी
बाळ तव मी येईन तुझ्या पाशीं
दार ठोठाविन तुझें करुण-राशी !
नको आणूं संदेह मनीं कांहीं
मूढ अथवा हा पात्र मुळीं नाहीं
' बाळ माझा लाडका मला बाही '
वदुनि घेशिल ना मजसि तूं तसाही ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा

समाप्त ।

## पहिल्या ओळींची सूची


| ओळ | पृष्ठ |
|---|---|
| अथांग जीवनपूर्ण सराच्या एका तीरावरी ... .. ... | १३२ |
| अहा लावण्यांबुरांशींतुनी उसळोनिया आली... ... ... | १३३ |
| अमृतसिद्धि हा योग मंगलचि जग सगळें गाय ... ... | १३ |
| आद्य ऋषींनीं जी केली तेजाची पूजा वहिली ... ... | ४ |
| आनंदी आनंद गडे ... ... ... ... ... | १ |
| आयुष्याचा स्वर्ग खेळतो बाळपणीं हृदयीं ... ... ... | ११० |
| उत्कंठेची सीमा झाली आतां या पुढती ... ... ... | ११६ |
| उभीं हिरवीं शेतांत पिकें होतीं ... ... ... ... | ९१ |
| उशास पर्वत घेउन सागर ... ... ... ... | ४९ |
| अधरामधुनी प्रकाश किरणें चैतन्य वाहोनिया ... ... | १२ |
| कर्तव्याचार भार वाहुनी दमलेला जीव ... ... ... | ११४ |
| काय जगीं या आहे जादू सांगा मज कोणीं ! .. ... | १०२ |
| काळोखाच्या काळ्या रातीं ... ... ... ... | ११२ |
| गडग्यावरच्या थडग्यावरती शून्य मुखें पाही ... ... | १०१ |
| गीत गातसे प्रेमाचें ... ... .. ... ... | २१ |
| चल रोख ठोक दे निरोप निर्वाणीचा ... ... ... | ४४ |
| चंद्राची चढती कला झुलविते पृथ्वीवरी सागरा ... ... | ६१ |
| चांद बिजेचा नभावरीं ... ... ... ... | ५९ |
| छत्रपतींच्या महन्मंगला महाराष्ट्र-देशा ! ... . ... | १०६ |
| जग सारें भिरभिर फिरते, कोणाच्या भंवते भंवते ! ... ... | १३५ |
| जगताच्या या बाजारीं ... ... ... ... | ३५ |
| जगाचे बंध कोणाला ... . . ... ... ... | ११ |
| जादूची माझी बाग ... ... ... ... ... | १९ |
| जीचे पादसरोज सुंदर सदा सेवावया सागर... ... ... | १२० |
| ज्योत्स्ना चुंबित हीं तुझ्या उसळतीं लाटातुनीं मौक्तिकें... ... | ८७ |
| झोंपेविण मी निराश रजनीं ... ... ... ... | ५१ |
| डोळ्यांनीं बघतो ध्वनीं परिसतों कानीं पदीं चालतो ... ... | १५ |

तरलित तारांकीत गीता ... ... ... ... ४२
तुजसाठीं नच रसिका रिझवायाला हृदयेश्वरी... ... ... २५
तुला बघावें गुंगावें ... ... ... ... ... २
तुंबळ सागर खळबळला ... ... ... ... १११
तेजाचे तारे तुटले ... ... ... ... ... ३७
त्रस्त झालें बहु विवंचनानीं ... ... ... ...
दारुणतर संग्राम संकटीं लढता लढता पडे ... ... ... ६९
दिवस दिवस ही चालुन जाइ मंद पाउलें पुढें पुढें ... ... १०३
दृष्टि लावुनी पाहशी मजकडे कां सांग आतां गडे ... ... ११३
धन्य पंढरी धन्य भीवरा धन्य चंद्रभागा . ... ... २२
ध्यास मायभूमि ! तुझा लागला मर्दांतरी . ... ... १०५
नतांगी येत सामोरी थरारे पुलकिता काया ... ... ... ५५
नमो पांडुरंगा नमस्ते श्रीरंगा .. ... ... ... १६
नव्या वसंता उधळ सुखाची सुमें त्रस्त भूवरतीं ... ... ११०
निजला आहे सिंहगडाचा येथें हा राणा ... ... ... १०७
निबिड तिमिर वर नभीं संचरे... ... ... ... ३३
निशिदिनीं तळमळे भू-जननी ... ... ... १०८
नीलप्रभ निर्मल गगनीं .. ... ... ... ... ३५
पतंगा ! वेड्या ! कां करिसी अविचारा या ?... ... ... १४०
पहिल्या साखर झोंपेमधुनी .. ... ... .. ५८
प्रभात झाली दिशा निवळल्या मावळली रजनी ... ... ६२
प्रीति ग बाला ... ... ... ... ... २६
प्रीतीचा पथ हा भयाकुल दिसे सौंदर्य सौदामिनी ... ... १०
पुरा कडोसा पडला नव्हता ! किरणें सुंदर पिवळीं ... ... १२५
पूर्वेला स्पर्शुनि शशि अस्तंगत झाला ... ... ... ३९
प्रेमा उठ !—चल, उघड झांकली मूठ ! .. ... ... २१
फुलवंतीचा हार कवे ! तू चालुन नटलास ... ... ... १०८
बहार लुटिचा वसंत सरतां दुःखित झाली रानें ... ... १०४
ब्रह्मसुते आशिर्वच देइ बालकाला ! ... ... ... ६७
बालपणींच्या जीवन-मित्रा कोण अतां रणधीर ... ... १२२

बालमुकुंदा, नंदानंदा, आनंदकंदा, गोविंदा ... ... ... ११५
बाले थांब जरा, क्षमा कर तुझें गाणें करी हें पुरे ... ... ६२
भवबंधाच्या नैराश्यतमीं जीव अध हो जरी... ... ... १२१
भारतभूचे सुपुत्र ऐका मातेचें गाणें ... ... ... १२९
भूषित करिसी वसुंदरा ... ... ... ... २८
मर्द मराठ्या उठ विखारी भाला निज सावरी ... ... १२३
मनीं हुरहूर !—का गडे अशी अनिवार ? ... ... ... १३६
मधुर तुझे प्रभुचरण नमावे ... ... ... ... ११९
मंजुळ मृदु तरल बोल वीणारव बोले ... ... ... ७०
माझा पिंगा गोड गडे ... ... ... ... ... ४०
ये-शांत कराया देवी ... ... ... ... ... ११७
रान-रानचीं फुलें आणिलीं देवी तुजला पूजाया ... ... १११
राज्य त्यागुनि प्राण जे वनांत दडले होते शकांच्या भयें ... ९२
रूपवती सौंदर्यकला ... ... ... ... ... १३५
रूपाला बघुनी सदैव मन हें वेडे बनावें पुरें... ... ... ११५
लाज गडे, लाडके, एकदां लाज गडे पुरती... ... ... ६३
वनवन करितां काव्यकलेसह जोत्स्नेवरुनी नभीं ... .. ५६
वसुंधरेचा कागद घेऊन सागर शाईनें ... ... ... १०३
विचार करितां तुजविषयीं ... ... ... ... १८
वीर धीर धीमंत सकलगुण विद्यापारंगत ... ... ... १३८
शत्रुच्या खड्या समशेरी ... ... ... ... १०६
शिवप्रभूच्या स्वातन्त्र्याचा हा भगवा झेंडा ... ... ... ९५
श्रमलें दमलें वणवण फिरुनी गगनीं रविकरजाल ... ... ७
समर-खेलनी सांग कुठिल तूं दुबळाइत प्यारी ... ... ४७
समशेर प्रीतिची नकळे ... ... ... ... २७
सत्प्रेम विषाचा प्याला धरितां वदनीं ... ... ... २४
सह्यगिरीच्या स्वर्गंगाजल धौत शिरःप्रांतीं ... ... ... ८२
सृष्टि सतीची जी प्रतिमा ... ... ... ... २९
सृष्टिच्या हृदयावरतीं ... ... ... ... ... ६५
सृष्टीचे नवनाद छंद मनुजास वंद्य जाहले ... ... ... ४५

स्वर्गांच्या तेजोगर्भी बाळें ती खेळत होतीं ... ... ... ८
स्वातंत्र्याचें मंदिर तू ... ... ... ... ... ८८
सोड समाधी राष्ट्र शाहिरा आजवरीचें मौन पुरे ... ... ७४
सोड समाधी राष्ट्र शाहिरा आजवरीचे मौन पुरे ... ... ७७
हा कोलाहल विश्वाचा ... ... ... ... ... ३०
हा तारा तुटला आला आला खालीं ... ... ... १४२
हांस मधुर हास सतत दिव्य पादपा तू ... ... ... ७२
हा दक्खनचा दिवा, फुलाचा हा फुलता झेला ... ... १०९
ही खेळतसे येथें संध्या राणी ... ... ... ... ९६
होती सांज दुरून मार्गी मजला प्रेमें—गवाक्षातुनी ... ... १२७
हर्षोद्यानीं प्रीतिलतेला बहर फुलाचा आला ... ... ... २३

REFBK-0019429

## शुद्धि-पत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६ | खालून २ री | मूमीवरती | भूमीवरती |
| १८ | ,, ९ वी | पोटाबारी | पोटावारी |
| २२ | ,, १६ वी | सुगुणरूप | सगुणरूप |
| ,, | ,, १२ वी | ब्रम्हमंडलाची | ब्रह्ममंडलाची |
| २३ | वरून १३ वी | टेनिनसनच्या | टेनिसनच्या |
| २४ | खालून ११ वी | पेला | प्याला |
| २७ | ,, ३ री | कवितेचे पहिले...कडवे माझे | कवितेचीं पहिली ...कडवीं माझीं |
| २९ | ,, ३ री | गुंतत | गुंगत |
| ३१ | ,, ११ वी | देईन | देहून |
| ३७ | ,, ५ वी | टतुले | तुटले |
| ४२ | वरून ११ वी | नांवाचे | नावाचें |
| ,, | खालुन ७ वी | हरिणतारा | हीरणतारा |
| ४४ | ,, ५ वी | हृदयांवरती | हृदयावरती |
| ४५ | वरून ५ वी | रिकविला | रिकबिला |
| ,, | ,, १० वी | जाहलें | जाहले |
| ,, | ,, १७ वी | नाचायला | नाचायाला |
| ४८ | ,, १९ वी | शिरांगणवरती | शिरांगणावरती |
| ४९ | ,, १६ वी | तरुणांचे | तरुणाचें |
| ५४ | खालून १ ली | मस्त्यामधले | रस्त्यामधले |
| ५५ | वरून १५ व १६ [ या दोन ओळी १ ल्या गझलाचें शेवटीं ] | | |
| ५८ | ,, १० वी | ऱसिक | रसिक |
| ६७ | खालून ९ वी | आशिर्वच न | आशिर्वच |
| ७४ | ,, ६ वी | करीं | करी |
| ८१ | ,, २ री | आल | आलें |
| ८८ | ,, ११ वी | लाटांतुनि | लांटांतुनि |
| ,, | ,, ९ वी | होईल...येईल | होइल...येइल |

| | | | |
|---|---|---|---|
| ९६ | वरून १३ वी | द | दे |
| १०१ | खालून ४ थी | सतींच्या | सतीच्या |
| ,, | ,, २ री | मरूनी | मरुनी |
| १०२ | वरून ८ वी | जादूं | जादू |
| १०४ | ,, २ री | रवैर | स्वैर |
| ,, | ,, ७ वी | पाने | पानें |
| १०७ | वरून १ ली | कडेकपाटी | कडेकपारी |
| ,, | ,, ७ वी | दृष्टी | वृष्टी |
| १०९ | ,, ३ री | कुठें परंतू-तू !! | कुठें परंतू-तूं ! धिःक्! |
| ,, | ,, ६ वी | " कविवर्य " गोविंग्रज | " कविवर्य गोविंदाग्रज " |
| ११२ | खालून १४ वी | होइल | होईल |
| ,, | ,, ९ वी | स्वर्गसे | स्वर्ग |
| ,, | ,, ४ थी | सुखीं | सुखी |
| ,, | ,, ३ री | मध्यें | मधें |
| ११५ | ,, १३ वी | मध्यें | मधें |
| १२१ | वरून १४ वी | कर्तव्याची | कर्तव्याचीं |
| १२४ | खालून २ री | निर्झरीं | निर्झरीं |
| १२६ | ,, ६ वी | गावें | गावे |

## काव्यरत्नावली.

पस्तीस वर्षें चालूं असलेलें निव्वळ मराठी कवितेचें मासिक पुस्तक यांत हल्लींच्या नामांकित कवींचीं सुंदर काव्यें व कविता येतात. वार्षिक किंमत दीड रुपया. मागील १५ वर्षांचीं बांधलेलीं पुस्तकें रद्दीच्या भावानें मिळतात.

काव्यरत्नावली-कर्ते--जळगाव,-खानदेश

---

## —महाराष्ट्र-साहित्य—

**मासिक.** वार्षिक वर्गणी ट. ख. सह ३ रुपये.

यांत विद्वान व सुप्रसिद्ध लेखकांचे उपयुक्त व भारदस्त लेख निबंध, सुरस व मनोरंजक गोष्टी व रम्य कविता येतात.

महाराष्ट्र-साहित्य कचेरी,

हनुमान बिल्डिंग,

ग्रँटरोड मुंबई,

---

**भावे आणि मंडळी बुकसेलर्स**--कोणत्याही लेखकाचें कोणतेंही पुस्तक आमचे येथें मिळेल.

ठाकुरद्वार, मुंबई.